# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन ॲपद्वारे)

**सभा क्रं. - ३०** **दि.१२/०५/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१२/०५/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील सन्मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | भोईटे लताबाई रणजीत | पाटील राजेंद्र झिपरु |
| जोहरे प्रिया मधुकर | पाटील प्रतिभा सुधीर | महाजन सुनिल सुपडु |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| खान रूकसाना बी गबलु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे सिंधु विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णू रामदास | कोल्हे ललीत विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| तायडे ज्योती शरद | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| काळे अमित पांडुरंग | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धीरज मुरलीधर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | सोनवणे सुरेखा सुदाम | |
| चौधरी मनोज सुरेश | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड ,मुख्यलेखापरिक्षक श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सपकाळे मिना धुडकु , चौधरी मंगला संजय , तायडे सुरेखा नितीन, खडके सुनिल वामनराव , शेख सैईदा युसुफ ,यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**मा.महापौर :-** सभा क्रं. ३० च्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-** सभा क्रं. ३० , विषयपत्रिका क्रं.३० वरील विषयपत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दिनांक २६/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे व दिनांक २६/०२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दोघी महासभांचे कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिनांक २६/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे व दिनांक २६/०२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (अॅपव्दारे) विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४८ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुदत संपलेल्या व्यापारी संकुलातील गाळयांबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**अॅड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया, मला बोलण्याची संधी मिळावी विषय क्रं. २ मध्ये

**मा.महापौर :-** बोला शुचिता ताई,

**अॅड . शुचिता हाडा :-** सन्मा.महापौर महोदया ,उपमहापौर साहेब आणि आयुक्त साहेब भारतीय जनता पार्टी तर्फे विषय क्रं. २ बाबत मी येथे मत मांडते आहे. मुळात हा महानगरपालिका सबंधातील आणि जळगांव शहरातील अत्यंत संवेदनशिल आणि खुप वर्षापासुन वादग्रस्त असलेला आणि प्रलंबित असलेला असा विषय आहे. भारतीय जनता पार्टीची अशी मानसिकता आहे . सदरचा विषय हा मुळात ७७ विषय असलेल्या विषयपत्रिकेवर घेणं कितपत उचित आहे. मुळात या विषयासाठी एक स्वतंत्र महासभा काढणं अत्यंत आवश्यक आणि अपेक्षित होत. जे की ईथे झालेले नाहीये. प्रशासनाचा प्रस्ताव आहे म्हणजे तो बरोबरच असेल अस नाही. या विषयाला अनेक कांगोरे आहेत आणि अनेक बाजु आहेत आणि या सगळया बाजु तपासुन बघण्यासाठी आणि या सगळया विषयांवर विचार होण्यासाठी खरतर अस अपेक्षित होत की या विषयासाठी एक अनौपचारीक सर्व गटनेते , सर्वपक्षीय गटनेते आणि महत्वाच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक महापालिकेमध्ये आयोजित करावी. ज्यामध्ये या विषयावर सांगोपांग चर्चा होईल आणि तदनंतर या विषया संदर्भात महापालिकेचही आर्थिक हीत जोपासल जाईल. गाळेधारकांचही कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही आणि शहराच्या विकासालाही कोठेही खिळ बसणार नाही असा एक सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न करता येवु शकतो आहे. त्यामुळे महानगरपालिकेला महापालिकेच्या आदरणीय महापौरांना भारतीय जनता पार्टीतर्फे विनंती आहे की हा विषय आजच्या सभेमध्ये तहकुब करण्यात यावा. सगळयात महत्वाच ईथे आहे मी नमुद करू ईच्छिते महापौर महोदया या विषया संदर्भातला ५ पट दंड माफी बद्दलचा यापुर्वीच महासभेने प्रस्ताव केलेला आहे ठराव केलेला आहे आणि सदरचा

ठराव हा शासन दरबारी तत्कालीन आयुक्तांनी टेकाळे साहेबांनी मार्गदर्शनासाठी सुध्दा पाठविलेला आहे. त्यासंदर्भातला निर्णय अजुन येणे बाकी आहे. शहराचे आमदार राजुमामा भोळे यांनी २०२० च्या ऑनलाईन विधानसभेच्या सभेमध्ये लक्षवेधी मांडलेली आहे. गाळेप्रश्ना संदर्भातच ज्यामध्ये ५ पट दंड माफी बद्दलाचा सुध्दा मुद्दा घेतलेला आहे. त्यानंतर जे वार्षिक भाडे आकारणी होणार आहे. जे ८ टक्क्यांनुसार होणार आहे. ते २ ते ४ टक्के असाव हा सुध्दा मुद्दा घेतलेला आहे आणि नियमानुसार गाळेधारकांना नुतनीकरणच करून मिळाव. यासाठीचे मुद्दे शासन दरबारी प्रलंबित आहेत. माझ्या माहिती प्रमाणे महापौर महोदया या विषयासंदर्भात आपले आदरणीय पालकमंत्री गुलाबभाऊ यांनी सुध्दा नुकताच गाळेधारकांना शब्द दिला होता की या विषयाचा शासन दरबारी प्रलंबित असलेल्या सगळया मुद्दयांचा मी स्वत: पाठपुरावा करणार आणि शासन दरबारातुन योग्य तो गाळेधारकांच्या हिताचा निर्णय लवकरच करून आणण्याकामी आपल्याला मदत करणार. तर असा आपल्या पालकमंत्र्यांनी शब्द दिलेला असतांना आणि हे सगळे विषय शासन दरबारी प्रलंबित असतांना आमची अशी मागणी आहे . महापौर महोदया आपल्याला अशी नम्र विनंती आहे की आजचा हा एवढा महत्वाचा विषय असा घाईघाईने निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. ही ऑनलाईन महासभा आहे. कोरोना मुळे आपल्याला त्या अडचणी आहेत. आपण ऑफलाईन घेवु शकणार नाही महासभा पण म्हणुनच एक अनौपचारीक बैठक घेवुन त्यामध्ये या विषयाची महत्वाचे जे सर्वपक्षीय पदाधिकारी आहेत आणि जे सर्वपक्षीय गटनेते आहेत. त्यांच्यासोबत सांगोपांग चर्चा व्हावी आणि तदनंतरच एका निर्णयाप्रत आल्यानंतर यासाठीचीच स्वतंत्र महासभा आयोजित करण्यात यावी. तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवावा. अशी भारतीय जनता पक्षाची स्पष्ट मागणी आहे याची आपण नोंद घ्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर महोदया, आता शुचिता ताईंनी या संपुर्ण गाळेप्रश्नावरती स्वयंस्पष्ट चर्चा केल्याचे दिसुन येते आहे. परंतू गेल्या ९ वर्षापासुन हा प्रश्न प्रलंबित आहे. यामुळे गाळेधारकांच नुकसान झालेलेच आहे. यापुर्वीच्या काही चुकीच्या धोरणांमुळे परंतु भविष्यात या महानगरपालिकेच सुध्दा अतोनात नुकसान होतो आहे. आपण जस म्हटलांत की घाईघाईने बोलावलेल्या सभेमध्ये हा निर्णय घेण कितपत योग्य आहे. गेल्या अडीच वर्षापासुन आपणही या महानगरपालिकेमध्ये सत्ताधारी पक्ष म्हणुन काम करत होतात. एखाद्या विषयाचा अडीच वर्षामध्ये जर उलगडा होवु शकला नाही आणि संपुर्ण कालावधी ९ वर्षाच्यामध्ये याचा उलगडा होवु शकला नाही. प्रशासन वारंवार याच्या मध्ये उच्च न्यायालयाने निवाडे दिलेले आहेत, सर्वोच्च न्यायालयाने निवाडे दिलेले आहेत. राज्य शासनानेही याच्या नियमामध्ये दुरूस्ती करून दिलेली आहे आणि या उपरांत याच्यावर किती चर्चा करायची. मला वाटत की यांच्याबाबतीत सहानुभुती ही सर्व पक्षांचीच आहे. आपली जशी सहानुभुती आहे तशीच आमची सुध्दा सहानुभुती आहे. परंतू एखाद्या निर्णयाला कितीपर्यंत ताटकळत ठेवण हे मला वाटत की हे काही संयुक्तीक नाहीये. याच्यासंदर्भातला राज्य शासनाच्या दरबारी मा.ना.गुलाबरावजी पाटील साहेब आणि महापौर ताई आणि उपमहापौर कुलभुषणभाऊ हे सगळे या दृष्टीकोनातुन प्रयत्नशिल आहेत. ज्या दिवशी राज्य शासन याच्या संदर्भामध्ये दिलासा देण्याच्या संदर्भामध्ये जी काही भुमिका निर्धारीत करेल. निश्चितपणे या गाळेधारकांना त्यांचा लाभ देण्याच्या संदर्भात त्या दृष्टीकोनातुन सकारात्मक विचार केला जाईल म्हणुन प्रशासनाने पाठविलेला प्रस्ताव मला वाटत या घडीला मान्य करून घ्यावा आणि नंतर ज्या काही राज्य शासनाकडे आपल्याला कैफीयत आपल्याला मांडायच्या असतील त्या निश्चितपणे मांडुन गाळेधारकांना न्याय देण्याच्यासाठी आपण आमदार महोदय असतील , पालकमंत्री महोदय असतील, महापौरताई असतील , उपमहापौर असतील आणि गाळेधारकांचे प्रतिनिधी यांच्यासोबत मा.ना.एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या दालनामध्ये बैठक करून यासंदर्भात गाळेधारकांच्या व्यथा आणि महानगरपालिकेकडुन होणारे त्यांना जे काही सहकार्य लागेल भविष्यात ते सुध्दा करून देण्याच्या संदर्भात तयारी या संपुर्ण सभागृहाची राहील एवढी ग्वाही मी या प्रसंगी देतो आणि प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा ही विनंती करतो.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाजप म्हणुन विषय तहकुब ठेवावी अशी आमची मागणी आहे . महापौर महोदया याची नोंद घेण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे कुलभुषण भाऊ आपण हा विषय मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** हो भाऊ सदरील विषयाला माझ अनुमोदन आहे. नगरसचिव साहेब आपण विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाजप म्हणुन तटस्थ हे मत नगरसचिव साहेब आपण नोंदवुन घ्याव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** घ्या पुढचा विषय घ्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब विषय क्रं. २ मध्ये

**श्री.भगतराम बालाणी :-** हॅलो भारतीय जनता पार्टीचे तटस्थ म्हणुन मत नोंदवुन घ्यावे. महापौरताई नगरसचिव साहेब आवाज येतोय का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे तटस्थ म्हणुन आपण यांची नोंद घ्यावी आणि प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि पुढील विषयाला सुरूवात करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयाला

**मा.महापौर :-** सदरील विषयाला ४२ सन्मा.सदस्य यांचा पाठींबा आहे त्यामुळे बहुमताने हा विषय मंजुर करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक , ठिक आहे ताई , पुढील विषय घ्यावा.

**नगरसचिव :-** विषय क्रं. ३

**ॲड . शुचिता हाडा :-** ताई एक मिनिट, नगरसचिव साहेब एक मिनिट मी आपल्याला थांबवु ईच्छिते सध्या सभागृहामध्ये ५४ सदस्य ऑनलाईन दिसता आहेत. तर ४२ सदस्यांचा पाठींबा आहे. हे जे म्हंटलेले आहे महापौरताईंनी तर ताई ते फक्त कृपया सभागृहासमोर स्पष्ट कराव. भारतीय जनता पक्ष यामध्ये तटस्थ आहे. त्यामुळे ४२ सदस्य फक्त स्पष्ट करण्यात यावे अशी विनंती आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऑनलाईन सभेत महापौर महोदया

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया,

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया ऑनलाईन सभेमध्ये ५१ नगरसेवक उपस्थित दिसतात त्यामध्ये ४२ , या विषयासाठी आता ५० नगरसेवक उपस्थित दिसत आहेत.

**मा.उपमहापौर :-** आम्हाला ईथे राजुभाऊ आपल्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितताई आपली जी भुमिका आहे ती आम्ही मान्य केली आहे तटस्थची आणि आम्ही बहुमताने तो प्रस्ताव पारीत करीत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण पुढच्या विषयाला सुरूवात करूया.

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ , नितीनभाऊ, नितीनभाऊ आम्ही जी तटस्थची भुमिका मांडलेली आहे . माझी फक्त मागणी आहे ईथे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण जे ४२

**मा.उपमहापौर :-** आपल्याला विनंती आहे की आपण जर थोडी शांतता ठेवली तर आपल्याला सांगता तर येईल की किती सदस्यांच याला अनुमोदन आहे आणि किती सदस्यांनी याच्या बाजुने मतदान केलेले आहे किंवा किती जणांना हा विषय मंजुर आहे. तरी आपण थोडी शांतता ठेवली तर ते लक्षात येईल.

**ॲड . शुचिता हाडा :-** कुलभुषणभाऊ मला फक्त माहिती हवी आहे की,

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितताई , शुचितताई

**ॲड . शुचिता हाडा :-** कुलभुषणभाऊ मला फक्त कुलभुषणभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितताई मी काय म्हंटल

**ॲड . शुचिता हाडा :-** कुलभुषणभाऊ आपण जे बहुमताने मान्य करत आहात ४२ सदस्यांचे नांव सभागृहात फक्त डिक्लीयर करावे एवढी फक्त एकच मागणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही शुचितताई मी काय म्हणतो की आपल्या ज्या सदस्यांचा विरोध असेल ना त्यांच आपण लेखी पत्र नंतरही दिले तरी चालेल.

**मा.उपमहापौर :-** ज्या सदस्यांच्या

**श्री.जितेंद्र मराठे :-** ऑनलाईन सभेसाठी मा.महापौरताई

**मा.उपमहापौर :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की या विषयाला ज्या सदस्यांचा विरोध असेल त्यांनी तसे लेखी कळवावे.

**ॲड . शुचिता हाडा :-** कुलभुषणभाऊ , नितीनभाऊ

**श्री.जितेंद्र मराठे :-** नाही महापौरताई ,आपण महापौर ताई , उपमहापौरसाहेब आपण

**मा.महापौर :-** ज्या सदस्यांना आपल मत नोंदवायचे असेल.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपण ऑनलाईन मतदान घेणे आपण ज्यावेळेला महापौर निवड होती . त्यावेळेला आपण ऑनलाईन मतदान केलेले आहे.तर आपण आताही ऑनलाईन मतदान करून घ्याव. प्रत्येक सदस्यांकडून ज्यांला मतदान करायचे असेल . मला सांगा भारतीय जनता पार्टीचे जर २० नगरसेवक आता ऑनलाईन आहेत आणि तुम्ही ५५ पैकी ४२ जणांचे बहुमत सांगताहेत ते कशावरुन म्हणताहेत तुम्ही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई यांच लेखी निवेदन घेवुन घ्याव की कुणाकुणाचे सदस्यांचा या ठरावाला विरोध आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** जितुभाऊंनी जे मांडलेले आहे

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिट मा.नगरसचिव साहेब, मा.महापौरताई ज्या विषयाला

**मा.महापौर :-** आपली मागणी फेटाळण्यात येत आहे आणि ज्या नगरसेवकांना विरोध नोंदवायचा असेल त्यांनी लेखी नगरसचिव साहेब यांच्याकडे द्यायचे आहे. नगरसचिव साहेब पुढचा विषय घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घेण्यात यावा .

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई , आपल्याला विनंती आहे

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरसचिव साहेब ,मा.महापौर साहेब जे ऑनलाईन मिटींगला जे ऑनलाईन सदस्य असतील त्यांचेच मत नोंदवावे . नगरसचिवांना मी विनंती करतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ऑनलाईन महासभा असल्यामुळे प्रत्येक विषयाला जे सदस्य ऑनलाईन उपस्थित असतील त्यांचेच मत नोंदवल जाव . हि ऑनलाईन सभा आहे जे ऑनलाईन नसतील त्यांचे मत नोंदवले जावु नये हि माझी हरकत या ठिकाणी नोंद करून घ्यावी हि विनंती .

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे महापौर ताई पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौर ताई , नगरसचिव साहेब आपण ज्यावेळेला महापौर , उपमहापौर निवडीच्या वेळेला आपण ज्यावेळेला आपण ऑनलाईन मतदान पध्दती राबवली होती. त्याच्यामध्ये आपण ऑनलाईन जितके सदस्य असतील त्यानुसार आपण आपले मतमोजणी केली होती. त्याचप्रमाणे आजचेही त्याप्रमाणे आपण कराव.

**ॲड . शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब आपल्याला माझी विनंती आहे. भारतीय जनता पार्टी यामध्ये तटस्थ या भुमिकेत आहे अस आमच्या गटनेत्यांनी आत्ताच सांगीतलेले आहे. मी पुनश्च या विषयाबाबत आपल्याला विनंती करते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ताई आपली विनंती मान्य करण्यात आलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, जे सदस्य लेखी देतील त्यांच मत नोंदवुन घेण्यात याव आणि पुढच्या सभेच्या कामकाजाला सुरूवात करण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ऑनलाईन सभेचा अर्थ काय आहे भाऊ , ऑनलाईन सभेचा अर्थ काय.

**ॲड . शुचिता हाडा :-** आपण ऑनलाईन सभेचे जे सुचना पत्रक दिलेले आहे त्यात स्पष्ट नमुद केलेले आहे आपले काही लेखी म्हणणे असल्यास आपण

**श्री.इब्राहीम पटेल :-** आपण आपले म्हणणे मांडलेले आहे. आपण जे म्हणत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाई ऑनलाईन मतदान पध्दत म्हणजे काय आहे. आपण जरा याचा विचार करा.

**श्री.इब्राहीम पटेल :-** तुम्ही तुमची भुमिका मांडलेली आहे. बरोबर आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो पण बहुमत सिध्द होत नाहीये ना तुमच बहुमत सिध्द करा ना

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो ईबाभाई

**मा.उपमहापौर :-** अहो ईबाभाई आणि सर्व सदस्यांना विनंती आहे की

**श्री.सुरेश सोनवणे :-** आपले बहुमत सिध्द होत नाहीये.

**मा.उपमहापौर :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो ईबाभाई

**मा.उपमहापौर :-** आपण सर्वांनी थोडी शांतता ठेवावी. थोडासा टेक्निकल प्रॉब्लेम येथे निर्माण झालेला आहे. तरी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की जरा शांतता ठेवावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , महापौर साहेब

**श्री.जितेंद्र मराठे :-** आप्पा जाऊ द्या, जाऊ द्या ते सर्वांना फोन लावता आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** टेक्निकल प्रॉब्लेम निर्माण झाला आहे की निर्माण केला आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , मला बोलण्याची परवानगी मिळावी ही विनंती.
**श्री.जितेंद्र मराठे :-** नाही नाही त्यांचे फोन चालु झाले आता सगळयांना
**श्री.राजेंद्र पाटील :-** सदस्यांना फोन करण्यासाठी टेक्निकल प्रॉब्लेम निर्माण केला आहे वाटत.
**श्री. सचिन पाटील :-** टेक्निकल प्रॉब्लेम हा ईडी लावण्यासारखा नसतो. टेक्निकल तो टेक्निकल असतो.
**श्री.राजेंद्र पाटील :-** हा बर बर
**अॅड . शुचिता हाडा :-** आता जो विषय चाललेला आहे आणि या विषयावर दोन्ही पक्षांचे मत मांडण्यात आलेले आहे आणि त्यावेळेला फक्त ५५ सदस्य सभागृहात हजर होते. आता हळु हळु सदस्यांची संख्या ही वाढवण्यात येते आहे.
**मा.उपमहापौर :-** ताई आपल्याला माहिती असेल आपणच मागच्या ऑनलाईन मिटींग मध्ये ऑनलाईनच्या बाबतीत तक्रार केली होती. ती मिटींग चालु असतांना
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , अहो महापौर साहेब , महापौर साहेब
**श्री.इब्राहीम पटेल :-** बोला अप्पासाहेब
**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही
**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाई तुम्ही महापौर आहेत का ? ईबाभाई तुम्ही महापौर आहे का ?
**मा.उपमहापौर :-** विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.ज्या सदस्यांना
**श्री.जितेंद्र मराठे :-** मा.उपमहापौर साहेब
**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर महोदया , अप्पा बोलायचे म्हणताहेत ना , महापौर महोदया , महापौर महोदया
**मा.उपमहापौर :-** ज्या सदस्यांना मत नोंदवायच असेल किंवा विरोधात असेल तर तसे त्यांनी सन्मा.महापौरांकडे तसे लेखी पत्र देण्यात याव .
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , मला बोलण्याची परवानगी मिळावी ही विनंती.
**श्री.जितेंद्र मराठे :-** मा.उपमहापौर साहेब आपल्याला एक विनंती आहे की आपण आपले कामकाज करावे. पण आपल्याला एक विनंती आहे की आपण ज्या पध्दतीने आनलाईन सभेचे महत्व काय आहे. ऑनलाईन मतदान घ्याना तुम्ही
**श्री.राजेंद्र पाटील :-** आवाज बंद केला आता
**श्री.जितेंद्र मराठे :-** आणि आमचा माईक का ऑफ करता आहे बोलु द्याना आम्हाला
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , महापौर साहेब ,अहो महापौर साहेब
**श्री.इब्राहीम पटेल :-** अहो जितुभाऊ चालु आहे तुमचा माईक कुणी बंद केलेला नाहीये.
**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाई जावु द्याना.
**श्री.इब्राहीम पटेल :-** तुम्ही पण तेच करत होते आम्ही पण तेच म्हणत होतो की माईक बंद नका करू.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे , महापौर साहेब ऐकु येते आहे का ? महापौरांना ऐकु येते आहे का ? उपमहापौरांना ऐकु येते आहे का ?
**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अरे अप्पांला बोलु द्या हो .
**श्री.कैलास सोनवणे :-** तु शिफारस नको करू.
**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा माजी महापौरांकडे दादागिरी चालायची तुमची आता दादागिरी संपुष्टात आलेली आहे.
**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब , अहो महापौर साहेब.
**मा.महापौर :-** अप्पासाहेब , कैलास अप्पा थोडा वेळ शांतता ठेवा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, ताई मला बोलायची परवानगी द्या ताई
**श्री.जितेंद्र मराठे :-** अप्पा सगळयांना ऑनलाईन यायला लावता आहेत.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब
**श्री.जितेंद्र मराठे :-** अप्पासाहेब टेक्निकल प्रॉब्लेम असा आहे की ते आता सर्वांना जॉईन व्हायला सांगता आहेत.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब आम्हाला बोलु द्या.

**श्री. ललीत कोल्हे :-** महापौरताई पुढचा विषय घ्या.

**श्री.सचिन पाटील :-** महासभेचा वेळ वाया न घालता पुढचा विषय घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** पिंजऱ्यामधील मास्तर तुनतुना वायजवायला लागला रे भो

**श्री.सचिन पाटील :-** अप्पासाहेब . . .

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पासाहेब तुमची स्वप्नपुर्ती करतोय आम्ही हे तुम्हीच शिल्लक ठेवलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतोय.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलकुल भाऊ हे तुम्ही करताय तुमच्या हातानेच होवु द्या. तुम्ही फक्त आम्हाला बोलण्याची परवानगी द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा अडीच वर्ष तुमचेच ऐकले.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** कुलभुषणभाऊ

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलायचच नाही का आम्ही नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** बिलकुल बोलायला पाहीजे, परंतू कस आहे अनेक ७६ ते ७७ विषय आहेत ना आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो ते काही विषय नाही दोन मिनिटाचे विषय आहेत सगळे नितीनभाऊ काही विषय आहे की ते

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ , अहो नितीनभाऊ मान्य आहे की ७७ विषय आहेत पण आमच म्हणण काय आहे नितीनभाऊ की आपण आता मतदान घेतोय ना ऑनलाईन मतदान घ्याना ऑनलाईन पध्दतीने चालवतोय ना मिटींग नितीनभाऊ

**श्री.अश्विन सोनवणे :-** बोलायची परवानगी द्याना.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौर ताई पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हंटले की शुचिताताईंनी जी भुमिका मांडली ना आपण म्हणतोय ना तुमच्या सदस्यांचे लेखी निवेदनही दिले तरी ते मान्य करू ना आपण

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ नाही भाऊ मला एक सांगा ना भाऊ ऑनलाईन आपण ऑनलाईन सभा घेत असतांना मला सांगा त्या ठिकाणी ५५ सदस्य दिसताहेत आणि आपण म्हणताहेत की ४२ च मतदान आमच झालेले आहे आणि त्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे २५ नगरसेवक तिथे उपस्थित आहेत. कशावरून म्हणाव आपण सांगा बर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ जितके उपस्थित असतील त्याची खातरजमा करूनच मतदान होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग नितीनभाऊ बहुमत

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितके इकडेचे जेवढे सदस्य उपस्थित असतील तेवढ्यांचीच नोंद घेतली जाईल. जे उपस्थित नसतील त्यांच मतदान नोंदवल जाणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बहुमत , नितीनभाऊ निर्णय ,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रत्येक विषयाला जे सदस्य ऑनलाईन उपस्थित असतील ना त्यांची नोंद करा आमच हेच म्हणण आहे . आमचा काही वादाचा विषय नाहीये. ऑनलाईन सदस्य ज्या प्रत्येक विषयाला सदस्य ज्यावेळेस उपस्थित असतील त्यांच मत नोंद करण्यात याव. एवढी नगरसचिवांना आमची विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी ज्या वेळेला जितके सदस्य उपस्थित असतील ना त्याच प्रमाणे मतदान नोंदणी होईल. आपण आपले लेखी दिल्यानंतर नगरसचिव पडताळुन पाहतील आणि त्या पध्दतीनेच मतदान नोंदणी होईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो ना त्या पध्दतीनेच निर्णय होईल. आमच म्हणण फक्त विषय कुठुन सुरू झाला नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो त्याचेमध्ये असे आता विषय काय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** की त्यांनी सांगीतले की ५१ सदस्य उपस्थित होते ईथे आम्हीही ऑनलाईन सदस्य बघतोय ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो नगरसचिव महोदय सगळी त्यावेळेची परिस्थिती लक्षात घेवुन जितके सदस्य उपस्थित असतील तेवढ्यांचीच मतांची नोंदणी होईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो बस बस बस तेवढाच विषय आहे ना मग

**श्री.नितीन लढ्ढा :-** बर ठिक आहे महापौर ताई घ्या पुढचा विषय घ्या. महापौर ताई या पुढचा विषय घ्या. कुलभुषणभाऊ पुढचा विषय घ्या. पुढच्या विषयाला सुरूवात करण्यात यावी महापौरताई, कुलभुषणभाऊ पुढच्या विषयाला सुरूवात करण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ टेक्निकल प्रॉब्लेम आहे थांबुन जा थोडा वेळ

**मा.उपमहापौर :-** ते काय आहे एखादे दोन सदस्य जे अपडाऊन - अपडाऊन होताय. मग ते पण एक आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई

**मा.उपमहापौर :-** आयुक्त साहेब माझा म्हणायचा अर्थ काय आहे ज्या सदस्यांच्या सह्या घेतोय, त्यांच्यापैकी टेक्निकल याच्यामध्ये जो जॉईन दिसणार नाही. त्याच्या बाजुने करू नका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे. बरोबर आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब आपण हे नियम सुरूवाती पासुन राबवायला हवेत. आज नाही नव्याने सुरूवात केली पाहीजे हा नियम आता नव्याने कशाला सुरूवात करत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ तुम्ही गाडीत बसुन गाडी जोरात चालवता आहेत. घ्या महापौरताई ,महापौरताई पुढच्या विषयाला सुरूवात करण्यात यावी.

**मा.महापौर :-** बहुमताने विषय मंजुर पुढील विषयपत्रिकेवरील विषय घेण्यात यावा.

**सुन्नाबी देशमुख :-** महापौर ताई मले बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** घ्या पुढचा विषय घ्या.

(सन्मा.सदस्या . सुन्ना बी राजु देशमुख यांनी विषय क्रं. २ साठी दिलेली लेखी हरकत खालील प्रमाणे)

प्रशासकीय प्रस्ताव क्रं ०२ ला प्रशासनाचा ठराव मंजुर आहे, मात्र कोणत्याही न्यायालयाचा आदेशांचा अवमान होवु नये व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होवु नये याची प्रशासनाने दक्षता घ्यावी या अटीवर आमची मंजुरी आहे.

(भाजपा .सन्मा. गटनेते . श्री.भगतराम रावलमल बालाणी यांनी विषय क्रं. २ साठी दिलेले लेखी पत्र खालील प्रमाणे )

आज दि. १२/०५/२०२१ बुधवार रोजी ऑनलाईन महासभा क्रं. ३० चे सभा कामकाज सुरू असुन संदर्भीय विषयपत्रिकेतील विषय क्रं. २ बाबत आमच्या भारतीय जनता पार्टीच्या ऑनलाईन सभेस सहभागी असलेल्या एकुण १८ सदस्यांची भुमिका ही तटस्थ अशी असुन तशी नोंद ठराव पारीत करतांना नोंद घेण्यात यावी व तटस्थ म्हणुन इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी ही विनंती.

उपरोक्त पत्रावर मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी गटनेता यांचे पत्राप्रमाणे भाजपा १८ सदस्यांची विषय क्र.२ मध्ये तटस्थ म्हणुन नोंद घ्यावी व त्याप्रमाणे ठराव करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५८ पारित करण्यात आला.**

[illegible]

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत महासभा ठराव क्र.५९ दि.०७/१२/२०१८ अन्वये मान्यता मिळालेल्या वार्ड क्रं.१३ मधील पूढील दोन कामांचे सर्व्हे नंबर दुरुस्ती करणे, १) वार्ड क्र.१३ मध्ये स.नं.४५४ राकेश नगर ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे रक्कम रु.७२८८१५/- २) वार्ड क्रं.१३ मधील नुतन वर्षा कॉलनी मध्ये स.नं.४४५/२ब ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे रक्कम रु.११०६४५३/- मात्र चे कामांचे सर्व्हे नंबर दुरुस्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे मान्य करण्यात यावा, मा.महापौर साहेब दुरूस्ती मान्य करण्यात यावा पुढचा विषय घेण्यात यावा. मा.महापौर ताई विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ५३ सदस्य उपस्थित आहेत आता ऑनलाईनला

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील पुढील विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकाच्या विविध विकास कामांना रक्कम रु.५.०० कोटी अनुदान महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मनपा-२०१७/प्रक्र-१७० अ/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.२८/०३/२०१८ अन्वये वितरीत करण्यात आलेले आहे. त्या अंतर्गत खालील नमुद कामे समाविष्ठ करण्यास महासभा ठराव क्रं.५९ दि.०७/१२/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

**परिशिष्ठ -०१**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **रक्कम रु.** |
|---|---|---|
| १. | वार्ड क्र.१३ मध्ये स.नं.४५२ राकेश नगर ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे. | ७२८८१५/- |
| २. | वार्ड क्रं.१३ मधील नुतन वर्षा कॉलनी मध्ये स.नं.४४२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे | ११०६४५३/- |

वर नमुद दोन्ही कामांना शासनाने महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मनपा २०१८/प्रक्र-१७० अ (२७)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.२८/०२/२०१९ चे शासन निर्णया नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु असतांना सदर कामांच्या अंदाजपत्रकातील व ठरावातील सर्व्हे नंबर वेगवेगळे असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे सदरचे प्रकरणाचे निविदा प्रक्रिया आहे त्या स्थितीत आज मितीस आहे. सदर कामांच्या अंदाजपत्रकातील सर्व्हे नंबर खालील प्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

परिशिष्ठ -०२

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | वार्ड क्र.१३ मध्ये स.नं.४५४ राकेश नगर ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे. | ७२८८१५/- |
| २. | वार्ड क्रं.१३ मधील नुतन वर्षा कॉलनी मध्ये स.नं.४४५/२ ब ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे | ११०६४५३/- |

वर नमुद परिशिष्ठ -०१ व परिशिष्ठ-०२ पहाता परिशिष्ठ-०२ मधील नमुद कामांमध्ये दुरुस्ती होण्याकरीता महापौर यांनी पत्र दिलेले आहे. त्यात सदर दुरुस्ती बाबत ठराव येत्या महासभेत पारीत करण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने वर नमुद कामांचा दुरुस्तीचा प्रस्ताव अवर सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या कडेस पत्र क्रं.जशमनपा/प्रकल्प/२०१ दि.२२/१२/२०२० अन्वये सादर करण्यात आला त्यानुसार शासन शुध्दीपत्रक क्रं.मनपा-२०१८/प्र.क्र.१७०अ (२७)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.०५/०१/२०२१ अन्वये वर नमुद प्रमाणे परिशिष्ठ २ मधील नमुद कामांची दुरुस्ती करुन मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामी यापुर्वीच ई-निविदा प्रसिध्द करुन दिलेल्या मुदतीत मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ९.९९% कमीचे दर सर्वात कमी आले त्यानुसार रक्कम रु.१६,५१,९२५ मात्रचा अपेक्षित खर्च असुन सदरचा खर्च हा मुलभुत सोयी सुविधाचा विकास कार्यक्रम अंतर्गत प्राप्त रक्कम रु. ५ कोटी अंतर्गत खर्च करावयाचा आहे.

शासन शुध्दीपत्रक क्रं.मनपा-२०१८/प्र.क्र.१७०अ (२७)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.०५/०१/२०२१ अन्वये कामाच्या नावामध्ये दुरुस्ती झाल्याने उपरोक्त परिशिष्ठ-०२ मधील नमुद कामांमध्ये दुरुस्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच या कामी निविदा धारक विलास पी पाटील यांचे अंदाजीत रक्कमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्वीकृत करुन रक्कम रु.१६,५१,९२५/- मात्रची संविधा करण्यास व १% परफॉर्मन्स सिक्युरीटी रक्कमेचा भरणा मक्तेदार यांचेकडून करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** रोटरी क्लब ऑफ जळगांव स्टार्स मार्फत शिवाजीनगर जळगांव स्मशानभूमी सुशोभिकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.मयुर कापसे :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.मयुर कापसे :-** महापौरताई मला बोलायच आहे. चौथ्या नंबरच्या विषयावरती मला बोलायचे आहे. पिंप्राळा स्मशानभुमि विषयी मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला बोला बोला.

**नगरसचिव :-** विषय क्रं.

**श्री.मयुर कापसे :-** साहेब एक मिनिटं मला चौथ्या विषयाबद्दल बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला मयुरभाऊ बोला.

**श्री.मयुर कापसे :-** धन्यवाद मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपण आता बघतोय की कोरोना ची दुसरी लाट सुरू आहे. आपली जी नेरीनाका स्मशानभुमि आहे. ती आपण फिफ्टी पर्सेंट कोरोना साठी रिजर्व केलेली आहे. तर अशा वेळेस होते काय की जळगांव शहराच्या बहुतेक जे वृध्द, वयस्क किंवा इतर आजारी लोक वारतात किंवा मृत्यु पावतात. ते पिंप्राळा स्मशानभुमि मध्ये त्यांचा अंत्यविधी करण्यासाठी येतो व तिथे एक गोष्ट अशी की आपला नगरपालिकेचा कर्मचारी तिथे नाहीच आहे. अशा वेळेस होत काय की आपण बघतो की प्रशासनाने दिलेल्या नियमानुसार मोजक्या २० ते २५ लोकांमध्ये तो अंतिम विधी करावा लागतो. त्यामुळे होत काय की तिथे नोंद करणारे कोणी नसल्यामुळे नागरीकांना असे होते की त्या आमच्याकडे ते मृत्युचे दाखले घ्यायला येतात. तेव्हा ते नगरपालिकेत जमा करतात व आम्हीपण नागरीकांना नाही म्हणु शकत नाही ना आता परिस्थिती अशी आहे त्यामुळे ते आम्ही किती कन्फर्म करायचे की ते खरच मृत पावले आहे आणि असे दोन तिन घटना झालेल्यापण आहेत. अतुलभाऊंकडे की ती व्यक्ती जिवंत असतांना त्यांचा मृत्यु दाखला घ्यायला आलेले आहेत. तर मी आपल्याला एकच विनंती करतो की लवकरात लवकर तिथे आपले नगरपालिकेचे कर्मचारी २४ तास नियुक्त करण्यात यावा, जेणेकरून रहिवाश्यांचा व नागरीकांचा तो प्रॉब्लेम सुटेल व जो मिसयुज होईल मृत्यु दाखल्याचा तो पण होणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे. योग्य सुचना आहे प्रशासनाने काळजी घ्यावी.

**मा.महापौर :-** त्याठिकाणी आपला प्रशासनाचा कर्मचारी आहे त्याला सुचना देण्यात यावी.

**श्री.मयुर कापसे :-** तिथे कर्मचारीच नाही प्रशासनाचा ,ताई तिथे कर्मचारीच नाहीये प्रशासनाचा

**मा.उपमहापौर :-** मयुरभाऊ आपला तिथे प्रशासनाचा कर्मचारी आहे. आता आपण त्याला अपडेट करून आपण दिलेल्या सुचनांचे पालन करण्याचे सांगुन त्याला तिथे जास्तीत जास्त वेळ कोणत्या पध्दतीने देता येईल व त्याला काम करण्याच्या बाबतीमध्ये सुध्दा सुचना करण्यात येतील.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ आता तुम्हीपण त्याचा एरियात राहतात आता तुम्हीच सांगा. तिथे कर्मचारी राहतो का २४ तास

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.धिरज सोनवणे :-** मयुरभाऊ कागदावर असेल तो कागदावर असेल येईल तो हळुहळु तेथे येईल तो

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.धनराज कासट, अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ,जळगांव स्टार्स यांनी रोटरी क्लब ऑफ जळगांव स्टार्स तर्फे शिवाजीनगर जळगांव येथील स्मशानभुमी सुशोभिकरण करुन देणे बाबत प्रस्ताव दिलेला आहे.

अर्जदार यांचे प्रस्तावानुसार शिवाजीनगर स्मशानभुमी येथे प्रस्तावात नमुद केलेली कामे सदर संस्था विनामुल्य व स्वखर्चाने करुन देणार आहेत. रोटरी क्लब ऑफ जळगांव स्टार्स ही संस्था सामाजिक संस्था असुन प्रस्तावात नमुद कामे विनामुल्य करणार असल्याने मनपास कुठलाही आर्थिक भुर्दंड बसणार नसुन मनपाची बचत होणार असल्याने रोटरी क्लब ऑफ जळगांव स्टार्स यांना शिवाजीनगर स्मशानभूमी सुशोभिकरण करणेस परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** मौजे जळगांव शिवार स.नं.४१५/२ या जमिनीतुन जाणाऱ्या १८.०० मी रुंद विकास योजना रत्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे जळगांव स.नं.४१५/२ या जमिनीतुन जाणाऱ्या १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत या जमिनीच्या संपादनासंबंधी म.प्रा व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.सतिष सोमा भोळे यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने आरक्षणा खालील जमिनीचे संपादना बाबतची कार्यवाही करणे कामी माहीती खालील प्रमाणे

१) जळगांव शहराकरीता मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) शासनाने आदेश क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/ सी.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पसुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/ सी.आर.१०२ (ए)/०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

२) सदर मंजुर विकास योजना अहवालात मौजे जळगांव शिवार स.नं.४१५/२ या जमिनीतुन १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे अंदाजे क्षेत्र ५०७८.०० चौ.मी करीता दर्शविलेले आहे.

३) मनपा पत्र जा.क्र.नर/२०८४ दि.३१/१२/२०२० नुसार टी.डी.आर घेण्यात पत्र दिले असता अर्जदार यांनी टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला असुन भुसंपादन कायदा २०१३ चे तरतुदी नुसार भुसंपादन प्रक्रिया करुन मोबदला सर्व कायदेशीर लाभ मिळणे बाबतची मागणी केलेली आहे.

४) अर्जदार यांचे मालकीचे मौजे जळगांव शिवार स.नं.४१५/२ या जमिनीतुन जाणाऱ्या १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजे क्षेत्र ५०७८.०० चौ.मी. चे भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करणे (२वर्षाच्या मुदतीत) आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२० च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.१८८०/- प्रति चौ.मी. (१/१३१, पान नं.२८) इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| **आरक्षण क्र.** | **शिवार** | **स.नं.** | **भुसंपादन क्षेत्र** | **शि.सि.गणक दर/ चौ.मी.** | **अंदाजीत खर्च** |
|---|---|---|---|---|---|
| १८०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता | जळगांव | ४१५/२ | ५०७८.०० | १८८०/- | रु.९५,४६,६४०/-<br>+ रु.९५,४६,६४०/-<br>रु.१,९०,९३,२८०/- |

वरील प्रमाणे रु.१,९०,९३,२८०/- मात्र चे अपेक्षीत खर्च, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांचेकडेस पाठविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** भुसंपादन प्रस्ताव क्र.१८७/२०१७-जळगांव भुसावळ ४ थ्या रेल्वे मार्गासाठी संपादन मौजे जळगांव शहर येथील जमीन भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. ३७ च्या प्रस्तावाची कार्यवाही करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** या विषयाला माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिटं , एक मिनिट या विषयावर मला बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** या विषयावर मला बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** विषय क्रं. ७ .प्र.क्रं. २ अंतर्गत शिवाजी नगर भागात

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरसचिव साहेब , महापौरताई , नितीनभाऊ भुसंपादनाविषयी मला बोलायचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब आपण सगळयांचे मत विचारात घेवुन मग पुढचा विषय घ्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विषय क्रं. ६ बद्दल काही विचारायचे आहे ,काही माहिती सभागृहाकडुन जाणुन घ्यायची आहे. तरी परवानगी देण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला ताई बोला.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विषय क्रं. ६ मध्ये ईथे असे नमुद केलेले आहे की जळगांव भुसावळ रेल्वे मार्गासाठी ही जागा जाणार आहे. तर माझा आयुक्त महोदयांना ईथे प्रश्न आहे. आयुक्त महोदय मोठमोठ्या शहरांमधुन सुध्दा रस्त्यांच्या मधुन ज्यावेळेला मेट्रोच्या लाईन्स विकास कामांसाठी ठेवण्यात आलेल्या रस्त्यांच्या मधोमध जात असतात. त्यावेळेला आपण तशी ती जागा देत असतो. माझ्या माहिती प्रमाणे ह्या जागा ऑलरेडी या जमीन मालकांनी टिडीआर घेतलेला आहे. महापौर महोदया सभागृहाला माझा आवाज येतो आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** येतोय येतोय.

**ॲड . शुचिता हाडा :-** नाही कारण महापौर महोदय आणि आयुक्त साहेब बोलताहेत असं दिसतय त्यामुळेच मी आयुक्तांना प्रश्न विचारतेय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही बोला ताई येतोय आवाज.

**ॲड . शुचिता हाडा :-** जमीन मालकांना आपण ऑलरेडी टिडीआर दिलेला आहे. त्यामुळे आता मालकी महापालिकेची आहे. अस ईथे मला लक्षात येत आहे या कागदपत्रांवरुन . तर मग आपण फक्त कंन्पेनसेशन घेवुन महापालिकेला कंन्पेनसेशन मिळाव आणि या अटी शर्तींवर ही जागा आपण डायरेक्ट

**मा.महापौर :-** सन्मा .सदस्या शुचितााताई आपण या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा आणि त्यांच्याशी चर्चा करावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई , शुचितााताई

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई माझ्या काही शंकाचे उत्तर मिळाली म्हणजे झाल

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर ताई मलापण बोलायचे आहे या विषयावर

**श्री.नितीन लढ्ढा :-** एकच मिनिट मी शुचितााताईंच्या प्रश्नाचे समाधान करून देतो की मुळात १८ मिटरचा रोड हा महानगरपालिकेने टिडीआर च्या मोबदल्यामध्ये संपादन केलेला आहे काही संपादन अजुनही त्याच्यातील बाकी आहे. रेल्वे प्रिमायसेसला त्यांच्या चौथ्या लाईनचे एक्सपेंशन केल्यामुळे दोन मिटर जमीन ही सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन ही आपल्या याच्यामधुन आवश्यक आहे. परंतू येणारा जो काही भुसंपादनाचा मोबदला यापुर्वी महापालिकेने चुकवला असेल किंवा नियमानुसार जी काही भुसंपादनाची मोबदल्याची रक्कम होईल. ती रेल्वे प्रशासन महापालिकेला देईल आणि त्या अटी शर्तींवरच आपण दोन मिटरचा रस्ता जो आहे तो आपण रेल्वे प्रशासनाला हस्तांतरीत करूया आणि तशी हा ३७ चा प्रस्ताव आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि हा ३७ चा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेला जाईल. राज्य शासनाकडुन मान्यता होवुन आल्यानंतर जो काही भुसंपादनाचा मोबदला होईल. तो महानगरपालिका क्लेम करेल. महानगरपालिकेला त्याचा भुसंपादनाचा मोबदला मिळाल्यानंतरच सदरील जमीनीचे ते हस्तांतरण हे रेल्वे प्रशासनाला करण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हेच मत आहे आमच की कारण रेल्वेकडुन आपण महापालिकेचे काही करायचे म्हंटले की ते रेल्वेला पैसे भरायला म्हणतात. प्रत्येक विषयात आणि आपण कसा फुकट हा ठराव

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण फुकट देण्याच्या संदर्भात भुमिका घेतलेलीच नाहीये आणि फुकट देण्याच्या संदर्भात भुमिका त्यांनीही मागीतलेली नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कारण प्रस्तावात उल्लेख नाहीये की भुसंपादन करून मोबदला घेवुन देण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज कसे आहे की हा अजुनही ३७ चा प्रस्ताव आहे , कारण रस्त्याचे आरक्षण दोन मिटर बदलुन ती रेल्वे प्रशासनाला हस्तांतरीत करायची . तो ३७ चा फेरबदलाचा प्रस्ताव हा राज्य शासनाला मान्यतेला जाईल आणि मान्य होवुन आल्यानंतर भुसंपादनाचा जो काही मोबदल्याचा विषय असेल तो पुन्हा महासभेकडे येईल आणि तदनंतरच रस्ता हस्तांतरीत करण्यात येईल.

**ॲड . शुचिता हाडा :-** तेच विचारायचे होते नितीनभाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तसे ठरावातच उल्लेख करून घ्याना आत्ताच उल्लेख करून घ्याना की मोबदला घेवुन देण्यात येईल. प्रशासन बदलत राहते नितीनभाऊ, उद्या आयुक्तांवर प्रेशर केले तर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी आपण त्याच्या संदर्भात आपली जी सुचना आहे ना ती नोंद सुध्दा प्रस्तावामध्ये घेवु , ठरावामध्ये तशाप्रकारची नोंद घेवु. परंतू याचे सोपस्कार ३७ पुर्ण झाल्यानंतरच होणार आहे. तरी या ठरावामध्ये सुध्दा तुमच्या सुचना समाविष्ट करून घेवु.

**ॲड . शुचिता हाडा :-** जमीनीचे जमीन मालकांनी टिडीआर घेतल्यामुळे त्यांचे कंम्पेसेशन महापालिकेला मिळेल याची नोंद प्रशासनाने घ्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की ताई नक्कीच नक्की

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी. एस.३५८८/१९४/ सि.आर-९७/ युडी-९ दि.०६/०१/१९९३ अन्वये सुधारीत विकास योजना जळगांव (जुनी हद्द) मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि.१५/०२/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) शासनाने आदेश क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर. १४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर.-१०२ (ए) /०३ युडी-०९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

भुसंपादन अधिकारी यांचे पत्र क्र./भुसंपादन/जळगांव-भुसावळ/एसआर/१८७,दि.०९/१०/२०२० मध्ये नमुद खालील दर्शविलेल्या जमिनी गट/स.नं./महानगरपालिकेच्या नावे असुन उक्त विकास योजने मध्ये खालील प्रमाणे आरक्षित आहेत.

| अ.नं. | संपादन होणाऱ्या जमिनी गट नं. | संपादन खालील क्षेत्र | विकास योजने नुसार प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | ४८७/अ/१/२ | ०.०७ | २४ व १८ मी रुंद वि.यो.रस्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ४८८/२ | ०.०६ | १८ व १५ मी रुंद वि.यो.रस्ता |
| ३ | ४९०/२/२ | १०४.०० चौ.मी | १८ मी रुंद वि.यो.रस्ता |
| ४ | ४९७ | ०.०९ | १८ व १५ मी रुंद वि.यो.रस्ता |

वर नमुद उक्त जमिनी विकास योजना रस्त्याने बाधित असुन, महानगरपालिकेने हस्तांतरणीय विकास हक्क च्या मोबदल्यात सदरच्या जमिनी विकास योजना रस्त्याकरीता ताब्यात घेतलेल्या आहेत. सदयस्थितीत सदर विकास योजना रस्ते महानगरपालिकेच्या मालकीचे आहे.

सदर भागामध्ये वाहतुकीचे नियोजन हे सुयोग्य पध्दतीने व्हावे या करीता सदरचे रस्ते विकास योजनेत प्रस्तावित करण्यात आले होते. विकास योजनेचा हा उद्देश विचारात घेऊनच या भागातील अस्तित्वात असलेली वाहतुक व भविष्यात निर्माण होणाऱ्या वाहतुकीची कोंडी या बाबी विचारात घेऊन विकास योजने मधील सदर रस्ते हे टी.डी.आर स्वरुपात मोबदला देऊन महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले आहेत व त्या नुसार मनपाचे नाव ७/१२ वर लागलेले आहेत. सदरच्या रस्त्याखालील क्षेत्र हे जर भुसंपादन खाली घेतले गेल्यास विकास योजनेचा उद्देश सफल होणार नाही व भविष्यात या भागामध्ये वाहतुक व दळणवळणाची कोंडी होईल ही बाब विचारात घेता विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र संपादीत करु नये. अशा आशयाचे पत्र मनपा जा.क्र./नर/५३६ दि.१७/११/२०२० अन्वये भुसंपादन अधिकारी यांना दिलेले आहे.

दि.२४/१२/२०२० रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खाली आयोजीत बैठक मध्ये ठरल्यानुसार रेल्वेचे प्रतिनिधी,उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचे प्रतिनिधी व महानगरपालिकेचे प्रतिनीधी यांनी संयुक्तरित्या पहाणी करुन क्षेत्र निश्चित करावे व तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करणे बाबत सुचीत केल्याने दि.२४/१२/२०२० रोजी संयुक्त पहाणी केलेली असुन वस्तुदर्शक नकाशा सादर केलेला आहे. असे भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगांव यांनी पत्र क्र.भुसंपादन/जळगांव-भुसावळ/एसआर/१८७ दि.१८/०१/२०२१ चे पत्रान्वये महानगरपालिकेस कळविलेले आहे.

रेल्वे विभागाकडील पत्र क्र.DY.CE (C) /BSL/JL-BSL 4th line, Date-20/02/2021 नुसार रेल्वे विभागाने जागा मागणीचा सुधारीत प्रस्ताव सादर केला असुन तो खालील प्रमाणे,

| अ.नं. | संपादन होणाऱ्या जमिनी गट नं. | संपादन खालील रस्त्याची रुंदी (अंदाजे) | विकास योजने नुसार प्रयोजन |
|---|---|---|---|
| १. | ४९०/२ | २.०० मीटर | १८ मी रुंद वि.यो.रस्ता |
| २. | ४९०/२/२ | २.०० मीटर | १८ मी रुंद वि.यो.रस्ता |
| ३. | ४९०/२/१ | २.०० मीटर | १८ मी रुंद वि.यो.रस्ता |
| ४. | ४९१ | २.०० मीटर | १८ मी रुंद वि.यो.रस्ता |

वर नमुद विकास योजना रस्त्यामधुन २.०० मीटर रुंदी प्रमाणे अंदाजे २०० मीटर लांबी साठी एकुण ४०० चौ.मी. जागा रेल्वे लाईन साठी, रेल्वे विभागास मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

रेल्वे विभागास आवश्यक असलेली जागा १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्यातील असल्याने विकास योजना रस्त्याची रुंदी २.०० मीटर ने कमी होऊन १६.०० मीटर उपलब्ध होईल.

वर नमुद केल्यानुसार रेल्वे विभागास जागा देणेस व विकास योजना रस्त्याच्या रुंदी मध्ये फेरबदल करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ नुसार प्रस्ताव शासनास सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच रेल्वे विभागाकडून जागेचा मोबदला घेवून भुसंपादनाची कार्यवाही करण्यात यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** प्रभाग क्रं.०२ अंतर्गत शिवाजी नगर भागात श्री कंक यांच्या घरापासुन ते क्रांती चौका पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२३,२८,४१६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** मान्य आहे विषयपत्रिकेवरील पुढील विषय घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजी नगर पुलाचे काम सुरु असल्याने श्री कंक यांच्या घरापासुन ते क्रांती चौक या रस्त्यावरुन सर्व वाहतुक सुरु असुन रस्ता खडीचा असल्याने जास्त वर्दळीमुळे नागरीकांना धुळीचा त्रास होत असल्याने दि.०८/०३/२०२१ रोजी या भागातील नागरीकांनी रस्ता बंद आंदोलन करुन वाहतुक पुर्णपणे बंद केली होती. सदर रस्ता त्वरीत डांबरीकरण करावयाचा असल्याने प्रभाग क्रं.०२ अंतर्गत शिवाजी नगर भागात श्री कंक यांच्या घरापासुन ते क्रांती चौका पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२३,२८,४१६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** कोविड-१९ च्या मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील के-सेक्टर मधील OS-१० (८१७२८) या जागी तात्पुरत्या स्वरुपात स्मशानभूमी उभारणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** ८ नंबरचा प्रस्ताव मान्य आहे पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सार्व आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.१४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ हा दि.१३मार्च २०२० पासून लागू करुन खंड ३,२,४ मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमीत करणेत आलेली आहे. त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून आपल्या कार्यक्षेत्रात कोविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांना घोषीत करण्यात आलेले आहे.

तसेच जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात व जळगांव जिल्हयात देखीत गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे कोरोनाचा संसर्ग आटोक्यात आणणे कामी विविध उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत कोरोना संसर्गाचे मृत झालेल्यांवर अंत्यसंस्कार करणेसाठी नेरी नाका स्मशानभुमी आरक्षीत करण्यात आलेली आहे.

नेरीनाका स्मशानभूमी येथे आजमितीस २४ ओटे व १ गॅस दाहिनी सुरु आहे. परंतू सध्याचे परिस्थितीतमध्ये कोविड-१९, कोविड संशयीत, इ. कारणांमुळे होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण वाढलेले असल्यामुळे नेरीनाका स्मशानभुमी मधील २४ ओटे सुध्दा कमी पडत आहेत. तसेच कोरोना संसर्गाचा वाढता प्रादुर्भाव पाहता सदर व्यवस्था अंत्यसंस्कार करणे कामी तोकडी पडत आहे. तेव्हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३२१ नुसार प्रेतांची विल्हेवाट लावणेसाठी नव्या जागांची तरतूद करता येते. तसेच स्मशानभुमीची व्यस्था करण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे. तेव्हा तात्पुरत्या स्वरुपात स्मशानभुमी उभारणी करणे कामी महाराष्ट्र औदयोगीक विकास महामंडळ,जळगांव यांचे अखत्यारितील के-सेक्टर मधील खुली जागा OS-१० (८१७२८) ही योग्य असल्याचे एम.आय.डी.सी.एरिया मॅनेजर यांच्या समवेत आयुक्त यांनी केलेल्या पाहणी दरम्यान दिसून आलेले आहे. करिता नव्याने कोविड-१९ स्मशानभुमी करिता सदरची जागा तातडीने अधिग्रहित करणेबाबत जिल्हाधिकारी यांना दि.२०/०४/२०२१ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

करीता कोविड-१९ च्या मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील के-सेक्टर मधील OS-१० (८१७२८) या जागी तात्पुरत्या स्वरुपात स्मशानभूमी उभारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** जळगांव महानगरपालिका व मक्तेदार वॉटरग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांच्यात असलेल्या वादाबाबत Arbitration & Conciliation Act १९९६ च्या तरतूदीप्रमाणे Arbitrator & Conciliator (लवाद व मध्यस्थ) नेमणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई
**मा.महापौर :-** विषय मान्य आहे १० नंबरचा विषय घेण्यात यावा.
**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया विषय क्रं. ९ वर बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** ९ नंबरचा विषय मान्य आहे पुढील विषय घेण्यात यावा.
**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई विषय क्रं. ९ वर बोलायचे आहे.
**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई
**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई बोलायचे आहे.
**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई

(भाजपा सन्मा. गटनेते . श्री.भगतराम रावलमल बालाणी यांनी विषय क्रं. ०९ साठी दिलेले लेखी पत्र खालील प्रमाणे)

आज दि. १२/०५/२०२१ बुधवार रोजी ऑनलाईन महासभा क्रं. ३० चे सभा कामकाज सुरू असुन संदर्भीय विषयपत्रिकेतील विषय क्रं. ०९ बाबत आमच्या भारतीय जनता पार्टीच्या ऑनलाईन सभेस सहभागी असलेल्या एकुण २१ सदस्यांची भुमिका ही ठरावाच्या विरोधात असुन आमचा या विषयाला विरोध नोंदवुन तशी नोंद ठराव पारीत करतांना घेऊन इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी ही विनंती.

सदर पत्रावर मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी गटनेता यांचे पत्राप्रमाणे भाजपा २१ सदस्यांचा विषय क्र.०९ ला विरोध नोंदवावा व त्याप्रमाणे ठराव करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना ५ वर्ष कालावधी करीता ...१.घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ.सर्व ठिकाणचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करुन सुका कचरा उतरविणे व ओला कचरा रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे कामी टिपींग फी दर रु.९४९.५०/- प्रती मे. टन प्रमाणे दरमहा देयक अदा करणेस तसेच शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार इ. साफ सफाई करणे करिता रु.५४३/- प्रती कामगार प्रमाणे पुरवठा करणे बाबत मक्ता देण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने दि.१६/.८/२०१९ पासून ९ वार्डांची व दि.२१/०८/२०१९ पासून संपूर्ण शहरातील काम सुरु करण्यात आलेले होते. करारनाम्याच्या अटी शर्तींप्रमाणे मक्तेदाराकडून घरोघरचा कचरा वेगवेगळा गोळा करणे व वाहतुक करणे मक्तेदारास बंधनकारक आहे. परंतु रस्ते साफ सफाई व गटार साफ सफाईचा जमा झालेला कचरा व कुंडीमधील कचरा वेळेत न उचलणे, आवश्यकतेप्रमाणे वाहन पुरवठा न करणे तसेच कामगार पुरवठा न करणे यासाठी दि.०१/१२/२०१९ ते दि.२९/०२/२०१९ मध्ये मनपाचे आरोग्य निरीक्षक/ युनिट प्रमुख व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी करारनाम्याच्या अटी शर्तीप्रमाणे खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई केलेली आहे.

| अ.क्र. | दिनांक | एकूण दंड |
|---|---|---|
| १ | दि.०१/१२/२०१९ ते दि.२१/१२/२०१९ | रु.७९,६२,१००/- |
| २ | दि.०१/०१/२०२० ते दि.३१/०१/२०२२० | रु.३७,५२,४००/- |
| ३ | दि०१/०२/२०२० ते दि.२९/०२/२०२० | रु.९२,८६,१००/- |
| | एकुण - | रु.२,१०,००,६००/- |

आरोग्य निरीक्षक/युनिट प्रमुख व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी दि.०१/१२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० पर्यंत केलेली दंडात्मक कारवाई मक्तेदारास मान्य नसल्याचे मक्तेदार यांनी पत्राव्दारे कळविले होते. तसेच करारनाम्याच्या अटी शर्तीप्रमाणे अट क्र.४४ नुसार वेतन अदा करतेवेळी वाहनांचे जी.पी.एस. ट्रॅकिंग रिपोर्ट, कामगारांचे वेतन केल्याबाबतचे बँक स्टेटमेंन्ट, कामगारांना पी.एफ. व ई.एस.आय.सी. भरल्याचे चलन सादर न केल्यामुळे सदर देयक अदयापही अदा केलेले नाही.

परंतु वारंवार पत्रव्यवहार करुन सुध्दा मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस,नाशिक या कंपनीने कामगार पुरवठा न केल्याने सर्व कचरा वाहने बंद राहून वाहनतळावर उभी असल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे शहरातील नागरीक, सन्मा.नगरसेवक यांच्या तक्रारी बऱ्याच प्रमाणात प्राप्त होत असल्यामुळे मक्तेदाराच्या ताब्यात असलेले म.न.पा. मालकीचे कचरा संकलन घंटागाडया आणि कचरा वाहतूकीसाठीचे कॉम्पॅक्टर, टिप्पर, ट्रॅक्टरलोडर म.न.पा.मार्फत दि.०६/०३/२०२० रोजी ताब्यात घेण्यात आलेले होते. त्यानंतर मनपाने शहरातील दैनंदिन साफ सफाई व घंटागाडीव्दारे घरोघरचा कचरा संकलन करुन कचरा डेपो मध्ये वाहतुक करणेचे काम सुरु ठेवले होते.

दि.२०/०६/२०२० अन्वये मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांनी पत्राव्दारे पुन्हा एकदा काम करण्यास इच्छुक असल्याची तयारी दर्शवून आमची सर्व यंत्रणा सज्ज आहे. आम्हांला काम करण्याची संधी उपलब्ध करुन दयावी असे पत्राव्दारे कळविले होते.

त्याअनुषंगाने दि.२१/०७/२०२० रोजी आयुक्त यांचे दालनात महापौर, उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, विराधी पक्षनेता व सर्व पक्षीय गटनेते तसेच सन्मा.सदस्य, उपायुक्त, मुख्यलेखा परिक्षक, मुख्यलेखा अधिकारी, सहा.आयुक्त, विधी सल्लागार यांची एकत्र बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. चर्चेअंती मे.वॉटर ग्रेस कंपनीस एक संधी देणे योग्य होईल. यावर सर्व उपस्थित सन्मा.सदस्य व पदाधिकारी यांनी एकमताने सहमती दर्शविली तसेच आयुक्त यांना सन्मा.सदस्य व पदाधिकारी यांनी म.न.पा.चे आर्थिक हित लक्षात घेवून पुढील कार्यवाही करण्यासाठी एकमताने प्राधिकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्याअनुषंगाने मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस,नाशिक या कंपनीस दि.०१/०८/२०२० पासून पुन्हा काम सुरु करण्याची संधी देण्यात आलेली आहे. दि.१४/०८/२०१९ रोजी मक्तेदाराने मनपास करुन दिलेल्या करारनामा अटी शर्तीप्रमाणे अट क्र. क) कराराचा कालावधी अ.क्र.४ मध्ये मक्तेदार व जशमनपा यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास यासंबंधी अंतिम निवाडा देण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना असेल व यासाठी Arbitration & Conciliation Act १९९६ च्या तरतूदी लागू राहतील असे आहे.

सदर कंपनीने दि.१३/०१/२०२०, दि.०४/०३/२०२०, दि.२२/०७/२०२० रोजीच्या पत्रामध्ये जळगांव महापालिकेत असलेला वाद निवारण्यासाठी करारनाम्यातील अटी शर्तीनुसार Arbitration & Conciliation Act १९९६ नुसार लवाद नेमण्याची मागणी केलेली असुन सदरचा वाद हा मक्तेदार व जळगांव शहर महापालिकेचा असल्याने व करारनाम्यात अंतिम निवाडा देण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना असल्याने आम्हांस न्याय न मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. Arbitration & Conciliation Act १९९६ त्या तरतुदीनुसार मा.सेवानिवृत्त न्यायाधिश किंवा

सेवानिवृत्त प्रधानसचिव दर्जाचे अधिकारी यांची नियुक्ती केल्यास त्यांचा येणारा निर्णय हा महापालिका व मक्तेदार दोघांस लागू राहील असे पत्रात नमुद आहे.

मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांच्या पत्रानुसार लवाद नेमणेबाबत विधी सल्लागार यांचे अभिप्राय मागितला असता तो पुढीलप्रमाणे :- Arbitration & Conciliation Act १९९६ मधील तरतुदी व त्यात वेळोवेळी झालेल्या दुरुस्तीनुसार करारनाम्यास पार्टी असलेली व्यक्ती किंवा संस्था लवाद / मध्यस्थ म्हणुन नेमली जाऊ शकत नाही त्यामुळे मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांची संदर्भीय पत्रातील आयुक्त यांच्या ऐवजी सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त प्रधानसचिव यांची लवाद म्हणुन नियुक्ती करण्याची मागणी रास्त आहे, असे मत आहे. तरी यानुसार आपल्या कार्यवाही मार्फत सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त प्रधानसचिव दर्जाचे अधिकारी यांचे नाव निश्चित करुन मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांना कळवुन त्यांची याबाबत (लवाद/मध्यस्थ म्हणून नियुक्तीबाबत) लेखी संमती घेणे आवश्यक आहे, असा अभिप्राय दिलेला होता.

त्यानुसार Arbitration & Conciliation Act १९९६ नुसार परस्पर संमतीने मध्यस्थ (Conciliator) नेमून कंपनी मार्फत सदर वादाबाबत सामोपचाराने मार्ग काढण्याची शक्यता पडताळून पाहणेसाठी सदर कंपनीला दि.२४/०७/२०२० रोजी पत्र देण्यात आलेले होते. सदर पत्रावरुन कंपनीने मध्यस्थ(Conciliator) नेमणूक करणेस सहमती दर्शविलेली आहे.

आयुक्त, उपायुक्त, सहा.आयुक्त (आरोग्य), मुख्य विधी सल्लागार अॅड आनंद मुजूमदार यांच्या बैठकीत Arbitration & Conciliation Act १९९६ च्या तरतूदीनुसार सेवानिवृत्त न्यायाधिश किंवा सेवानिवृत्त प्रधानसचिव दर्जाचे अधिकारी नियुक्ती करतांना जळगांव शहर महानगरपालिका तसेच मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स नाशिक यांचेशी हित संबंध नसलेल्या वेगवेगळया त्रयस्थ नावांवर चर्चा करण्यात आली. त्यामधून श्री.प्रकाश भगवान तिजारे, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या नावावर एकमत झाले. श्री.प्रकाश भगवान तिजारे यांनी Arbitrator & Conciliator (लवाद व मध्यस्थ) म्हणून काम करणेस तयारी दर्शविलेली असून याबाबत मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांना पत्र व्यवहार केले असता मक्तेदाराने श्री.प्रकाश भगवान तिजारे, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश यांना Arbitrator & Conciliator (लवाद व मध्यस्थ) म्हणून काम करु देण्याबाबत संमती दर्शविलेली आहे.

जळगांव महानगरपालिका जळगांव व मक्तेदार वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांच्यात असलेल्या वादाबाबत Arbitration & Conciliation Act १९९६ च्या तरतूदीप्रमाणे Arbitrator & Conciliator (लवाद व मध्यस्थ) म्हणून श्री.प्रकाश भगवान तिजारे, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश यांची नेमणूक करणेस व त्यांचेकडेस खालील विषय लवाद म्हणुन निर्णयासाठी सोपविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

श्री.प्रकाश भगवान तिजारे, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश Arbitrator & Conciliator (लवाद व मध्यस्थ) यांच्याकडे खालीलप्रमाणे विषय सोपविणेत येत आहे.

१. माहे डिसेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० मधील आरोग्य निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांच्या अहवालानुसार करण्यात आलेला दंड व त्यामुळे प्रलंबित असलेले देयक.
२. माहे डिसेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० मधील आरोग्य निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांच्या अहवालानुसार करण्यात आलेला दंड व्यतिरिक्त उर्वरित देयक अदायगी करणेबाबत.

Arbitrator (लवाद) नियुक्ती प्रकरणी खालील अटी शर्तीचे मक्तेदाराकडून पूर्तता होणे आवश्यक आहे.

१. लवाद म्हणून सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचा लवाद कामकाजाचा खर्च उदा. मानधन, जाण्या-येण्याचा खर्च, कार्यालयीन खर्च, इ. येणारा खर्च अर्धा-अर्धा दोन्ही पक्षकार (महापालिका व मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक) यांनी करावा.

२. लवादाचे कामकाज प्रत्यक्ष सुरु करण्यापुर्वी मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांनी महापालिके विरुध्द मे.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेली याचिका क्र.W.P.S.T. 8926/2020 मागे घेणे बंधनकारक राहील.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ३४ प्रतिकुल मते :- २१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** हुडको कर्जापोटी शासनास भरावयाची बाकी राहिलेली एकुण रक्कम रु.७१,४१,६९,०००/- माफ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई बोलायचे आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** विषय क्रं. ९ वर बोलायचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई सदस्यांना बोलु द्या. महापौर ताई याला काय अर्थ आहे बोलुच देत नाहीयेत. महापौर ताई

**श्री.राजेंद्र पाटील :-** बोलायची संधीच देत नाहीत. बोलायचे आहे चर्चा करायची आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** काय करायचे आहे ते तुमच्या लेव्हलवर करून घ्यायचे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बोलायची संधी द्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सदस्यांना कमीत कमी बोलु तर द्या. याच्या आधीच्या महासभा आपण कशा अटेंड करत होतात. कमीत कमी विरोधातील सदस्यांचे मत जाणुन घेत होते ना आपण

**श्री.धिरज सोनवणे :-** आम्हाला बोलु द्या ना म्हणा.

**मा.महापौर :-** शुचितताई बोला तुम्ही

**श्री.राजेंद्र पाटील :-** बोलण्याची परवानगी देण्यात यावी. ९ नंबरच्या विषयावर बोलायचे आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई बोलण्याची परवानगी द्यावी.

**श्री.धिरज सोनवणे :-** आम्हाला बोलु द्याना म्हणा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सदस्यांना बोलायची परवानगी का देत नाही आपण

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** बाकी सदस्यांनी शांतता ठेवायची आहे. शुचितताई तुम्ही बोला बोला . . . बोला

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया विषय क्रं. ९ बद्दल मी ईथे बोलते आहे. महापौर महोदया मुळात विषय ईथे असा आहे की महासभेचे काम काय असत. तर महासभा ही धोरणात्मक निर्णय घेवुन देण्याच काम असते. घनकचरा व्यवस्थापना संदर्भातला धोरणात्मक निर्णय महासभेने यापुर्वी घेवुन दिला होता. त्यानंतर जो काही प्रशासनाकडुन प्रस्ताव आला घनकचरा व्यवस्थापना बाबतचा प्रशासनाने ही जी निविदा प्रक्रीया राबवली. त्यानुसार जे प्रशासनाने डॉकेट महासभेसमोर पाठवल. त्यास नियमानुसार महासभेने मंजुरी दिली. त्यानंतर माझी विनंती आहे सगळयांना की कृपया

माईक बंद ठेवावा. तरच सगळ मी काय बोलतेय हे ऐकू जावु शकेल. महत्वाचा विषय आहे आणि जे मी बोलतेय त्याची नोंद इतिवृत्तात येणे आवश्यक आहे. कृपया सहकार्य कराव. महापौर महोदया, तर विषय असा आहे की प्रशासनाने पाठविलेल्या डॉकेटनुसार नियमानुसार महासभेने हे काम मंजुर करून दिल आणि त्यानंतर प्रशासनाने प्रशासकीय अधिकारात ॲग्रीमेंट केल. प्रशासकीय अधिकारात त्यांनी जे ॲग्रीमेंट तयार केलेल आहे. ते महासभेसमोर तपासण्यासाठी किंवा मंजुरी साठी पाठविण्यात आलेल नव्हत. सदरच्या ॲग्रीमेंट मध्ये जर काही चुका प्रशासनाकडुन झालेल्या असतील. तर त्या चुकांची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची आहे. कारण प्रशासनाने स्वत:च्या प्रशासकीय अधिकारात हे ॲग्रीमेंट केलेल आहे. त्यामुळे आता येथे भारतीय जनता पार्टी म्हणुन मी भुमिका मांडते आहे की त्या ॲग्रीमेंटमध्ये जी काही दुरूस्ती करायची आहे. ती प्रशासनाने स्वत:च्या अधिकारात करावी. मुळात हा विषय महासभेसमोर आणण्याची कोणतीही गरज ईथे नव्हती. प्रशासनाने करारनामा केला, प्रशासनाला त्याच्यात चुक वाटते आहे, प्रशासनाला ती चुक दुरूस्त करायची आहे. करारनामा तुम्ही तुमच्या प्रशासकीय अधिकारात केलेला आहे. त्या चुकीची दुरूस्ती सुध्दा तुम्ही तुमच्या प्रशासकीय अधिकारात करायला हवी. महासभेसमोर हा विषय आणण्याची कोणतीही गरज नाही. प्रशासनाने धोरण तुम्हाला एकदा ठरवुन दिलेल होत. सभागृहाने तुम्हाला घनकचरा व्यवस्थापनाचे धोरण ठरवुन पुढचे अधिकार तुमच्याकडे दिलेले आहेत. ते अधिकार आपण वापरा आणि मला वाटत आपले आयुक्त साहेब प्रशासकीय अधिकार वापरण्यात फार वाकबगार आहेतच. तर त्यांनी त्यांचे अधिकार वापरावे आणि या विषयाबद्दलचा पुढील निर्णय घ्यावा आणि हा महासभेसमोरचा विषय नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टी म्हणुन आम्ही या विषयात तटस्थ ही भुमिका जाहीर करत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध ना

**श्री.अश्विन सोनवणे :-** विरोध आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** विरोध आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध आहे.

**मा.महापौर :-** बहुमताने प्रस्ताव मान्य आहे पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय, आयुक्त साहेब , नगरसचिव साहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरसचिव साहेब या विषयाला फक्त ५७ सदस्य दिसता आहे. या विषयाला फक्त ५७

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब आवाज येतोय का आपल्याला

**श्री.राजेंद्र पाटील :-** ५५ सदस्य दिसता आहे.आता फक्त ५६ सदस्य दिसताहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आयुक्त साहेब हा प्रस्ताव शासनाने मांडलेला आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हा प्रस्ताव शासनाचा आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** प्रशासनाचा प्रस्ताव हा योग्यच असतो अस नाहीये.

**मा.महापौर :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आम्ही शासनाच्या निर्णयाशी सहमत आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौर ताई , महापौर ताई आपण हा ठराव

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब आमचा आवाज येतोय का, अहो नगरसचिव साहेब आवाज येतोय का आपल्याला

**मा.महापौर :-** १० नंबरचा विषय घेण्यात यावा.

**श्री.भगतराम बालाणी :-** नगरसचिव साहेब आम्हाला या विषयाला विरोध नोंदवायचा आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०) हुडको कर्जापोटी शासनास भरावयाची बाकी राहीलेली एकूण रक्कम रू.७१,४१,६९,०००/- माफ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.**

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. १० मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरची सभा
**मा.महापौर :-** विषय मंजुर पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर ताई ,
**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरचा विषय नगरसचिव साहेब बोलु द्या.
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, मला विषय क्रं. १० मध्ये बोलायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेस हुडको मुंबई या वित्तीय संस्थेकडून सन १९८९ ते २००१ या कालावधीत २०४.४६ कोटी कर्ज मंजूर झाले होते. हुडको मुंबई या वित्तीय संस्थेकडून विविध विकास योजनाकामी २१ योजनांना रु.१४१.३४ कोटी कर्ज प्राप्त झालेले होते.

तत्कालिन नगरपालिकेने नियमीत कर्जफेड न केल्याने नगरपालिकेस थकबाकीदार घोषीत करण्यात आले. हुडको संस्थेकडून घेतलेल्या कर्जास शासनाने हमी दिलेली असलयाने कर्ज हप्ते वसुलीबाबत हुडको कडून शासनास वारंवार तगादा करण्यात येत होता त्यामुळे शासनाकडूनही नगरपलिकेस कर्ज हप्ते भरण्याबाबत निर्देश देण्यात येत होते.

दि.०४/०७/२०१९ रोजी निर्माण भवन येथे आयुक्त, मनपाचे सनदी लेखापाल, हुडको अधिकारी यांच्या दरम्यान झालेल्या चर्चेनुसार डी.आर.टी. कोर्टाने दिलेली डिक्रीची रक्कम रु.३४०.७५ कोटी अधिक दि.०९/०८/२०१९ पर्यंत ९ टक्के व्याज रु.१२५.७३ एकुण रु.४६६.४८ कोटी त्या पैकी मनपाने दि.१९/१२/२०१२ ते ०९/०८/२०१९ पर्यंत भरलेली रक्कम रु.१९४.७५ वजा जाता दि.०९/०८/२०१९ रोजी देणे बाकी असलेली रक्कम रु.२७१.७३ चा प्रस्ताव मा.प्रधान सचिव (नवि-२) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना जा.क्र./जशमनपा/आका/५६१/१/२०१९ दि.१९/०८/२०१९ अन्वये पाठविला होता.

मा.प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी D.O.NO.JMC-२०१७/CR-१३५/UD-२५ दि.१६ ऑगष्ट २०१९ अन्वये मा.चेअरमन हुडको नवी दिल्ली यांना सदर प्रस्ताव पाठविला. सदर प्रस्तावावर विचार होवून हुडको मुंबई यांनी H/MRO/JMC-५२८/२०१९/८७९ दि.३ सप्टेबर २०१९ अन्वये रु.२५३.८१ कोटी मात्र एकरकमी भरणा करणे बाबत महानगरपालिकेस कळविले. त्याप्रमाणे शासनाकडून शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०१९/प्र.क्र./१७३/नवि-२५ मंत्रालय दि.६ सप्टेंबर २०१९ नुसार शासनाने जळगांव महानगरपालिकेने हुडको यांचे कडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासंदर्भात हुडको यांचा रु.२५३.८३३८ कोटीचा एकमुस्त परतफेड प्रस्ताव मान्य केला. या प्रयोजनासाठी जळगांव महानगरपालिकेस वितरीत करावयाचा रु.२५०.८३३८/- कोटी इतका निधी महानगरपालिका पायाभुत सुविधा निधी मधुन वितरीत करण्यात आला. शासनाकडून वितरीत करण्यात आलेल्या रु.२५०.८३३८ कोटी रकमेपैकी ५०% म्हणजेच रु.१२५.४१६९ कोटी इतकी रक्कम जळगांव महानगरपालिकेस देय असलेल्या वस्तू व सेवा कर भरपाई अनुदानातुन दरमहा रु.३ कोटी याप्रमाणे माहे ऑक्टोबर २०१९ पासून वसुल करण्यात येत आहे.

शासनाकडून वस्तू व सेवा कर अनुदाना पोटी मिळणाऱ्या रक्कमेतून दरमहा रु.३.०० कोटी मात्रची रक्कम शासन कपात करण्यात येते. शासनाकडे एकूण रक्कम रु.१२५.४१ कोटी इतक्या रक्कमे पैकी मार्च २०२१ अखेर रु.५४.०० कोटी एवढी परतफेड झालेली असून रक्कम रु.७१,४१,६९,०००/- शासनास अदयाप देय आहे.

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती सदयास्थितीत हलाखीची आहे.

• वस्तू व सेवा करा पोटी महानगरपालिकेस मिळणाऱ्या दरमहाच्या अनुदानातून हुडको कर्जा पोटी रक्कम रु.३.०० कोटी शासन कपात करुन घेते व उर्वरीत अनुदानातून दरमहाचे कर्मचारी वेतन, निवृत्ती वेतन इत्यादी साठी खर्च होत आहेत. त्यामुळे इतर विकास कामे करण्यास अडचणी येत आहे.

• महानगरपालिकेस म.न.पा.कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी देणी रु.५.४० कोटी, सहावे वेतन आयोग फरक रु.१.७५ कोटी, कर्मचारी महागाई भत्ता फरक रु.१.३७ कोटी थकीत रक्कमांचा फरक, महागाई भत्ता फरक रु.१.५० कोटी, रजा वेतन फरक रु.२.४२ कोटी, ग्रॅज्युटी फरक रु.५.५१ कोटी, परिभाषीत अंशदान रु.५.१० कोटी व म.न.पा. हिस्सा रु.७.३१ कोटी, कर्मचारी मृत्युनिधी रु.०.०७ कोटी, म.न.पा.शिक्षण मंडळाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन रु.३.११ कोटी व पेंन्शन रु.३.८२ कोटी तसेच म.न.पा.शिक्षण मंडळ इतर थकबाकी रु.३.४६ कोटी अशी मोठया प्रमाणात कर्मचारी थकबाकी देणी बाकी आहे.

• सदया महानगरपालिका कार्यरत व सेवा निवृत्त कर्मचारी यांना ६ वे वेतन आयोगा नुसार वेतन अदा करण्यात येत आहे. भविष्यात ७ वे वेतन आयोगा नुसार वेतन अदा करावयाचे झाल्यास महापालिकेवर मोठया प्रमाणात आर्थिक भार पडणार आहे.

• महानगरपालिकेच्या वाघुर पाणी पुरवठा पंपींग स्टेशन येथील उच्चदाब विदयुत देयक रु.६.०५ कोटी, पाणी देयक रु.८.६७ कोटी याची देखील देणी प्रलंबित आहे.

• महानगरपालिकेकडेस मक्तेदार व पुरवठादार यांची देणी रु.१७.२१ कोटी देखील थकीत आहे.

• शासनाचा अकृषकसारा रु.१३.०० कोटी, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण यांना अदा करावयाची रक्कम ही देणी देखील थकीत आहे.

उक्त नमुद बाबींपोटी सुमारे एकुण रक्कम रु.१३७.०० कोटी मात्रचे दायित्व महानगरपालिकेवर आहे सदर दायित्वामुळे शहरातील विकास कामावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

महानगरपालिका उत्पन्न वाढीसाठी कसोशीने प्रयत्न करीत आहे. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम होत आहे. महानगरपालिकेचा बंधनकारक खर्च व नागरी सुविधा वरील वाढता ताण यामुळे महानगरपालिका नागरीकांना आवश्यक त्या नागरी सुविधा योग्य प्रकारे पुरवू शकत नाही. त्यामुळे शहरातील नागरीकांचा रोष महानगरपालिकेस पत्करावा लागतो.

वरील बाबींचा विचार करता व महानगरपालिकेची हलाखीची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता हुडको कर्जापोटी शासनास भरावयाची बाकी राहीलेली एकूण रक्कम रु.७१,४१,६९,०००/- विशेष बाब म्हणून माफ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** महानगरपालिकेने विविध विकास कामी हुडको कडुन घेतलेल्या कर्जापोटी शासनास भरावयास शासन हमीची थकीत रक्कम रु.४७.४५ कोटी (दंडनीय व्याजासह) माफ करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब आपण आता सदर विषयावर चर्चा . . .

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.
**मा.**महापौर :- विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब आपण आपल्या
**मा.महापौर :-** सर्व सदस्यांनी शांतता ठेवावी मध्ये कोणीच बोलायचे नाही.
**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ सदस्यांनी बोलायच नाही का , नितीनभाऊ सदस्यांनी बोलायच की नाही का.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेस हुडको मुंबई या वित्तीय संस्थेकडून सन १९८९ ते २००१ या कालावधीत २०४.४६ कोटी कर्ज मंजूर झाले होते. हुडको मुंबई या वित्तीय संस्थेकडून विविध विकास योजनाकामी २१ योजनांना रु.१४१.३४ कोटी कर्ज प्राप्त झालेले होते. २१ योजनांपैकी १८ योजनांसाठी शासनाने हमी दिलेली होती. हमिची एकूण रक्कम रु.३,९४,८३,३९२.५२/- एवढी होती. सदर शासन हमी पैकी महानगरपालिकेने रु.५२,१६,४५५.१०/-एवढी रक्कम भरणा केलेली आहे. मंजुर कर्जानुसार शिल्लक शासन हमी पोटी रक्कम रु.३,४२,४५,८३५/- एवढी बाकी होती. सदर शासन हमी रक्कमेत दिवसेंदिवस दंडनिय व्याजासह वाढ होत आहे.

शासनाने सदर शासन हमी पुर्ण मंजूर झालेल्या कर्ज रक्कम रु.२००,५१,९४,०००/- यावर आकारलेली होती. परंतू महापालिकेस १८ योजनांसाठी १३७,४०,१५,०००/- एवढेच कर्ज प्राप्त झालेले होते. त्यामुळे सदर शासन हमी कमी करुन मिळणेबाबत शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला होता.

सन २००४ पासून शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.जमपा/२६०३/१६४२ प्र.क्र/१८६/०४ नवि-२६ दि.२३ ऑगस्ट २०१४ अन्वये सर्व कर्जांचे एकत्रीकरण होवून त्याची एकत्रीत रक्कम रु.१२९,९२,४६,१७०/- इतकी झाली असून त्यावर व्याजाचा दर ९% दराने थकीत कर्जाची परत फेड पुढील १५ वर्ष तिमाही या प्रमाणे ६० हप्त्यात करायची होती.

तसेच घरकुल योजनांसाठी शासन हमीचा दर प्रती रु.१००/- स रु.०.५० पैसे दर सहामाही व वाघूर पा.पु.योजनेस रु.१००/- स रु.२.०० सहामाही असा आहे. तथापी योजना क्र.१०५२, १२६६२, १२७५०, १२८५६ व १३२२८ यास आकारलेला दर रु.१००/-स रु.०.२० पैसे सहामाही असा आकारलेला असल्याने त्यानुसारच इतर सर्व योजनांसाठी आकारणी करण्यात यावी याबाबत पत्र व्यवहार केलेला असून आजपावेतो शासन हमी कमी करुन मिळालेली नाही.

तथापी वित्त विभाग पत्र क्र.हशुव-२०१२/ प्र.क्र.६४/रुण व हमी सनियंत्रण कक्ष दि.१९/०१/२०१६ व दि.०१/०४/२०१५ अन्वये दंडनिय व्याजासह रु.४२.३५७२ कोटी हमी शुल्काची मागणी केलेली आहे. कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांचे पत्र क्र.जमपा/२०१६/प्र.क्र.१९९/नवि-१५ दि.२८/१२/२०१६ अन्वये रु.४७.४५ कोटीची मागणी केलेली आहे. सदर शासन हमी रक्कम दिवसेंदिवस वाढत आहे.

महानगरपालिकेने शासनास हुडकोचे थकीत कर्ज एकरक्कमी भरणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव (नवि-२) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना जा.क्र./जशमनपा/आका/५६१/१/२०१९ दि.१९/०८/२०१९ अन्वये पाठविला होता. सदर प्रस्ताव मा.प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी D.O.NO.JMC-२०१७/CR-१३५/UD-२५ दि.१६ ऑगष्ट २०१९ अन्वये मा.चेअरमन हुडको नवी दिल्ली यांना सदर प्रस्ताव पाठविला. सदर प्रस्तावावर विचार होवून हुडको मुंबई यांनी H/MRO/JMC-५२८/२०१९/८७९ दि.३ सप्टेबर २०१९ अन्वये रु.२५३.८१ कोटी मात्र एकरकमी भरणा करणे बाबत महानगरपालिकेस कळविले. त्याप्रमाणे शासनाकडून शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०१९/प्र.क्र./१७३/नवि-२५ मंत्रालय दि.६ सप्टेंबर २०१९ व नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमान मनपा-२०१९/प्र.क्र./११९/नवि-१६ मंत्रालय मुंबई यांचे दि.०६ सप्टेबर २०१९ अन्वये सदर निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आलेला होता.

सदर प्राप्त निधीची प्राप्त रक्कम रु.२५०.८३३८ कोटी व माहे सप्टेबर २०१९ चा प्राप्त वस्तु सेवा अनुदानातील रु.३ कोटी रक्कम अशी एकुण रक्कम रु.२५३.८३३८/- हुडकोस दि.१३/०९/२०१९ रोजी RTGS/NEFT/ व्दारा भरणा करण्यात आलेला आहे. हुडको मुंबई यांचे पत्र क्र. H/MRO/JMC-५२८/२०१९/९२८ दि.१९/०९/२०१९ अन्वये संपुर्ण कर्ज परत फेड झाल्याबाबत प्रमाणपत्र जळगाव महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. सदर हुडको कर्ज शासनाने एक रक्कमी परत फेड केल्यामुळे हुडकोचे जळगांव महानगरपालिकेकडे कर्ज येणे नाही. शासनामार्फत सदर कर्जाला शासन हमी देण्यात आलेली होती. सदयस्थितीत हुडकोच्या संपुर्ण कर्जाची परतफेड झालेली आहे. शासनाने पत्र क्र.जमपा/२०१६/प्र.क्र.१९९/नवि-१५ दि.२८/१२/२०१६ अन्वये रक्कम रु.४७.४५ कोटी दर्शविलेली आहे व त्यात दिवसेंदिवस दंडनिय व्याजासह वाढ होत आहे. तरी सदर वाढ होणाऱ्या रक्कमेसह शासन हमीची रक्कम माफ करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** मनपा मालकीच्या जागेवर BOT तत्वावर स्वच्छतागृह बांधण्यास परवानगी मिळणेबाबत प्राप्त खाजगी संस्थांच्या अर्जाबाबत धोरण ठरविणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब , नगरसचिव साहेब आपण ज्यावेळेला हॅलो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला १० नंबरच्या विषयामध्ये बोलायच आहे.

**श्री.चेतन सनकत :-** विषय क्रं. १२ मध्ये रामदेव बाबा मागासवर्गीय मेहतर समाज बहुउद्देशिय संस्थेचे

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया, आम्हाला बोलायला का देत नाहीये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला १० नंबरच्या विषयामध्ये बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** १२ नंबरचा विषय चांगला विषय आहे.आपण मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब आपल्याला विनंती आहे की सभागृहात शांतता ठेवावी सदस्यांनी आपले माईक बंद ठेवायचे आहे सभागृहात काहीच ऐकू येत नाहीये.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला १० आणि ११ नंबरच्या विषयाबद्दल बोलु देत नाहीये. १० आणि ११ नंबरचे विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर महोदया आम्हाला का बोलू दिले जात नाहीये.

**मा.उपमहापौर :-** आपण , आवाज येत नाहीये माईक बंद ठेवावेत. आपण नंतर बोलायचे आहे आपल्या सर्वांना बोलायची संधी देण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रत्येक विषयाला बोलु द्यायच आहे.

**मा.उपमहापौर :-** आवाज येत नाहीये, सर्वांना विनंती आहे की सभागृहात शांतता ठेवायची आहे अप्पासाहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब माईक बंद करू नका. वारंवार माईक बंद करताहेत.

**मा.उपमहापौर :-** सभागृहात शांतता ठेवायची आहे अप्पासाहेब आपल्याला विषयाच्या बाबतीत आपल्याला मत मांडायचे आहे .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब ,

**मा.उपमहापौर :-** आपल्या गटनेत्यांनी त्याच्यावर लेखी पत्र दिलेले आहे.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब आपण आत्ताच बोलले.
**श्री.राजेंद्र पाटील :-** ज्या सदस्यांनी परवानगी मागीतली त्यांना परवानगी देण्यात यावी.
**मा.उपमहापौर :-** मी सांगतोय ज्या सदस्यांचा ज्या विषयाला विरोध आहे. अप्पासाहेब
**मा.महापौर :-** शांततेत घ्याना. शांततेत घ्याना.
**श्री.राजेंद्र पाटील :-** सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेब माईक बंद करू नका .
**मा.उपमहापौर :-** आपले मत मांडु देण्यासाठी आमची शंका नाही .ऐकुन घ्या.
**श्री.जितेंद्र मराठे :-** नगरसचिव साहेब , याच्या पुर्वीच्या सभा होत असतांना आपण विरोधी पक्षाचे मत विचारात घेत होते.
**मा.उपमहापौर :-** आपल्याला मत मांडु देण्यासंदर्भात आमची शंका नाही.

(ऑनलाईन सभा सुरु असतांना सभागृहात मा.गटनेते. भाजपा श्री.भगतराम रावलमल बालाणी , सन्मा.सदस्य श्री.अश्विन सोनवणे , श्री. कैलास सोनवणे , श्री.सदाशिव ढेकळे , श्री.विशाल त्रिपाठी , श्री.राजेंद्र पाटील हे सभागृहात मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेकडेस आपले म्हणणे मांडण्यासाठी एकत्र आले. या कारणामुळे सभागृहातील ऑनलाईन सभा कामकाज थोडया वेळेसाठी थांबलेले होते. यावेळी सदर सदस्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी त्याचे आसनासमोर उभे राहुन खालील प्रमाणे प्रत्यक्ष चर्चा केली.)

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही विषयावर बोलु का देत नाहीये. आम्ही आमच मत मांडायच नाही का ?
**मा.उपमहापौर :-** नाही नाही ऐकुन घ्या .आपल्या गटनेत्यांनी मी काय म्हणतोय आपण ज्या
**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान घ्याना तुम्ही
**मा.उपमहापौर :-** नाही नाही मतदान घेण्यासाठी
**श्री.जितेंद्र मराठे :-** मनमानी पध्दतीने आपण कामकाज करताहेत का ? नगरसचिव साहेब आपण याच्यापुर्वीच्या सभा आठवा ना.
**मा.उपमहापौर :-** मतदान घेण्याचा प्रश्न येत नाही ना. उपस्थित असलेल्या .
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्ही तुमच्या निवेदनात काय बोलले आहे. तुम्ही तुमच्या निवेदनामध्ये काय बोलले तुम्ही चुकले आहे आता तुम्ही काय बोलले, तुम्ही मागच्या महापौरांचे नांव घेतल. तुम्ही बोलायची परवानगी देता आहे का तुम्ही आम्हाला बोलायला. दहा दहा वेळा सांगताहेत आम्ही परवानगी मागतोय.
**श्री.भगतराम बालाणी :-** संधी द्या आम्हाला
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई आम्हाला गाळयांच्या विषयावरती आम्हाला भुमिका मांडायची आहे , ऑर्बीटेटरच्या विषयावर बोलायचे आहे तुम्ही परवानगी देत नाहीये. आम्ही कस काय करायचे.
**मा.महापौर :-** आपली भुमिका मांडुन घ्या.
**श्री.भगतराम बालाणी :-** पाच पाच मिनिटे बोलु द्याना ताई , महापौरताई पाच पाच मिनिटे बोलु द्या.
**मा.महापौर :-** हो हो
**श्री.ईब्राहीम पटेल :-** बोलो भगतभाई बोलो.
**श्री.विष्णू भंगाळे :-** भगतभाई
**श्री.ईब्राहीम पटेल :-** बोलो भगतभाई बोलो
**श्री.विष्णू भंगाळे :-** भगतभाई
**श्री.कैलास सोनवणे :-** आम्हाला का बोलु देत नाहीये.
**श्री.विष्णू भंगाळे :-** अरे काय चालु आहे. महापौर महोदय
**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्हाला बोलायची संधीच देत नाहीयेत.
**श्री.राजेंद्र पाटील :-** सदस्यांना
**मा.महापौर :-** कैलासअप्पा तुम्ही शांत व्हा , आपण बोलु
**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ आमचा म्हणायचा अर्थ हा आहे अप्पा
**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही डायरेक्ट निर्णय घेताहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** सभापती महोदय,

**मा.उपमहापौर :-** आम्ही पॉझीटिव्हली घेतले पाहीजे असे तुमचे म्हणणे आहे का, उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी आम्ही बहुमताने ठराव मंजुर केला आहे तो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमच काय म्हणण आहे.

**मा.उपमहापौर :-** उपस्थित असलेल्या सदस्यांपैकीच त्यांच्या सह्या आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** सह्या कुठे घेतलेल्या आहेत तुम्ही

**मा.उपमहापौर :-** तुमची मंजुरी आहे का?

**श्री.विष्णू भंगाळे :-** ऑनलाईन सभेचा हा

**श्री.अश्विन सोनवणे :-** ते सदस्य घरी आहेत आणि कश्या काय सह्या घेतल्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** सह्या सुरेशदादा घेत होता , सगळे गेले मध्ये

**श्री.अश्विन सोनवणे :-** काहीच गरज नाहीये ना

**मा.उपमहापौर :-** तुमच्या गटनेत्यांनी दिलेल्या पत्राशी तुम्ही सहमत नाहीये अस तुमचा म्हणायचा अर्थ असा आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही बिलकुल सहमत आहे आमच्या गटनेत्यांच्या पत्राला जे हजर आहेत त्यांचे तुम्ही मत नोंदवा.

**मा.उपमहापौर :-** विषय संपला

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान कस घेता आहे तुम्ही सांगा जे हजर आहे त्यांचे घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नगरसचिव साहेब मतदान कसे घेता तुम्ही त्याचे उत्तर द्या. तुम्ही पहिले सह्या घेणार असे कुठे मतदान राहाते का आता ४७ सदस्य फक्त हजर होते. ४७ सदस्यांचे बहुमत होते का त्यात आमचे २५ सदस्य झाले आहेत.

**मा.उपमहापौर :-** एकच मिनिट उपस्थित सदस्यांचे ,नगरसचिव साहेब सांगतील किती उपस्थित होते, नगरसचिव सांगतील आपल्याला आणि ते सर्व बाय रेकॉर्ड आहे. ऑनलाईन बाय रेकॉर्ड आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** रितसर विषय चालवायचा कोणत्या पध्दतीने घेता तुम्ही सांगा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बहुमत कोणत्या आधारे सिध्द करता आहेत तुम्ही, बहुमत कोणत्या आधारे सिध्द करताहेत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पहिले सह्या घेतल्या आहे या . ऑनलाईन मिटींगला ईथे कश्या सह्या

**श्री.राजेंद्र पाटील :-** बहुमत कोणत्या आधारे सिध्द करता आहेत.

**श्री.भगतराम बालाणी :-** बहुमत कुठल्या आधारे सिध्द करताहेत आपण

**श्री.कैलास सोनवणे :-** समजायला पाहीजे ना आम्हाला

**श्री.भगतराम बालाणी :-** किती लोक आहेत . किती लोकांचे बहुमत आहे कुठल्या आधारे सिध्द करताहेत आपण की तुम्ही ह्या सह्या घेवुन प्रत्येक विषय मान्य

**श्री.अश्विन सोनवणे :-** आदल्या दिवशी घेतलेल्या आहेत . एक दिवस पहिले घेतल्या आहेत. काय संबंध आहे. पण मग बाकीचे सदस्यांच्या सह्या घरी जावुन घेतल्या ना मग एक दिवस आधी घेतलेल्या आहे.

**मा.उपमहापौर :-** संबंधित सदस्य , नाही नाही जेवढे असतील तेवढेच जे सदस्य उपस्थित आहेत

**श्री.अश्विन सोनवणे :-** बहुमत कसे सिध्द कराल ते सांगा , ऑनलाईन सभेला तुम्ही बहुमत कसे सिध्द कराल ते सांगा.ऑनलाईन सभेला तुम्ही बहुमत कसे सिध्द करणार.

**मा.महापौर :-** ज्या कैलास आप्पा

**श्री.अश्विन सोनवणे :-** द्याना उत्तर.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्ही ऐकून घ्या, ताई तुम्हाला विनंती करतो .

**श्री.भगतराम बालाणी :-** यायला नको . .

**मा.महापौर :-** थांबा थांबा एक मिनिट

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्ही ऐकुन घ्या महत्वाचे विषय आहेत. महत्वाचे विषय काय आहे .त्याच्यामध्ये गाळयांचा विषय आहे एक , ऑर्ब्रीटेटरचा विषय आहे, बाकीचे सगळे विषय मंजुर होणार आहे ना , सगळे मंजुर होणार आहे. मग चर्चा नाही करणार का तुम्ही.

**श्री.धिरज सोनवणे :-** जे विषय चर्चेचे आहे त्याच्यावर मत मांडु द्या ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनिट ताई विजय पाटीलांनी जी पत्रकार परिषद घेतली आहे ताई अर्धे त्याच्यामधल सत्य आहे. नंतर हे घरकुलच्या टाईमाला तसेच झालेले आहे मी सांगतो. त्यांनी जेवढे शब्द बोललेले आहेत ना मी अनुभव घेतलेला आहे या ठिकाणी आणि जे नगरसेवक असतील ना त्यांच्या बायका मध्ये गेलेल्या होत्या. जे लोक आहे ना जे आलटी पालटीसन येता आहेत ऐकुन घ्या. कोणी विचारत नाही त्या ठिकाणी, इतके हाल होतात ना. अगोदर घरकुलचा विषय आला होता ना तो असाच आला होता की गरीबांना घर द्यायचे आहे आणि नंतर काय काय ठराव झाले त्याच्या नावाने तसाच हा आहे. ऑर्ब्रीटेटर नेमायला पाहीजे त्याच्यामध्ये नियमाप्रमाणे

**मा.महापौर :-** अप्पासाहेब ऐकुन घ्या, वॉटरग्रेसचा जो विषय आहे.

**मा.उपमहापौर :-** ते बोलता आहेत एक मिनिट त्यांना बोलु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठेकेदाराला न्याय मिळण्यासाठी आयुक्त कसे न्याय देतील जर कधी आयुक्तांशीच जर कधी वाद झाला तर म्हणुन तो जो लॅकोना राहीलेला होता मी स्वत: होता आणि म्हणुन मागे ठरलेले आहे की ऑर्ब्रीटेटर नेमावा लागतो. पण काय होत माहिती आहे का मागे असच झाल. ऑर्ब्रीटेटर नेमल्यानंतर सह्या झाल्या सगळयांच्या, आले म्हणजे जर पुढे काही घडले जे विजय पाटलांनी सांगीतलेल आहे त्यांनी बरोबर सांगीतलेले आहे आणि जर पुढे काही घडल आणि त्या ऑर्ब्रीटेटर ने जर त्याच्या म्हणजे काही मक्तेदाराच्या बाजुने निर्णय

**मा.उपमहापौर :-** निकाल दिला ,

**श्री.कैलास सोनवणे :-** देवुन दिला तर ७० ते ८० कोटीं देण्याचा विषय आहे. म्हणजे झाल सह्या करणारे मुळ विषय काय आहे. ठराव करणारे आले आणि झाले आरोपी संबंध नसतांना ते गेले जेल मध्ये कोणी विचारत नाही तिथे , जे गेलेले आहेत ना त्यांना विचारून घ्या.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब ऐका

**श्री.कैलास सोनवणे :-** ६० कोटी गेलेले आहे ६० कोटी आमचे ५ कोटी आहेत आणि

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब झाल का तुमच बोलण ,

**श्री.कैलास सोनवणे :-** ५५ तुमचे आहेत. ५५ तुमचे आहे.

**मा.उपमहापौर :-** ऐकुण घ्या. झाल का बोलण तुमच

**श्री.कैलास सोनवणे :-** सिध्द करा ना त्यांनी सांगीतल्याप्रमाणे सिध्द करा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ऑनलाईन सभेला तुम्ही बहुमत कसे सिध्द करणार ते सांगा ना तुम्ही ऑनलाईन ला जितके सदस्य हजर ते बहुमत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ऑनलाईन हजर असतील ते तुमच बहुमत , या अशा सह्या घेवुन घ्याल एक दिवस पहिले अस थोडी चालणार आहे.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब झाल बोलण , ऐकुण घ्या. ज्या सदस्यांना

**श्री.कैलास सोनवणे :-** ऑर्ब्रीटेटरच्या विषयावर तुम्ही आपला गाळयांचा विषय झाला ना आता

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब सदस्यांना

**श्री.कैलास सोनवणे :-** हे पहा आपला गाळयांचा विषय झालेला आहे आता त्याच्यावर आम्ही बोलत नाही . ऑर्ब्रीटेटरच्या विषयात तुम्ही बहुमत सिध्द करा.

**मा.महापौर :-** अप्पा ज्यांना विरोध नोंदवायचा असेल त्यांनी याला विरोध नोंदवावा.

**मा.उपमहापौर :-** विरोध नोंदवायचा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही ताई तुम्ही बहुमत सिध्द करा पहिले. बहुमत सिध्द करा. सिध्द करा पहिले.

**मा.उपमहापौर :-** नाही , नाही

(ऑनलाईन सभा सुरु असतांना सभागृहात मा.गटनेते.भाजपा श्री.भगतराम रावलमल बालाणी, सन्मा.सदस्य श्री.अश्विन सोनवणे, श्री. कैलास सोनवणे, श्री.सदाशिव ढेकळे, श्री.विशाल त्रिपाठी, श्री.राजेंद्र पाटील हे सभागृहात मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेकडेस आपले म्हणणे मांडण्यासाठी एकत्र आले होते.या कारणामुळे सभागृहातील ऑनलाईन सभा कामकाज थोडया वेळेसाठी थांबलेले होते.यावेळी सदर सदस्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी त्याचे आसनासमोर जाऊन प्रत्यक्ष चर्चा करुन मा.महापौर व मा.उपमहापौर यांचे आसनासमोरुन निघुन गेले. यावेळी सभा कामकाज थोडया वेळापुरते थांबलेले होते.)

(ऑनलाईन सभा थांबलेली असतांना सभागृहात सन्मा.सभागृहनेता. श्री.ललीत कोल्हे, विरोधी पक्ष नेता, श्री.सुनिल महाजन,श्री. नितीन बरडे सभागृहात आले व मा.महापौर व मा.उपमहापौर यांचे आसनासमोर जाऊन प्रत्यक्ष चर्चा करुन आसनासमोरुन निघुन गेले. यावेळी सभा कामकाज थोडया वेळापुरते थांबलेले होते.)

**श्री.मयुर कापसे :-** मिटींग चालु आहे मिटींग मध्ये आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हॅलो , हॅलो तिथे कोणीही एवढी गर्दी करू नये.

**मा.उपमहापौर :-** घ्या पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** ऑर्बीटेटर ला विरोध आहे ना त्यांचे ऐकुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अहो नगरसचिव महोदय

**मा.उपमहापौर :-** मग नोंदवला ना विरोध तुम्ही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौरताई तुम्ही सुचना करा की सभागृहाच्या बाहेर निघा म्हणाव.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभागृहाच्या बाहेर निघा. ऑनलाईन सभा आहे.

**मा.महापौर :-** चला सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होत आहे. प्लिज सगळया सभासदांनी सभागृहाच्या बाहेर जायाचय.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभा ऑनलाईन आहे की काय आहे ही सभा

**मा.महापौर :-** सर्व सभासदांनी सभागृहाच्या बाहेर जायचय.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ऑनलाईन सभा आहे तिथे कोणाला येवु देवु नका.परवानगी शिवाय सभागृहात कोणीही येवु नये.

**मा.महापौर :-** सर्व सदस्य प्लिज सभागृहाच्या बाहेर जायचय.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाहीतर सभागृहात घ्या सभा, ऑनलाईन आहे की काय आहे ही सभा

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** हॅलो ,काय म्हणता भाऊ , नाही भाऊ आज मी मिटींगमध्ये आहे महापालिकेत

**मा.उपमहापौर :-** त्यांनी तटस्थ भुमिका नोंदवलेली आहे त्यांची, पुढचा विषय घ्या. सभागृहाच्या कामकाजास सुरूवात करण्यात यावी.

(ऑनलाईन सभा सुरु असतांना सभागृहात मा.गटनेते.भाजपा श्री.भगतराम रावलमल बालाणी, सन्मा.सदस्य श्री.अश्विन सोनवणे, श्री. कैलास सोनवणे, श्री.सदाशिव ढेकळे, श्री.विशाल त्रिपाठी, श्री.राजेंद्र पाटील, सन्मा.सभागृहनेता. श्री.ललीत कोल्हे, विरोधी पक्ष नेता, श्री.सुनिल महाजन ,श्री. नितीन बरडे हे सभागृहात मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेकडेस आपले म्हणणे मांडण्यासाठी आले होते. या कारणामुळे सभागृहातील ऑनलाईन सभा कामकाज थोडया वेळेसाठी थांबलेले होते.यावेळी सदर सदस्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी त्याचे आसनासमोर जाऊन प्रत्यक्ष चर्चा करुन वरील सर्व सदस्य सभागृहाच्या बाहेर निघुन गेले.)

**मा.महापौर :-** सभागृहाच्या कामकाजाला सुरूवात करण्यात यावी आणि पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** कृपया सर्व सदस्यांना विनंती आहे सभागृहाच कामकाज सुरू करायचे असल्याने आपण सहकार्य करायचय. सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कामकाज सुरू करण्यात याव सभागृहाच

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला १२ व्या नंबरच्या विषयावर बोलायचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ईबाभाई उनको बोलो सभा चालु करो.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचा विषय घेण्यात यावा . गोराणे साहेब सभा सुरू ठेवा.गायब दिख रहे है येतो

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला १२ व्या नंबरच्या विषयावर बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** आपण उपस्थितांपैकी कस मतदान घेणार आहे. गटनेत्यांना विचारू

**श्री.ईब्राहीम पटेल :-** मेरेको दे दे बोलना भाई इतनी बडी तो पार्कींग लेके बैठा है. हा उधर जाने देना

**मा.उपमहापौर :-** आता जो विषय आहेत त्यामध्ये त्यांचे दोन मत आले आहेत. शुचिताताईंनी सांगतीले की तटस्थ आहे.

**मा.नगरसचिव :-** त्यानंतर विरोध नोंदवला.

**मा.उपमहापौर :-** कैलासअप्पांनी सांगीतले की अशी आमची भुमिका आहे ती ऐकून घ्या आधी. गाळेधारकांच्या संदर्भात जी आहे ती आमची भुमिका तुमच्या बाजुने आहे.

**मा.आयुक्त :-** हो ना मग कुलभुषण भाऊ आपण काय करायच की आपली जी नेहमीची जी पध्दत आहे ना तर आपण भगतभाईंना विचारण गरजेच आहे.

**नगरसचिव :-** विरोध आहे त्यांचा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** चला पुढचे विषय घ्या.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचे विषय घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय पुढचे विषय घ्या. अध्यक्ष महोदय पुढचे विषय घ्या.

**नगरसचिव :-** नाही नाही ऐकुन घ्या, पहिले सर्वांचे होवु द्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुढचे विषय चालु करा अहो. अध्यक्ष महोदय पुढचे विषय चालु करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढे याच्याबाबतीत काही जर का काही विषय झाला.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** सभेला सुरूवात करण्यात यावी.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ९

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. १२ सुरू होता.

**मा.उपमहापौर :-** नाही नितीनभाऊ त्या ९ नंबरचा जो विषय होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**मा.उपमहापौर :-** वॉटर ग्रेसच्या संदर्भातला त्याच्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे वेगळया वेगळया सदस्यांच्या वेगळया वेगळया भुमिका आल्या. एकाने सांगीतल तटस्थ एकाने सांगीतल विरोध आणि एकाने सांगीतल , तर त्यांना गटनेत्यांना बोलावुन त्यांच मतदान विचारात घेतल जाईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बर ओके ओके ओके

**मा.महापौर :-** विषय क्रं.९

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय पुढचे विषय घ्या. अध्यक्ष महोदय त्यांच्याच गटनेत्यांना विचारा ना बोलवुन वेळ वाया जातोय.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया , महापौर महोदया , महापौर महोदया

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया कितवा १० वा विषय चालु आहे का ? सॉरी १२ वा

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया ,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय चालु करा, मिटींग चालु करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** १३ वा विषय घ्या अध्यक्ष महोदय. आवाज येतोय का

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्य यांनी प्लिज थोडा वेळ शांतता ठेवायची आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय पुढचा विषय घ्याना. भगतभाई परत.

**श्री.प्रशांत नाईक :-** आदरणिय ज्येष्ठ नगरसेवक आलेले आहेत. भारतीय जनता पार्टीचे भगतभाई बालाणी त्यांची हितगुज चालु आहे महापौरांशी

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांच्याकडुन नांव विचारा , नांव विचारा

**श्री.प्रशांत नाईक :-** हा गाळे संदर्भात त्यांची भुमिका स्पष्ट करत आहेत ते त्यांच एक मत प्रशासनाच्या बाजुने आणि एक मत तटस्थच्या बाजुने विचार करताहेत ते आता, ते थोडया वेळातच सांगतील आपल मत काय आहे म्हणुन ज्येष्ठ नगरसेवक आहेत ते भारतीय जनता पार्टीचे.

(सन्मा.भा.ज.पा.गटनेते, श्री.भगतराम रावलमल बालाणी हे सभागृहात आले व त्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांचेशी चर्चा केल्यानंतर त्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांना विषय क्रं. ९ बाबत भारतीय जनता

पक्षाच्या सदस्यांचा विरोध असल्याची भुमिका स्पष्ट केली व विषय क्र.०९ ला भाजपच्या ऑनलाईन उपस्थित सर्व सदस्यांचा विरोध नोंदविण्यासंदर्भात विनंती केली व ऑनलाईन उपस्थित भा.ज.पा. सदस्यांचा विषय क्र.९ ला विरोध असल्याची भा.ज.पा. गटनेता यांची मागणी मा.महापौर यांनी मान्य केली.)

**श्री.विष्णु भंगाळे :-** गटनेतेच मत बदलवता येत त्यांचे

**श्री.प्रशांत नाईक :-** हो हो भगतभाईंची

**श्री.ईब्राहीम पटेल :-** भगतभाईंचे विचार मांडण्यात यावे आणि घेण्यात पण यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती लोकांचे गटनेते आहेत.

**श्री.प्रशांत नाईक :-** भगतभाई कोणत्या कारणाने सभागृहात आले होते हे इतिवृत्तात घेण्यात यावे.

**मा.महापौर :-** विषय पत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा. विषय पत्रिकेवरील विषय क्रं. ११ घेण्यात यावा.

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११) महानगरपालिकेने विविध विकास कामी हुडको कडुन घेतलेल्या कर्जापोटी शासनास भरावयास शासन हमीची थकीत रक्कम रु.४७.४५ कोटी (दंडनीय व्याजासह) माफ करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.**

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला महापौर महोदया , महापौर महोदया १० नंबरच्या विषयावर चर्चा करू देण्याची परवानगी देण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. ११ मान्य करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ११ वर बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अहो ते ११ वा विषय मांडत नाही त्यापुर्वीच परमीशन मागतात तुम्ही ११ वर अस काय करतात तुम्ही राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता १२ पर्यंत चालले गेले आणि तुम्ही म्हणताहेत की ११ मांडला नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विष्णुभाऊ ते बोलुच देत नाहीत ना

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ११ नंबरचा विषय चालु आहे राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** १० ला पण बोलु

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी शांतता ठेवायची आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तुम्ही सदस्यांचे मतपण विचारात घेत नाहीये. सदस्यांना बोलु पण देत नाहीत .सरळ सरळ तुम्ही पुढे जाताहेत

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषयपत्रिकेवरील विषय क्रं. १० आणि ११ साठी बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मत तर जाणुन घ्या सदस्यांचे

**मा.उपमहापौर :-** राजुभाऊ बोला बोला १० आणि ११ वर एकत्रच बोला. बोला

**श्री.प्रशांत नाईक :-** बोला राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय क्रं. १० आणि ११ साठी

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी शांतता ठेवायची आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय क्रं. १० मध्ये आपण म्हंटलेले आहे हुडकोचे कर्ज

**श्री.ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना आता मला बोलु द्या. नंतर कोणाला बोलायचे असेल बोलु शकतात. हुडकोचे कर्ज आपले भरून झालेले आहे. तरीपण आपण हुडकोचे कर्ज , हुडकोचे कर्ज उल्लेख करतात. आपल्याला शासनाने जी मदत केलेली आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना आता मला बोलुन घेवु द्या. नंतर आपण बोला सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की आपण वारंवार हुडको कर्जापोटी , हुडको कर्जापोटी हा शब्द वापरतात. आज

**श्री.ईब्राहीम पटेल :-** जळगांव शहराच्या लोकांची दिशाभुल केली.

**श्री.राजेंद्र पाटील :-** कोणी केली भाऊ, भाजपाने कोणी केली. मला बोलु द्या कृपया मध्ये बोलु नका. आता सव्वाशे कोटी रू. महाराष्ट्र शासनाने मदत केलेली होती आणि त्या मदतीच्या पोटी आपल्याला जीएसटीच्या माध्यमातुन जे अनुदान

मिळत. त्या अनुदानातुन आपला तिन कोटीचा हप्ता आपण महाराष्ट्र शासनाला देतोय आणि त्यापैकी सव्वाशे कोटीपैकी सुध्दा मला वाटत जवळ जवळ ६० कोटींच्या आसपास रक्कम आपली फेडली गेलेली आहे.आज ७० कोटींच्याही पेक्षा कमी तो आकडा असेल. आपण ७१ पकडतोय मला वाटत मागच्या महिन्याचे जर ३ कोटी जर मायनस झाले. तर ६८ कोटीच्या आसपास ती रक्कम आहे आणि ती आपल्याला शासनाने मदत केलेली आहे. ती शासनाने केलेली मदत आज ते जिएसटीच्या माध्यमातुन कट करून उर्वरीत अनुदान ते आपल्याला देताहेत. मग आपण हुडको कर्ज , हुडको कर्ज कशासाठी म्हणतात. तेच माझ्या लक्षात येत नाही तर आणि त्यांच्यानंतर विषय क्रं. ११ आता त्याच्यामध्ये कर्जापोटी शासनास भरावयाचे हमीची थकीत रक्कम ४७.४५ दंडनीय व्याजासह मला प्रशासनाला विचारायचे आहे. जर आपण याच्याबद्दल जर माहिती दिली. सभागृहात तर सर्व सदस्यांना याबाबत माहिती होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.राजुभाऊ मी तुम्हाला माहिती देतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** हो द्या , द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी रक्कम आपण आता म्हणतोय की विषय क्रं. ११ मधील ४७.४५ कोटी रक्कम जी आहे. ज्यावेळेला हुडको कडुन कर्ज घेण्यात आलेले होत. त्यावेळेला त्या कर्जाला राज्य शासनाने हमी दिलेली होती आणि हमी पोटी हमीसाठी जे शुल्क आकारल जात. त्या हमी शुल्काची रक्कम जी आहे ४७ कोटी ४५ लक्ष रूपये राज्य शासन महानगरपालिकेकडे त्याची सातत्याने मागणी करत असत. तर आपण राज्य शासनाला या ठरावाद्वारे राज्य शासनाला विनंती करतो आहे की हुडकोचे कर्ज आता जवळपास फेडण्यात आलेले आहे. आता उर्वरीत राहीलेली ४७ कोटी ४५ लक्ष रक्कम जी आहे ती राज्य शासनाने आम्हाला माफ करण्यात यावी. अश्या पध्दतीचा ठराव करून राज्य शासनाला विनंती करतोय.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नक्कीच भाऊ ते झाल पाहीजे माफ आपण प्रयत्न कराल आणि ते मिळवाल. आपल अभिनंदन परंतू हे ४७.४५ कोटी जे आहेत हे आपल्याला हमीची रक्कम आहे की ती दंडासहीत रक्कम आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही हमीची रक्कम आहे जी राज्य शासनाने कर्जापोटी जी हमी घेतलेली होती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही मग कंसामध्ये दंडनीय आहे ते काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही होना मी काय म्हणतो की हमीची रक्कम समजा दोन टक्क्यांप्रमाणे असेल. जी रक्कम एकत्रित झाली असेल. ती विहीत वेळेमध्ये न भरल्यामुळे त्याच्यावर व्याजाची किंवा जी दंडाची राज्य शासनाने केलेली असेल. आपण महानगरपालिकेच्या गाळेधारकांना बिल देतो आणि बिल जर का थकीत झाले तर आपण त्याच्यावर दोन टक्के शास्ती लावतो. त्या पध्दतीने राज्य शासनाने दंड व शास्तीसह ४७ कोटी ४५ लक्ष रूपये आपल्या कडे मागणी केलेली आहे आणि ती आपण माफी मिळविण्याच्या दृष्टीकोनातुन राज्य शासनाला विनंती करतोय.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपल्याला तसा राज्य सरकार कडुन पत्रव्यवहार झालेला आहे का राज्य शासनाला याच्यासाठी या रकमेसाठी

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो अधिकृत आकडे जे आहेत ते राज्य शासनानेच मागणी केलेले आकडे आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ओके ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी जी , घ्या विषय क्रं. १२

**मा.महापौर :-** विषय क्रं.११ मंजुर

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर, मंजुर

**मा.महापौर :-** विषय क्रं.१२ घेण्यात यावा.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** मनपा मालकीच्या जागेवर BOT तत्वावर स्वच्छतागृह बांधण्यास परवानगी मिळणेबाबत प्राप्त खाजगी संस्थांच्या अर्जाबाबत धोरण ठरविणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला चेतनभाऊ, बोला

**श्री.चेतन सनकत :-** सदर या प्रस्तावामध्ये २१ ठिकाणच्या जागा उल्लेख केलेले आहेत प्रशासनाच्या वतीने एकाच ठिकाणी जास्त संस्थांनी मागणी केलेली असल्याने काही ठिकाणी जास्त लोकांची मागणी आहे आणि काही ठिकाणी निरंक आहे म्हणजे काही ठिकाणी कोणी केलेलीच नाही मागणी

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हॅलो , हॅलो

**श्री.चेतन सनकत :-** श्री.रामदेव बाबा मागासवर्गीय मेहतर सामाजिक संस्था , महर्षी वाल्मिकी सफाई कामगार संस्था , जयदिप सुशिक्षीत बेरोजगार संस्था आणि निर्मल फाऊंडेशन आणि साई इंटरप्राईजेस यांचे पत्र आलेले आहेत. यांना मंजुरी देण्यात यावी अशी मी सुचना मांडतोय.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अध्यक्ष महोदया , मला सुचना करायची आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया.

**मा.महापौर :-** बोला भाऊ

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अध्यक्ष महोदया कमीत कमी टॉवर चौकापासुन ते अजिंठा चौफुली पर्यंत एकही शौचालय किंवा मुतारी नाहीये . तर भंगार बाजार किंवा अजिंठा चौफुली आहे. तिथे पण एखादा बिओटीचा प्रस्ताव आहे शौचालयाचे तर ते केले तर बर होईल.

**श्री.चेतन सनकत :-** ईबाभाऊ , ईबाभाऊ

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हो

**श्री.चेतन सनकत :-** अजिंठा चौफुली मध्ये आपण जयदिप सुशिक्षीत बेरोजगार संस्था यांनी मागणी केलेली आहे तर त्यांना आपण तिकडे किंवा

**श्री.ईब्राहीम पटेल :-** जास्त पुढे येतोय तो

**श्री.चेतन सनकत :-** किंवा मग ती सर्व यादी आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** जास्त पुढे येतोय तो

**श्री.चेतन सनकत :-** अजिंठा चौफुली

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया.

**श्री.चेतन सनकत :-** अजिंठा चौफुली आणि याच संस्थेने चित्रा चौक मध्ये पण मागणी केलेली आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हो भंगार बाजारचा

**श्री.चेतन सनकत :-** ऐका ना ईबाभाऊ याच संस्थेने चित्रा चौक मध्ये पण मागणी केलेली आहे. पण त्याठिकाणी जागा उपलब्ध नाहीये.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नही चेतन ईसके पहिले जो डाला था भंगार बाजारके कोपरे पर अपना एक शौचालय था.

**श्री.चेतन सनकत :-** हा ठिक है वो भी अपन

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अतिक्रमण मुळे ते तोडलेले आहे. तिथे जर घेतले तर बर होईल.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया.

**श्री.चेतन सनकत :-** ओके, प्रस्ताव प्रशासनाकडुन ते आल्यानंतर ते पण मान्य करून टाकु.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** चार पाच मार्केट आहेत तिथे तर तिथे घेतले तर बर होईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** ईबाभाईंची सुचना मान्य करण्यात यावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितााताई बोला.

**मा.महापौर :-** शुचितााताई बोला.

**श्री.चेतन सनकत :-** निर्मल फाऊंडेशन आणि साईराम इंटरप्राईजेसला आपण ते करून घेवु.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया , आता येथे चेतनभाऊंनी काही संस्थांचे नांव घेतले आणि या संस्थांना या कामांची मंजुरी देण्यात यावी असा प्रस्ताव मांडला. माझी प्रशासनाला अशी विचारणा आहे की एका ठिकाणीसाठी तिन ते चार संस्था ईच्छुक आहेत. त्यावेळेला जे नांव चेतनभाऊंनी येथे डिक्लियर केलेले आहेत. तर या संदर्भात प्रशासनाने काही क्रायटेरीया लावुन ही नांव निश्चित केलेले आहेत का ? काय क्रायटेरिया लावण्यात आला याची माहिती सभागृहाला मिळण मला वाटत जरूरीच आहे. प्रशासनाने कृपया येथे स्पष्ट कराव की जी नांव आत्ता येथे डिक्लियर करण्यात आलेले आहेत चेतनभाऊं कडून तर या संदर्भात आपण या नावांची निवड कोणत्या निकषांच्या आधारे केलीली आहे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब क्लिरीफीकेशन द्या या विषयावर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शाखा अभियंता :-** नमस्कार मी सभागृहाला अशी माहिती देवु ईच्छितो की आरोग्य विभागाकडे विविध संस्थांनी शहरामध्ये विविध ठिकाणी नागरीकांच्या सोईसाठी बिओटी तत्वावर बांधकाम करण्यासाठी संमती दर्शविली होती आणि त्या ठिकाणी ते स्वखर्चाने शौचालयाची व्यवस्था करून पे अॅन्ड युज तत्वावर सुविधा देणार होते. अशा या संस्थांचे अर्ज आले होते ते आरोग्य डिपार्टमेंट कडे गेले होते आणि आरोग्य डिपार्टमेंटने शहरामधल्या आवश्यक असलेल्या जागांची ३३ जागांची यादी बांधकाम विभागाला दिली होती आणि असे आदेशित केले होते की या जागा तांत्रिक दृष्टया व सर्व सोई युक्त आहेत किंवा नाही याचा अहवाल द्यायचा होता. त्या प्रत्येक जागेवर बांधकाम , नगररचना , पाणी पुरवठा आणि आरोग्य असे चौघे डिपार्टमेंटच्या प्रतिनिंधीनी जागेवर जावुन पाहणी केली आणि त्यापैकी २१ जागा या सर्व सोईयुक्त आणि ज्याठिकाणी सर्व सोई आहेत आणि त्या जागा मनपा मालकीच्या आहेत आणि त्या ठिकाणी बांधकाम करण शक्य आहे. अशा २१ जागा फायनल केल्या. त्या २१ जागांच्या अनुषंगाने त्यापैकी ज्या ज्या लोकांनी मागणी केलेली आहे. तो प्रस्ताव एकाच जागेवर अनेक संस्थानी मागणी केल्यामुळे त्यासाठी धोरण ठरविण्यासाठी हा प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे. त्यासाठी ८ जागांसाठी जास्त मागणी आहे आणि बाकीच्या जागा निरंक आहेत. तर एका जागेसाठी अनेक संस्थांनी मागणी केली आहे तर ती कोणाला द्याव त्यासाठी हा प्रस्ताव महासभेकडे पाठवला आहे आणि त्याच्यात आपण असही म्हंटल की आपण अशी जाहीर हे करू शकतो की ज्या जागा निरंक आहे त्याजागी कुठली खाजगी संस्था , सेवाभावी संस्था जर त्या ठिकाणी ईच्छुक असेल तर त्यांना देखील त्या निरंक असलेल्या जागी परवानगी देवु शकतो अशी मी सभागृहाला विनंती करतो .

**अॅड . शुचिता हाडा :-** माझा प्रश्न असा आहे ईथे आयुक्त साहेब की ज्या जागा चेतनभाऊंनी डिक्लियर केल्या कि या संस्था आणि या जागा आता मला तर लक्षात राहीलेल नाही कोणत्या संस्थांचे घेतले किंवा कोणत्या जागांचे घेतले. पण ते आता आलेले आहे आपल्यासमोर तर याला काय धोरण लावुन प्रशासनाने या जागा निश्चित केल्या. कारण प्रस्ताव ईथे असा आलेला आहे की सभागृहाने धोरण ठरवावे. हा विषय मुळात मी सभापती असतांना माझ्याच कार्यकाळात मी आणलेला होता. या ज्या जागांच्या स्पॉट व्हिजीट बद्दल आता आपल्याला आपल्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली. तर त्या स्पॉट व्हिजीट मी स्वत: या सगळया विभागांना सोबत घेवुन केलेल्या होत्या आणि ते फाईल त्यावेळेपासुन प्रलंबित होत की एकाच स्पॉट साठी चार ते पाच जण ईच्छुक आहेत. तर मग निवड कोणाची करावी या मुद्दयावर ते प्रलंबित होत. माझा कार्यकाळ संपल्यानंतरही मला फक्त हे जाणुन घ्यायच आहे की आपण आता जे ईथे डिक्लियर केल गेलेल आहे चेनतभाऊंकडुन कि हा स्पॉट आणि ही संस्था तर यासाठी आपण कसं ठरवल हा निर्णय काय निकष लावुन घेतला . आयुक्त साहेब आपण एखादा दुधाचा बुथसाठीची जेव्हा परवानगी देतो . त्यावेळेला सुध्दा अनेक गोष्टींची तपासणी आपण करतो. अनेक नियमावली आपण तयार केलेली असते. हे काम व्हाव हे तर माझ स्वप्नच आहे. महिला स्वच्छतागृह हे व्हायलाच हवे. माझा कोणत्याही संस्थेला विरोध नाही किंवा किंबहुना चेतनभाऊंनी जे नांव स्पॉट डिक्लियर केले. त्याबद्दलही कोणता आक्षेप नाही. फक्त सभागृहासमोर हे येण आवश्यक आहे. किंबहुना माझी अशी मागणी आहे की यासाठी एक सर्वपक्षीय समिती आधी स्थापन करा आणि काहीतरी निकषाचे धोरण ठरवा की सेवाभावी संस्थांना प्राधान्य दिल जाणार. त्यानंतर स्वंयरोजगार संस्था की सुशिक्षीत बेरोजगार संस्था कि महिला बचत गट हा काहीतरी क्रायटेरीया आपण येथे ठरवा आणि यासाठी सर्वपक्षीय एक समिती करा आधी डायरेक्टली असे नांव डिक्लियर करण. मग काय होणार आहे की ज्या कोणी विलींगली कोणी आपल्याकडे काम करण्यासाठी आलेल्या संस्था होत्या. त्यांच्यावर अन्याय झाला अस वाटण्याची शक्यता निर्माण होणार आहे. हे काम व्हायलाच हव आहे. हे काम लांबवण्याचा किंवा अडथळा आणण्याचा माझा अजिबात हेतू नाही. पण जेव्हा समाजाभिमुक काम आपण करतो आहे. त्यावेळेला ते तेवढच निरपेक्ष व्हाव एवढी एक प्रामाणिक ईच्छा आहे आणि म्हणुन फक्त माझी महापौर ताई आपल्याला विनंती आहे की जर जसे मी म्हणते आहे की अशी समिती स्थापन करणे आणि काहीतरी निकष ठरवणे आणि त्यानंतर जागा अलॉट करणे संस्थेला हे झालेल मला ईथ दिसुन येत नाहीये तर म्हणुन आज आपण निर्णय हा घ्यावा की सर्वपक्षीय एक समिती आणि त्या समितीने अगदी येत्या चार दिवसांत हे शॉर्टआऊट कराव. त्यांच्या संस्थेच्या कागदपत्रांची तपासणी करावी. त्यांना आपण आपली जागा देणार आहोत. एका खुप चांगल्या कामासाठी ही जागा आपण देणार आहोत. त्या संस्थेच मागच्या ३ वर्षांच ऑडीट आहे की नाही किंवा जे काही क्रायटेरीया आपल्याला ठरवायचा असेल. मी आता ३ वर्ष म्हंटल तो ३ वर्षच असला पाहीजे अस काही नक्कीच नाही. हे या समितीने ठरवाव आणि त्यानंतर नीपक्षपाती पणे सेवाभावी संस्थांना प्राधान्य देवुन या जागांच वाटप करण्यात याव अशी माझी ईथे सुचना आहे, आग्रही मागणी आहे. याची कृपया

महापौरताईंनी नोंद घ्यायची आहे. डायरेक्ट जागा ,स्पॉट आणि संस्थेच नांव आलेल्या पाच सहा नावांपैकी त्यासाठी आम्ही हे फायनल केल अस करण मला ईथ मला उचित वाटत नाही. तर यासाठीचा माझा हा जे मी सुचविलेले आहे ईथे आता समितीचा पर्याय आणि अगदी लवकरात लवकर चार दिवसांच्या आंत त्या समितीने निर्णय घ्यावा आणि तस करता येवु शकत आहे. तर ते नोंदवुन घ्यावं आणि त्यानुसार पुढची कार्यवाही व्हावी अस मला अपेक्षित आहे ताई

**श्री.चेतन सनकत :-** ताई मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** बोला चेतनभाऊ

**श्री.चेतन सनकत :-** याच्यामध्ये मी ज्या नावांचा उल्लेख केलेला आहे. शुचिताताईंना सांगू ईच्छितो की दरवेळेला आपण स्पॉट व्हिजीट साठी मीही आपल्या सोबत होतो. आपण आपले सन्मा.माजी महापौर भारतीताई सोबतही गेलेलो आहे. माजी महापौर सिमाताई सोबतही गेलेलो आहे आणि तुम्ही सभापती असतांना आपणही गेलेलो आहे. दरवेळेला आपण सोबत असायचो आणि ज्यांनी २०१५ पासुन ते आतापर्यंत पाठपुरावा केलेला आहे आणि वेळोवेळी मागणी केलेली आहे. अश्या संस्थांचे सर्व डॉक्युमेंटस माझ्याकडे उपलब्ध आहे हे मी तुम्हाला दाखवु ईच्छितो आणि काही आपले २१ स्पॉट मधुन आणि उरलेले जे आहे समजा माझ्या माहिती नुसार १२ ते १५ स्पॉट असे निरंक आहे की ज्या ठिकाणी कोणी मागणी केलेली नाही. अस म्हणजे मी याच्यामध्ये पत्र देणार आहे लेखी  आपण अस करतोय की यांना जे निरंक आहे कोणावर अन्याय होवु नये. म्हणुन ज्या निरंक राहीलेली आहे आपली जागा राहीलेल्या संस्थामधुन त्यांना तिकडे कुठेतरी स्थान देण्यात याव आणि त्यांचाही हेतू चांगला आहे. यांचाही हेतू चांगला आहे. आपण मांडलेली भुमिकाही चांगली आहे. फक्त नागरीकांच्या सोईसुविंधासाठी जळगांवकरांच्या चांगल्या सुविधेसाठी आपण हा मुद्दा घेतलेला आहे आणि ही भुमिका घेत आहोत. लवकरात लवकर हे होणे गरजेचे आहे. मागील काळात आपणही मुद्दा मांडलेला होता. काहीतरी एका डॉक्टरांनी केस केलेली होती. एका महिलेवर की नागरीकावर काहीतरी एफआयआर झालेली होती. ते आपल्याला सगळयांना माहिती आहे. म्हणुन हा पेंडींग विषय आहे म्हणुन मी ही भुमिका घेतलेली आहे आणि हा प्रस्ताव मांडलेला आहे. तरी या प्रस्तावांना मंजुरी देण्यात यावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** चेतनभाऊ आपल्या संस्थांना किंवा स्पॉटला मी विरोध केलेलाच नाहीये मी फक्त ईथे मागणी एवढीच केलेली आहे.

**श्री.चेतन सनकत :-** ताई मी तस बोललेलो नाहीये मी आपलही

**ॲड . शुचिता हाडा :-** यासाठी काही निकष केलेले नाही. हे सरळ सरळ संस्था आणि स्पॉट येथे डिक्लियर केल जात आहे. हे निपक्षपातीपणेच काम योग्य नाहीये.

**श्री.चेतन सनकत :-** ताई एक मिनिट ताई

**ॲड . शुचिता हाडा :-** पण हे

**श्री.चेतन सनकत :-** मी तुम्हाला सांगू ईच्छितो

**मा.महापौर :-** शुचिताताई आपण याकामात प्रशासनाला योग्य सुचना देवु.

**ॲड . शुचिता हाडा :-** नक्की ताई माझी फक्त आग्रही मागणी ही आहे की एक सर्वपक्षीय समिती नेमून त्याची नियमावली  ठरवावी की स्पॉट देण्यासाठीचे कोणत्या नियम , अटी-शर्ती असाव्यात . कोणत्या संस्थांना पात्र ठरवाव. यासाठीची एक समिती करा ताई माझी दुसरी कोणतीही मागणी नाही. कोणत्यातरी संस्थेसाठी मी आग्रही नाही किंवा कोणत्याही संस्थेला त्याहुन विरोध नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाला सुचना देण्यात येतील, पुढील विषय घेण्यात यावा.

**ॲड . शुचिता हाडा :-** ताई एक समिती करा सर्वपक्षीय , नितीनभाऊ माझी आपल्याला विनंती आहे नितीनभाऊ लढ्ढा आपण याच्यात लक्ष घालाव. आपण ज्येष्ठ नगरसेवक आहात. तर माझी सुचना आपल्याला फार लवकर लक्षात येवु शकेल की समिती करणे आणि नियमावली तयार करून मग अलॉटमेंट करणे एवढी एकच मागणी आहे आणि मला वाटत माझी मागणी हि चुकीची नाही. याची नोंद घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** चला पुढचा विषय घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** तेरावा विषय घेण्यात यावा हा विषय मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** १२ नंबरच्या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** या पध्दतीने जर अलॉटमेंट होत असेल तर याला माझा विरोध आहे. याची नोंद घ्यावी.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुढचे विषय घ्या अध्यक्ष महोदय , पुढचे विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रा मधील विविध भागात नागरिकांच्या सुविधे करीता वर्दळीच्या व आवश्यक ठिकाणी BOT तत्वावर स्त्री व पुरुषांकरीता स्वच्छतागृह बांधणे व पे ॲण्ड युज तत्वावर बांधकाम करण्यास तयार असल्या बाबत खाजगी संस्थांचे पत्र मनपास प्राप्त झालेले आहेत. त्यावर उपायुक्त (महसुल) यांनी मनपाच्या बांधकाम विभाग, नगररचना विभाग, विदयुत विभाग, आरोग्य विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्तावित विविध ठिकाणांची संयुक्त पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले होते. त्या नुसार एकुण ३३ ठिकाणांची संयुक्त पाहणी करण्यात आली असता स्वच्छतागृहाची आवश्यकता, उपलब्ध जागा, या ठिकाणी प्रकल्प / रस्ता प्रस्तावित आहे का ? व सदर जागा तांत्रिकदृष्टया योग्य आहे किंवा नाही या बाबत शहानिशा केली असता सर्व निकष पूर्ण करणाऱ्या शहरातील एकुण २१ जागा सुनिश्चित करण्यात आलेल्या आहेत

प्रशासना मार्फत सुनिश्चित केलेल्या जागेवर खालील नमूद केलेल्या २१ मनपा मालकीच्या जागेवर BOT तत्वावर स्वच्छतागृह बांधण्याबाबत सन्मा.सदस्य यांनी दिलेले पत्र व सभागृहात केलेल्या सूचनेनूसार तसेच मा.महापौर यांनी पत्रावर दिलेल्या निर्देशाप्रमाणे खालील नमूद केलेल्या संस्थेस मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून परवानगी देणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

| अ.क्र. | जागेचा तपशील | संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १ | नेताजी सुभाष चौक पोलिस चौकी जवळ (मनपा) | श्री.रामदेवबाबा मेहतर समाज मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था, चिखली. |
| २ | सेंट्रल फुले मार्केट मागील एल पट्टा | श्री.रामदेवबाबा मेहतर समाज मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था, चिखली. |
| ३ | साने गुरुजी दवाखान्याची मोकळी जागा | महर्षि माल्मिकी सफाई कामगार सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.चिखली. |
| ४ | दाणा बाजार, पोलन पेठ परिसरात | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव. |
| ५ | पद्मालय विश्रामगृह जवळील मुतारी जवळ (मनपा) | श्री.रामदेवबाबा मेहतर समाज मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था, चिखली. |
| ६ | शिवाजी उदयान प्र.स.क्र.०३ पायऱ्याजवळ खाली | निरंक |
| ७ | डेमला कॉलनी, खाजामिया जवळ मंदिराच्या पाठीमागे आंबेडकर उदयानाचे समोर (मनपा) | निरंक |
| ८ | आकाशवाणी चौक हायवेच्या साईडने कुंपणापासुन (सर्व्हिस रोडवर) | साईराम इंटरप्राईजेस,जळगांव. |
| ९ | आठवडे बाजार, जुना मेहरुण रोड | निरंक |
| १० | नेरी नाका वैकुंठधाम | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव. |
| ११ | हरिविठ्ठल नगर चौक | निरंक |

| | | |
|---|---|---|
| १२ | ट्रान्सपोर्ट नगर | महर्षि माल्मिकी सफाई कामगार सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.चिखली. |
| १३ | सुरत रेल्वे गेट समोरील नाल्या लगत | निरंक |
| १४ | संत गांडगेबाबा उदया / बालगंधर्व नाटयगृह (मनपा) | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव. |
| १५ | शामा प्रसाद मुखर्जी उदयानात आतुन व बाहेरुन गेट जवळ | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव. |
| १६ | सुप्रिम कॉलनी | निरंक |
| १७ | काव्यरत्नावली चौक (वाचनालया जवळ) | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था |
| १८ | पिंप्राळा चौक (सोमाणी मार्केट समोर) | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था |
| १९ | मेहरुण स्मशानभुमी | निरंक |
| २० | कोर्टाचे उत्तर बाजुकडील रस्त्यावर | निर्मल फाऊंडेशन,जळगांव |
| २१ | अजिंठा हौसिंगच्या गेटच्या जवळ | जयदिप सुशिक्षित बेरोजगारांची स्वयं.सेवा सहकारी संस्था.मर्या.,जळगांव. |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ४५ प्रतिकुल मते :- ०१**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दि.३१/०५/२०२१ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केल्यास चालु आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या रक्कमेवर नियमानुसार १०% सुट देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतू जोपर्यंत कोविडचा प्रादुर्भाव जोपर्यंत कमी होत नाही त्याचा फेरविचार प्रशासनाने करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** भगतभाई , आदरणिय भगतभाई
**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दरवर्षी प्रमाणे एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा केल्यास थकबाकीची व शासकिय कराची रक्कम वगळून उर्वरित रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) व त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका जळगांव स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ व महासभा ठराव क्र.२०९ दि.२४/०३/२०१५ अन्वये एप्रिल

महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांस १०% सुट देणेबाबत मान्यता दिलेली असुन त्यानुसार १०% इतकी सुट देण्यात येते.

परंतु चालु आर्थिक वर्षे कोविड-१९ (कोरोना) या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाव्दारे लॉकडाऊन घोषीत केलेले आहे. त्याअन्वये जमावबंदीचे नियम लागू असल्यामुळे मालमत्ता कर भरण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी महासभा ठरावानुसार मालमत्ता कराचा भरणा रोख व धनादेश स्वरुपांत न स्विकारता दि.३०/०४/२०२१ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने १०टक्के सुटसह स्विकारण्यात येत आहे.

यावर्षी एप्रिल महिन्यात रोखीने तसेच धनादेशव्दारे कराचा भरणा स्विकारलेला नाही. बहुतांश नागरिकांची याबाबत मागणी आहे. तथापी रोखीने भरणा स्विकारल्यास प्रभाग कार्यालयात कर भरणाऱ्या मिळकतधारकांची गर्दी होईल. नुकतेच शासनाने १५ मे २०२१ पर्यंत लॉकडाऊनची घोषणा केल्याने शासननियमावलीचे उंल्लघन होईल करिता

१. Online पध्दतीने महानगरपालिकेच्या https://WWW.Jalgaonmc या लिंकवर व

२. धनादेश (Chaque) व्दारे

मालमत्ता कराचा भरणा १० टक्के सुटसह दि.०१/०५/२०२१ ते दि.३१/०५/२०२१ अखेर स्विकारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. परंतू कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पहाता जोपर्यंत कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी होत नाही तोपर्यंत प्रशासनाने रोखीने मालमत्ता कराचा भरणा केल्यावर १० टक्के सुट देणेबाबत विचार करावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** जळगांव शहर हद्दीतील सर्व स्मशानभुमीना लाकुड व गोवऱ्या इत्यादींचा कमीत कमी दरात पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास अटी-शर्तींना अधिन राहून विक्री परवाना देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरात सध्या ४ स्मशानभूमी आहेत. त्यापैकी नेरीनाका स्मशानभूमी सर्वात मोठी असून कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता सदर स्मशानभूमी ही फक्त कोविड-१९ च्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणेकामी राखीव ठेवण्यात आली आहे. सदर स्मशानभूमीत सर्व कोविड-१९ बाधित, संशयित मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले जातात. नेरी नाका स्मशानभूमी व इतर स्मशानभूमीमध्ये लाकूड व गोवऱ्यांचा पुरवठा केला जात नाही. पूर्वी मनपाकडून लाकूड आणि बरगे पुरवठा सन २०११-१२, २०१२-१३ या कालावधीतील शासकिय लेखापरिक्षण अहवालात आक्षेप आल्यामुळे सदर पुरवठा माहे डिसेंबर २०१३ पासून बंद करण्यात आला आहे.

नेरी नाका स्मशानभूमी सदयस्थितीत अंत्यसंस्कार करणेसाठी नागरिकांना खर्च करावा लागतो. तेथे येणारे रुग्णांचे नातेवाईक जवळच लाकूड व गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराकडून सदर साहित्य खरेदी करतात. सदर

पुरवठादार लाकूड व गोवऱ्या वाढीव दर आकारुन विक्री करत असल्याच्या नागरिक व लोकप्रतिनिधींकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. तेव्हा सदर साहित्याच्या दरांवर मनपाचे नियंत्रण असणे आवश्यक असल्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे. तेव्हा जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमींना लाकूड व गोवऱ्या इत्यादींचा कमीत कमी दरात पुरवठा करणाऱ्या पुरवठादारास विक्री परवाना दिल्यास सदर साहित्याच्या दरांवर मनपाचे नियंत्रण निर्माण होवून सदर गैरप्रकारांना आळा बसेल व वाढीव दरांमुळे नागरिकांची होणारी फसवणूक व गैरसोय टाळता येईल. विक्री परवाना प्राप्त पुरवठादारास मनपाकडून स्मशानभूमीमध्ये १५ X ३० स्के.फुट जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. पुरवठादार कमीत कमी दरात सदर साहित्य नागरिकांना विक्री करणार असल्याने त्याचा अंतिमत: फायदा नागरिकांना होणार आहे.

मनपा क्षेत्रात असणाऱ्या सर्व स्मशानभूमीत १ वर्षापर्यंत लागूड ( ८ मण) व गोवऱ्या (२ पोते, अंदाजे ५० नग) पुरवठा करण्यास वर्तमानपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन दरपत्रक मागवून पुढील अटी शर्तींना अधीन राहून मक्तेदार नेमणूक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सर्वात कमी दरात लाकूड व गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास मनपाकडून विक्री परवाना देण्यात येईल.

२. मनपा मार्फत सदर मक्तेदाराला सर्व स्मशानभूमींमध्ये १५ X ३० स्के.फुट मोफत जागा देण्यात येईल. तसेच तेथे शेड उभारण्याची परवानगी देण्यात येईल.

३. कमीत कमी दरात लाकूड व गोवऱ्या विक्री करणाऱ्या पुरवठादराची नेमणुक नागरिकांची सोय म्हणून करण्यात येत आहे. सदर पुरवठादाराकडूनच सदरचे साहित्य खरेदी करण्याची नागरिकांना सक्ती असणार नाही. नागरिक आपल्या सोयीप्रमाणे इतर ठिकाणांहूनही साहित्य उपलब्ध करुन घेवू शकतील.

४. सदरचा परवाना १ वर्ष कालावधीसाठी मर्यादित राहील.

५. १ वर्षानंतर मक्तेदारास मनपाने दिलेली जागा खाली करुन मनपाच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.

६. मक्तेदारास सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे मालकी / भाडेपट्टा हक्क सांगता येणार नाही.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शहर उपाध्यक्ष व मा.उपमहापौर,जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे मागणीनूसार पिंप्राळा परिसरात म.न.पा.रुग्णालय सुरु करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला बोलायचे आहे या विषयावर , महापौरताई मला बोलायचे आहे या विषयावर

**मा.उपमहापौर :-** बोला सुरेश भाऊ

**मा.महापौर :-** बोला भाऊ

**श्री.सुरेश सोनवणे :-** ताई पिंप्राळा परिसर हा जळगांव शहराचा उपनगर झालेला आहे. तिथे खुप दाट वस्ती आहे मोठ्या प्रमाणात झालेली आहे. तरी माझ म्हणण आहे की प्रशासनाने जो प्रस्ताव दिला आहे. दवाखाना बनविणे हा खुप अत्यंत गरजेचा आहे आणि दवाखाना हा झालाच पाहीजे. पण महापौरताई माझे असे म्हणणे आहे की गट नं. २७७ मध्ये न

करता आपल्या सोमाणी मार्केट मध्ये कधी हा दवाखाना केला तर कमी खर्चामध्ये चांगल काम होईल आपले माझ हे म्हणण आहे ताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** कस आहे सुरेश भाऊ

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण म्हंटलात सोमाणी मार्केटमध्ये सोमाणी मार्केटच कस आहे की तेथे शॉंपींग आणि शाळा या बार्बीच आरक्षण आहे आणि त्या कारणाने तिथे फिजिबीलीटी बसणार नाही आणि जिथे दाट वस्ती आहे तिथे दवाखाना सर्वांच्या सोईनुसार योग्य होईल.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नाही भाऊ दाट वस्ती आहे तिथे

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ दाट वस्ती आहे तिथे भाऊ आपण

**श्री.सुरेश सोनवणे :-** भाऊ तिथ जाण्यायेण्यासाठी काहीच नाहीना सोईसुविधा

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई

**श्री.मयुर कापसे :-** जायला पण फिजीबल नाहीये भाऊ आऊट साईडला आहे भाऊ जायला पण नको

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** चला पुढचा विषय घ्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई

**श्री.मयुर कापसे :-** त्या एरियातील लोक तिकडे जावु शकणार नाही. निमखेडी

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई मला परवानगी द्यावी. पिंप्राळ्याच्या हॉस्पीटल बद्दलचा एक महत्वाचा मुद्दा मला मांडायचा आहे .मला बोलायची परवानगी द्यावी ताई .

**मा.महापौर :-** बोला ताई शुचिताताई

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर ताई हा जो प्रस्ताव आलेला आहे. हा ओपनस्पेस वर रूग्णालय बांधण्याचा प्रस्ताव ईथे देण्यात आलेला आहे. त्या त्या कॉलनीतील त्या त्या भागातील नागरीकांसाठी राखीव असते. तिथे दुसर काहीही कंन्स्ट्रक्शन आपल्याला करता येवू शकत नाही.अशा वेळेला मुळातच हा प्रशासनाने दिलेला प्रस्तावच चुकीचा आहे. अस माझ ईथे म्हणण आहे. याची सभागृहाने नोंद घ्यायची आहे. कायदेशीर रित्या कोणत्याही रित्या ओपनस्पेसवर आपल्याला दवाखाना ऊभा करता येणार नाही. नगररचना विभागातील अधिकाऱ्यांनी या विषयाचा खुलासा करावा अशी मी ईथे मागणी करते ताई नगररचना विभागातील अधिकाऱ्यांनी या विषयाचा खुलासा करावा की यासाठीची परवानगी या प्रस्तावात कशी काय टाकण्यात आली. जर ही ओपनस्पेस आहे तर ओपनस्पेस वर आपण दवाखाना बांधु शकतो का ? हे कायदेशीर आहे का ?

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे , ठिक आहे , संबंधित विभागाच्या उपायुक्तांनी या संदर्भामध्ये त्यांना सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर द्यायच आहे. ताई ते उत्तर देत असतांना आपल्याला विनंती आहे थोडी शांतता ठेवा.

**ॲड . शुचिता हाडा :-** ठेवतेय मी निश्चीतच.

**मा.उपमहापौर :-** म्हणजे आपल्यालाही समजेल आणि इतरांनाही समजेल आणि त्याची प्रोसेस काय आहे ते

**श्री.शकील शेख, रचना सहा.नगररचना विभाग :-** हॅलो, आता शासनाने जी नविन नियमावली मंजुर केलेली आहे. UDCPR याचे नियम क्रं. ३.४ च्या २ मध्ये टोटल ओपनस्पेसच्या १५ टक्केवरती हेल्थ आऊट पोस्ट / पब्लीक हेल्थ पोस्ट साठी अनुज्ञेय केलेल आहे ओपनस्पेस मध्ये with the consent of the plot holders अशी ही तरतुद आहे.

**श्री.मयुर कापसे :-** साहेब पण तिथल्या नागरीकांची NOC आपल्याला घेण बंधनकारक असेल ना संबंधित जो गट नंबर आहे. तेथील

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई आता शेख साहेबांनी येथे वाचुन दाखविलेले आहे की १५ टक्के जागेवर ओपन प्लॉटच्या हेल्थ पोस्टसाठी तेथील नागरीकांच्या परवानगी ने करता येवु शकत . माझ्या माहिती प्रमाणे तेथील सगळया नागरीकांचा या गोष्टीला विरोध आहे. तिथे ओपनस्पेसच असावे अशी नागरीकांची मागणी आहे आणि पुढची माहिती आपल्याला मयुरभाऊ देतीलच की त्यांच्याकडे नागरीकांनी जे निवेदन दिलेल होत. साधारण एक तिनशे नागरीकांच्या त्याच्यावर सह्या होत्या की ज्यांनी याला विरोध केलेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव आपल्याला मान्य करता येणार नाही. या

प्रस्तावाला ओपनस्पेसवर हॉस्पीटल तेथील नागरीकांच्या परवानगी शिवाय आपण करू शकणार नाही. या मुद्दयावरून तेथील नागरीकांची परवानगी नाही म्हणुन माझा ईथे विरोध आहे. भारतीय जनता पार्टीतर्फे या विषयाला विरोध आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.शुचितताई बघा प्रशासनाने प्रस्ताव दिलेला आहे. सभागृहाने जरी मान्य केला . परंतू तुम्ही म्हणतात किंवा उपायुक्त साहेबांनी त्या बाबतीत सभागृहाला माहिती उपलब्ध करून दिली की तेथील नागरीकांना विश्वासात घेवुन , आपण विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करू , विश्वास मिळवला गेला अन्यथा नागरीकांना तेथील कायदेशीर मार्ग अवलबंण्याची मुभा आहेच. परंतू आज प्रस्ताव आज कसा आहे. आज मान्य केल्यानंतर नागरीकांची मन वळली तर आनंद आहे नसेल तर त्यांनी त्यांची कायदेशीर मार्गाचा अवलंब करायला नागरीकही खुले आहेत आणि प्रशासनही कुठल्याही बेकायदेशीर कामाला पुढे नेवु शकणार नाही.

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आपला मुद्दा मला मान्य आहे. जे त्या परिसरातील तिनही नगरसेवक आहेत. त्यांच्या भागातील नागरीकांनी त्यांच्याकडे लेखी निवेदन दिलेल आहे. त्यांनी आमच्याकडे मागणी केलेली आहे भारतीय जनता पक्षाकडे की आमचा विरोध आपण सभागृहात नोंदवावा. त्यामुळे त्यांची परवानगी नसल्यामुळे आम्ही ईथे विरोध नोंदवत आहोत. आपल्याला जर वाटत असेल की भविष्यात आपण त्यांच मन वळवु शकतो आणि सगळयांची आपण परवानगी घेवु शकतो आणि हे होवु शकत . त्यानंतर तो विषय तिथे सॉल्व करता येईल. आजच्या तारखेत नागरीकांनी विरोध नोंदवण्याची जबाबदारी दिलेली असल्यामुळे ईथे भारतीय जनता पार्टी तर्फे या विषयाला विरोध नोंदविण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे , बहुमताने मान्य करण्यात यावा.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ फक्त विषय असा होता की पिंप्राळा उपनगरासाठी म्हणजे आरोग्याविषयी

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचे विषय घ्या.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ मला बोलु द्या.

**मा.महापौर :-** बहुमताने विषय मान्य करण्यात येत आहे.पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचे विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा हे जळगांव शहराचे उपनगर असुन ७० ते ८० हजारावर लोकवस्ती असून रुग्णालय नसल्याने लोकांना ५ ते ६ कि.मी. अंतरावर उपचारासाठी यावे लागते. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊन उपचार वेळेत न मिळाल्याने मोठी हानी होण्याचे प्रकार देखील घडत आहे. खोटे नगर, निमखेडी, हरिविठ्ठल नगर, मयुर कॉलनी, खंडेराव नगर, दादावाडी इत्यादी मोठा विस्तारीत भाग पिंप्राळयाशी जोडलेला आहे. सध्याची परिस्थिती ही गंभीर स्वरुपाची असून कोविडमुळे नागरीक त्रस्त आहेत. त्यामुळे पिंप्राळा येथे महानगरपालिका रुग्णालयाची सोय उभारल्यास रहिवाश्यांची होणारी गैरसोय टळेल व वेळेत उपचार होतील.

पिंप्राळा येथे नविन म.न.पा. रुग्णालय उभारायचे असल्यास त्या दृष्टीने आवश्यक इमारत, मनुष्यबळ (उदा.डॉक्टर्स, परिचारीका व इतर अत्यावश्यक स्टाफ) व इतर साधन सामुग्री (फर्निचर, उपकरणे इ.) अत्यंत आवश्यक आहे. बाहयरुग्ण विभाग (ओपीडी) व आंतररुग्ण विभाग (प्रसुती) साठी लागणारे मनुष्यबळ, फर्निचर, साहीत्य उपकरणे इ.ची आवश्यकता राहील.

उपरोक्त प्रमाणे मौजे पिंप्राळा शिवार गट क्र.२७७/२ हि खुली जागा २४५९.९४ चौ.मी. या जागेत नविन रुग्णालय उभारणेस तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अतंर्गत यु.सी.एच.सी. व यु.पी.एस.सी. या योजने अंतर्गत निधीची मागणी शासनाकडेस करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने नविन रुग्णालय उभारणे संदर्भात तत्काळ पुढील प्रक्रिया सुरु करुन शासनाकडे निधी मागणी संदर्भात प्रस्ताव सादर करावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- २७ प्रतिकुल मते :- १४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** प्रभाग क्रं.१४ अंतर्गत १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८,५६,१४,८७८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,श्रीमती रेखा चुडामण पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, एक मिनिट गोराणे साहेब आवाज येतोय का.

**श्री.सुरेश सोनवणे :-** येतोय आप्पा आवाज येतोय.

**मा.महापौर :-** कैलासआप्पा विषय वाचु देत चला.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , १६ ते ६५

**श्री.नितीन लढ्ढा :-** १६

**श्री.राजेंद्र पाटील :-** आप्पा मला १६ वरती बोलायच आहे.महापौर महोदया विषय क्रं. १६ वरती मला बोलायच आहे

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनिट राजुभाऊ , एक मिनिट.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बोलायची परवानगी देण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ आपण १६ वर बोला. परंतू सन्मा.सदस्य कैलासआप्पा जे म्हणतात आहे ना की विषय क्रं. १६ ते ७६ पर्यंत सगळी विकास कामांची प्रस्ताव आहेत आणि आप्पाच्या सुचनेप्रमाणे

**श्री.कैलास सोनवणे :-** एकत्रित रित्या चर्चा व्हावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही काही काही त्यातल्या काही बाबी निदर्शनास आणुन द्यावस वाटत मला सभागृहाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चित

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच्या बद्दल बोलयच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चित आणुन द्यावी.

**मा.महापौर :-** राजेंद्र भाऊ बोला

**श्री.राजेंद्र पाटील :-** हो , प्रभाग क्रं. १४ याच्यामधील कामे विषय १६ नंबरचा विषय त्याच्यानंतर २२ क्रंमाकाचा विषय त्याच्यानंतर २४ क्रमांकाचा विषय , २९ क्रमांकाचा विषय आणि ३४ क्रमांकाचा विषय हा प्रभाग क्रं. १४ शी संबंधित आहे. मी यापुर्वी जे प्रस्ताव पाठविलेले होते. त्याच प्रस्तावाचे थोडे फार बदल करून मी डांबरीकरणाची मागणी केलेली असलेले रस्ते सन्मा.सदस्य जे आहे रेखाताई पाटील यांनी डांबरीकरणाच रुपांतर बदलवुन कॉक्रीटीकरण करून देण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. आता मी दिलेले प्रस्ताव तेच नांव जशीच्या तशी फक्त त्याच्यामध्ये डांबरीकरणच्या ऐवजी कॉक्रीटीकरणची मागणी केलेली आहे आणि तसच बरेचशे जे रस्ते घेतलेले आहेत. त्या त्यांच्याच प्रस्तावामध्ये डबल डबल झालेले आहे. त्याच्यामध्ये मी सांगेल तुम्हाला विषय क्रं.३४ त्याच्यामध्ये ६ नंबरचा रस्ता जो आहे म्हणजे अ.क्रं.६ डॉकेट मध्ये बघाव कृपया विषय क्रं. ३४ तोच विषय परत तोच रस्ता विषय क्रं. २२ मध्ये अ.क्रं.३ ला तोच रस्ता घेतलेला आहे. परत डि-मार्ट ते इंद्रप्रस्थ नगर हा जो रस्ता आहे आदित्य चौक त्यांनी इंद्रप्रस्थच्या ऐवजी आदित्य चौक त्यांनी एकवेळेस एकाप्रस्तावमध्ये इंद्रप्रस्थ नगर म्हंटलेले आहे. दुसऱ्या प्रस्तावामध्ये आदित्य चौक म्हंटलेले आहे. तो एकच रस्ता आहे तो आणि त्यांनी आपण जो २५ कोटीचा जो शिल्ल्क निधी आहे त्याच्यातुन जो उर्वरित निधी आहे. त्या निधीमध्ये आपण हा रस्ता मंजुर केलेला आहे. हे शहर अभियंत्यांनाही माहिती आहे. हा रस्ता घेतलेला असतांना , मंजुर असतांना परत तोच रस्ता घेतला आणि एक वेळेस नव्हे तर दोन वेळेस घेतला. विषय क्रं. ३४ मध्ये सुध्दा अ.क्रं. ३ जो रस्ता आहे तोच रस्ता आहे. परत विषय क्रं. १६ मध्ये चार आणि पाच क्रमांकाने जे रस्ते आहेत. त्याला दोन तुकडयांमध्ये तोच रस्ता घेतलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ शेवटी बघा जी काही कामे डबल प्रस्तावीत केली गेली असेल. त्या कामांचा प्रशासकीय प्रस्तावावरती कुठल्याही कामाच दोन दोनदा टेंडर निघु शकत नाही. एखाद काम नजरचुकीने अनावधानाने आलही असेल. तर त्या कामाचा प्रस्ताव हा पाठवला जाणार नाही आणि कॉक्रीटींगचा विषय जो आहे. त्या संदर्भात रेखाताई चुडामण पाटील या राज्य शासनाकडुन एक विशेष अनुदान मागण्याचा प्रयत्न करताहेत आणि जर कधी डांबरीकरणा ऐवजी कॉक्रीटीकरणाचे जर कधी काम झाले आणि राज्य शासनाकडुन त्याला अनुदान मिळत असेल. तर मी निश्चितपणे म्हणतो की आपल्या प्रभागातील काम चांगल्या पध्दतीने होतील आणि जास्त काळ टिकतील.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** प्रशासनाला सुचना देण्यात येतात की , बांधकाम विभागास की यानुसार रस्ते

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई , ५६ नंबर वर बोलायच आहे.

**मा.महापौर :-** पुन्हा पुन्हा असेल तर त्यांनी यावर अभ्यास करून त्यांनी पुन्हा शासनाच्या निदर्शनास आणुन द्याव आणि शासनाला परत प्रस्ताव टाकला जाणार नाही या बाबत त्यांनी काळजी घ्यावी.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई , ५६ नंबर वर बोलायच आहे.

**मा.महापौर :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई , ५६ बद्दल बोलायच आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** ज्योतीताई बोला

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझा विषय आहे ३८ नंबरचा महापौर ताई ३८ नंबरच्या विषयामध्ये

**मा.महापौर :-** बोला ज्योतीताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझ्या ४० नंबरच्या विषयामध्ये सदर कामे हे दोन ठिकाणी आलेले आहेत आणि १०० कोटीच्या निधीमध्ये १०० कोटीची जी यादी आहे. त्याच्यातही ते काम आले असल्यामुळे माझे मी दुसरे तिन काम ईथे सुचवते. तेवढे फक्त डॉकेटवर घेवुन घेण्याची विनंती करते मी तुम्हाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ताई आपण नगरसचिवांकडे तशी यादी द्यावी. ते डॉकेटमध्ये बदलले जातील.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाव सांगण्याची गरज नाही का मला ईथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आपण लेखी महापौरांनांही लेखी सुचना देवुन द्यावी.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर

**मा.महापौर :-** ज्योतीताई आपण आम्हाला लेखी सुचना द्यावी त्या पध्दतीने त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई ५६ नंबर वर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई

**श्री.नितीन बरडे :-** दुरूस्ती करून घ्या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई ५६ नंबर वर बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** विषय क्रं. १६ ते ६६ मंजुर आहे का ?

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नितीनभाऊ ६३ नंबरच्या याच्यात आपण दुरूस्ती आहे. महापौरताई

**मा.उपमहापौर :-** विषय क्रं. १६ ते ६५ च्या विषयांना माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो विषय क्रं. २३ मध्ये सुध्दा वॉर्ड क्रं. १८ मध्ये विविध ठिकाणी विकास कामे करीता मंजुरी मिळणेसंदर्भात सन्मा.सदस्य सुन्नाबी राजु देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार

**मा.उपमहापौर :-** भाऊ बांधकामाच्या संदर्भातील जे काही विषय असतील . त्याच्यामध्ये जे विषय पुन्हा पुन्हा प्रस्तावित झालेले असतील बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना ते निदर्शनास आणुन देवुन आपण त्या प्रस्तावात सुधारणा करून आणि तदनंतर प्रस्तावित करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** तेच तेच विषय परत परत येताहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे उपमहापौर साहेब

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा. १६ ते ७६

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** ज्या सदस्यांना पुन्हा पुन्हा काम आले असतील आणि ते वगळुन नवीन काम देण्याचे असतील त्या संदर्भामध्ये महापौर , नाही नाही विषयपत्रिकेमध्ये जे काम डबल डबल आलेले असतील ते काम ज्या गोष्टी मध्ये तांत्रिक दृष्टया अडचणी होतील. असे काम पुन्हा नव्याने बदलवुन तशा पध्दतीच त्यापध्दतीच आपण पिठासीन अधिकाऱ्यांकडे पत्र द्यायच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे , योग्य आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई ५६ नंबरच्या विषयावर बोलायच आहे.

**मा.महापौर :-** १६ ते ६६ विषय मान्य ६७ वा विषय घेण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई , दोन मिनिट महापौर महोदय याच्यामध्ये ६३ नंबरचा जो विषय दत्तक घेण्याचा

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया ६६ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदय याच्यामध्ये ६३ नंबरचा जो विषय आहे १५ नंबर शाळा

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगंव शहर महानगपालिका प्रभाग क्र.१४ मधील खालील नमूद कामे नागरीकांना मुलभूत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरिकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.१४ अंतर्गत खालील विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८,५६,१४,८७८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ मधील अशोक किराणा चौक ते जकात सोसायटी पर्यंतचा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २,७४,७५,६८६/- |
| २ | प्रभाग क्र.१४ मधील स्वामी समर्थ चौक ते पाटचारी (राजशाळासमोर) पर्यंतचा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १,८६,७९,४६०/- |
| ३ | प्रभाग क्र.१४ मधील अशोक किराणा चौक ते मेहरुण सर्वे नं.२४९ पर्यंतचा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १,५१,०६,३४८/- |
| ४ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण स्मशानभूमी ते आदीत्य हॉटेल चौक पर्यंतचा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ८१,२३,१७५/- |
| ५ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण स्मशानभूमी ते डी मार्ट पर्यंतचा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १,६२,३०,२०९/- |
| | एकूण रक्कम - | ८,५६,१४,८७८/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १७)** मनपा प्र.क्र.९ अंतर्गत मुक्ताई नगर गट क्र.२८ या परिसरातील ऑक्सिजन पार्कला राजमाता जिजाऊ मॉसाहेब नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्र.क्र.०९ अंतर्गत मुक्ताई नगर गट क्र.२८ या परिसरात अमृत योजने अंतर्गत भव्य असे ऑक्सिजन पार्कची उभारणी करण्यात आलेली असून सदर पार्कला अदयापपावेतो नामकरण करणेत आलेले नाही तसेच या पार्कला " राजमाता जिजाऊ मॉसाहेब " असे नामकरण करणे बाबत परिसरातील नागरीकांकडून मागणी होत असल्याने मनपा प्र.क्र.९ अंतर्गत मुक्ताई नगर गट क्र.२८ या परिसरातील ऑक्सिजन पार्कला " राजमाता जिजाऊ मॉसाहेब " असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर पार्कला कोणाचेही नाव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १८)** प्र.क्र.०३ अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ४ विविध विकास कामे करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.०२ कोटी ८० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.मिनाताई धुडकु सपकाळे व सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.०३ अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ४ विकास कामे करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.०२ कोटी ०८ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.३ जूना खेडी रस्त्यापासून ते जळगांव सर्व्हे नं.८८ पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | रु.५० लक्ष |
| २ | जुना खेडी रस्त्यापासून ते महालक्ष्मी पार्क (कावेरी हॉटेल) पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | रु.५८ लक्ष |
| ३ | वार्ड क्र.३ सर्व्हे नं.७८ डीएनसी कॉलेज जवळ डांबरी रस्ते तयार करणे. | रु.६० लक्ष |
| ४ | वार्ड क्र.३ खेडी गावठाण दादाजी दरबार परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.०२ कोटी ०८ लक्ष |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १९)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ (ड) मध्ये ठिकठिकाणी ९ मी. व १२.५ मी. उंचीचे हायमस्ट लॅम्प बसविणे कामी येणाऱ्या रक्कम रु.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य.श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ (ड) मध्ये ठिकठिकाणी ९ मी. व १२.५ मी. उंचीचे हायमस्ट लॅम्प व मिनी हायमस्ट लॅम्प बसविणे कामी येणाऱ्या रक्कम रु.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २०)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रभाग क्रं.५ (ड) मध्ये ठिकठिकाणी ९ मी. व १२.५ मी. उंचीचे हायमस्ट व मिनी हायमस्ट लॅम्प बसविणे कामी येणाऱ्या रक्कम रु.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य.श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रभाग क्रं.५ (ड) मध्ये ठिकठिकाणी ९ मी. व १२.५ मी. उंचीचे हायमस्ट व मिनी हायमस्ट लॅम्प बसविणे कामी येणाऱ्या रक्कम रु.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २१)** नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.७ मध्ये रस्ते खडीकरण करुन डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३,४७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य.श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.७ मधिल रस्ते अंत्यत खराब झालेले असल्याने नागरीकांना येण्या-जाण्यासाठी भरपूर कसरत करावी लागत असल्याने नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.७ मध्ये खालील नमूद रस्ते खडीकरण करुन डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३,४७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८८, प्लॉट नं.९ ते गट नं.८०/१ खुली जागा पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.४६,२१,८७५/- |
| २ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८९/२, प्लॉट नं.९ ते गट नं.९२ प्लॉट नं.०२ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१३,३७,६२५/- |
| ३ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८९/१ खुली जागा ते गट नं.९१ प्लॉट नं.१२ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.२०,६६,२५०/- |
| ४ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८५, प्लॉट नं.०३ ते गट नं.८०/१ प्लॉट नं.२४ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१४,१३,७५०/- |
| ५ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.७९/१ व ७९/२, प्लॉट नं.०२ ते गट नं.८१/१/२अ प्लॉट नं.०१ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.४७,८५,०००/- |
| ६ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८५, प्लॉट नं.०७ ते गट नं.८०/१ प्लॉट नं.०६ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.६,५२,५००/- |
| ७ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८५, प्लॉट नं.३० ते गट नं.८६/२ प्लॉट नं.०४ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१३,३७,६२५/- |
| ८ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८६/१, प्लॉट नं.८६/१ प्लॉट नं.१९ ते गट नं.८३ प्लॉट नं.६ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.२२,८३,७५०/- |
| ९ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८१/१अ प्लॉट नं.२८ ते प्लॉट नं.३९ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१४,६८,१२५/- |
| १० | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.९२, प्लॉट नं.०२ ते गट नं.८१/१/२अ प्लॉट नं.०१ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.२१,७५,०००/- |
| ११ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८०/२, प्लॉट नं.४३ ते गट नं.८१/१/२अ प्लॉट नं.०५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१०,३३,१२५/- |
| १२ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८२, प्लॉट नं.०५ ते गट नं.८०/२ प्लॉट नं.६० पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१५,२२,५००/- |
| १३ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८१, प्लॉट नं.०६ ते गट नं.८०/२ प्लॉट नं.४९ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१४,१३,७५०/- |
| १४ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८८, प्लॉट | रु.१४,६८,१२५/- |

| | | |
|---|---|---|
| | नं.३० ते गट नं.९२ प्लॉट नं.१८ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | |
| १५ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.९५/१/१+ ९५/२/२ ते गट नं.८८ प्लॉट नं.१६ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.८,७०,०००/- |
| १६ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८६/१, प्लॉट नं.२० ते प्लॉट नं.२९ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.७,६१,२५०/- |
| १७ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.९५/२/१+९५/२/२, प्लॉट नं.२८ ते प्लॉट नं.३४ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.९,२४,३७५/- |
| १८ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८०/१, प्लॉट नं.१६ ते १८ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१,७५,५००/- |
| १९ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८०/१, प्लॉट नं.०४ ते १८ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१,८९,०००/- |
| २० | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८५, प्लॉट नं.३० ते १२ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.४,२७,५००/- |
| २१ | प्रभाग क्रं.७ अंतर्गत आशाबाबा नगर परिसर, पिंप्राळा शिवार गट नं.८६/२, प्लॉट नं.१० ते गट नं.८५ प्लॉट नं.२१ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.१,७५,५००/- |
**नगरसचिव :- विषय क्रं:- ४७)** जळगांव शहर महानगरपालिकेचे रुग्णालय आवश्यक त्या स्टाफसह रामेश्वर कॉलनी व सुप्रिम कॉलनी येथे सुरु करणेबाबत मा.सभापती,स्थायी समिती, श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील रामेश्वर कॉलनी व सुप्रिम कॉलनी या परिसरात एम.आय.डी.सी.मध्ये काम करणारा कामगारवर्ग मोठया प्रमाणात राहत असून या परिसरातील दाट लोकवस्ती पाहता या दोन्ही ठिकाणी महानगरपालिकेचे अदयावत रुग्णालय सुरु करणे अत्यंत आवश्यक असून महानगरपालिकेचे रुग्णालय या दोन्ही परिसरात सुरु झाल्यास तेथील सामान्य नागरिकांना यामुळे दिलासा मिळणार असल्याने जळगांव शहर महानगरपालिकेचे रुग्णालय आवश्यक त्या स्टाफसह रामेश्वर कॉलनी व सुप्रिम कॉलनी येथे सुरु करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४८)** प्रभाग क्र.१९ अंतर्गत विविध १ ते ८ ठिकाणी रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.८,१९,५८,७१७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.निता मंगलसिंग सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१९ मधील नागरीकांना रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी सदर परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने प्रभाग क्र.१९ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ८ ठिकाणी रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.८,१९,५८,७१७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.१९ मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत गितांजली केमिकल्स ते मनपा हद्दीपर्यंतचा रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.१,१०,५२,७७८/- |
| २ | प्रभाग क्रं.१९ मेहरुण सुप्रिम कॉलनी मध्ये औरंगाबाद हायवे ते इदगाह ते स.नं.१८३ तसेच महादेव मंदीर ते स.नं.१८४ चा रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.१,५६,०५,९३९/- |
| ३ | प्रभाग क्रं.१९ मेहरुण अंतर्गत अशोक किराणा चौक ते नागसेन नगर पर्यंत रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| ४ | प्रभाग क्रं.१९ मेहरुण चावरिया रिक्षा स्टॉप ते पाटचारी पर्यंतचा रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| ५ | प्रभाग क्रं.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.१६७/१, १६७/२ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.९०,००,०००/- |
| ६ | प्रभाग क्रं.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.१६६/१/४, १६६/३/४ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.१,२५,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्रं.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.१६५/१+१ब, १६५/१C +१F+ १६५/२, १६५/१D+१E मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.१,२८,००,०००/- |
| ८ | प्रभाग क्रं.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.नं.१८४/१, १८४/३ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.८,१९,५८,७१७/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४९)** प्रभाग क्र.१३ अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.१,१०,४७,८६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व मा.महापौर यांचे निर्देशानूसार प्रभाग क्र.१३ अंतर्गत प्रस्तावीत केलेल्या १ ते ३ कामांमधून अ.नं.२ चे काम कमी करुन त्याऐवजी २ कामे समाविष्ट करुन केलेल्या कामाचे विषयामध्ये बदल करुन खालील नमूद विविध १ ते ४ कामे व वाढलेल्या कामांमुळे वाढीव रकमेसह कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.१,६१,६०,६३९/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.१३ आदर्श नगर मधील मेहरुण स.नं.४४३ उज्वल शाळा परिसराकडील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७१,३८,५२०/- |
| २ | प्रभाग क्रं.१३ मोहन नगर सर्व्हे नं.४४९ मधिल सर्व रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५६,५५,५७३/- |
| ३ | प्रभाग क्रं.१३ मधिल नूतन वर्षा कॉलनी, शारदा कॉलनी, रविंद्र नगर इत्यादी भागात नविन आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.२६,१६,५४६/- |
| ४ | प्रभाग क्रं.१३ मोहन नगर, आदर्श नगर, नुतनवर्षा कॉलनी इत्यादी भागात रोड क्रॉसिंग गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु.७,५०,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.१,६१,६०,६३९/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५०)** प्र.क्र.१२ अंतर्गत विविध १ ते ७ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.३,३९,२९,७२२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदर कामे महाराष्ट्र शासनाकडून येणाऱ्या विशेष निधी अंतर्गत किंवा जिल्हा नियोजन समिती कडील जिल्हा वार्षिक योजनेतुन मिळणाऱ्या विविध योजनांच्या निधीतुन करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन मनोहर बरडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१२ मधील नागरीकांना रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी सदर परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने प्र.क्र.१२ अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ७ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.३,३९,२९,७२२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदर कामे महाराष्ट्र शासनाकडून येणाऱ्या विशेष निधी अंतर्गत किंवा जिल्हा नियोजन समिती कडील जिल्हा वार्षिक योजनेतुन मिळणाऱ्या विविध योजनांच्या निधीतुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.१२ मायादेवी नगर व पाटीलवाडी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७०,८४,२३४/- |
| २ | प्रभाग क्रं.१२ महाबळ मकरंद कॉलनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.९,८२,७९१/- |
| ३ | प्रभाग क्रं.१२ अनुराग स्टेट बँक कॉलनी जुना भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३९,७८,८१५/- |
| ४ | प्रभाग क्रं.१२ सिध्देश्वर नगर, सतगुरु नगर, इंद्रप्रस्थ नगर भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.८५,९३,५७७/- |
| ५ | प्रभाग क्रं.१२ धांडेनगर मेहरुण स.क्र.५६१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६०,७५,१०९/- |
| ६ | प्रभाग क्रं.१२ अनुराग स्टेट बँक कॉलनी भागातील कृपाळू हनुमान मंदीर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३५,९४,४६०/- |
| ७ | प्रभाग क्रं.१२ विदयुत कॉलनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३६,२०,७३६/- |
| | एकूण रक्कम - | रु.३,३९,२९,७२२/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५१)** प्रभाग क्र.१२ अंतर्गत शिवरामनगर, सुयोग कॉलनी, गुलमोहर कॉलनी, गुरुकुल कॉलनी परिसर तसेच आस्वाद चौक ते गिरणा टाकी पर्यंतच्या भागात रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.१,२५,३४,५००/- व आर.सी.सी.गटार कल्व्हेट बांधणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.५०,००,०००/- अशा एकूण रक्कम रु.१,७५,३४,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.गटनेते,शिवसेना,श्री.अंनत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका प्रभाग क्र.१२ अंतर्गत शिवरामनगर, सुयोग कॉलनी, गुलमोहर कॉलनी, गुरुकुल कॉलनी परिसर तसेच आस्वाद चौक ते गिरणा टाकी पर्यंतच्या भागात रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.१,२५,३४,५००/- व आर.सी.सी.गटार कल्व्हेट बांधणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.५०,००,०००/- अशा एकूण रक्कम रु.१,७५,३४,५००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५२)** प्र.क्र.०९ मधिल विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु. ६२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनुसार तसेच नागरीकांना रहदारी सुखसुविधा पुरविणे कामी प्र.क्र.०९ मधिल खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु. ६२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गट नं.२६ निवृत्ती नगर मराठा सेवासंघ हॉल ते उत्तरेला महाजन यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| २ | पवार यांच्या घरापासुन ते उत्तरेकडील जळमकर गट नं.२७ निवृत्ती नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.०८ लक्ष |
| ३ | दत्त पिठाची गिरणी ते रोहीणी ट्रेडर्स गट नं.२०/१ निवृत्ती नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| ४ | केरळी मंदीर ते गोल्डन प्लो ते भागवत पाटील पी.एस.आय यांचे घारापासुन एस.एम.आय.टी. नाल्यापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२४ लक्ष |
| ५ | रुपसाधाना ब्युटी पार्लर ते नरहरी मंदीर गट नं.३२ मुक्ताई नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु. ६२ लक्ष |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत

आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५३)** प्र. क्र.०८ मधिल विविध १ ते ४ कामे करणे कामी येणाऱ्या एकूण अंदाजित रक्कम रु. १,५३,०६,३५६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा सुधीर पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनुसार तसेच नागरीकांना रहदारी सुखसुविधा पुरविणे कामी प्र. क्र.०८ मधिल खालील नमूद विविध १ ते ४ कामे करणे कामी येणाऱ्या एकूण अंदाजित रक्कम रु. १,५३,०६,३५६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.०८ गट नं.२५/२ कोल्हे नगर, गिरणाई कॉलनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४१,६९,२४२/- |
| २ | प्र. क्र.०८ गट नं. २६ चंदुअण्णा नगर रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२५,१०,११४/- |
| ३ | प्र. क्र.०८ गट नं.११५/१ साईनगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६१,००,०००/- |
| ४ | प्र. क्र.०८ श्रीकृष्ण कॉलनी, जुनी पोलीस लाईन मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२५,२७,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.१,५३,०६,३५६/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५४)** प्र. क्र.१९ मधिल विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु. ९५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.विक्रम किसन सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनुसार तसेच नागरीकांना रहदारी सुखसुविधा पुरविणे कामी प्र.क्र.१९ मधिल खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु. ९५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.१९ मेहरुण अंतर्गत स.नं.२७४/२ रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.७५,००,०००/- |
| २ | प्र. क्र.१९ मेहरुण अंतर्गत स.नं.२१/पी सदाशिव नगर मध्ये व्यायाम शाळा बांधणे. | रु.२०,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.९५,००,०००/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५५)** प्रभाग क्र.१० अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत १ ते ८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ३.०० कोटी मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१० अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत खालील नमूद १ ते ८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ३.०० कोटी मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.१० मध्ये मयुर कॉलनी येथे नाल्यावर पुलाचे बांधकाम करणे. | रु.३५ लक्ष |
| २ | प्र. क्र.१० मध्ये खंडेराव नगर पासुन सबस्टेशनकडे जाणारा रस्त्याच्या बाजुला कॉक्रीट गटारीचे बांधकाम करणे. | रु.२० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्र. क्र.१० मयुर कॉलनी येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रु.६० लक्ष |
| ४ | प्र. क्र.१० मयुर कॉलनी येथे नाल्याला लागुन असलेला रस्ता कॉक्रीटींग करणे. | रु.१० लक्ष |
| ५ | प्र. क्र.१० सेंट्रल बँक कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५५ लक्ष |
| ६ | प्र. क्र.१० संत मिराबाई नगर येथे आर.सी.सी. गटारी बांधणे. | रु.५० लक्ष |
| ७ | प्र. क्र.१० निसर्ग कॉलनी व आनंदवन कॉलनी येथे आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.३० लक्ष |
| ८ | प्र. क्र.१० आसावा नगर येथे आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.४० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.३.०० कोटी |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५६)** प्रभाग क्र.१० अंतर्गत नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ७ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ३.०० कोटी मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१० अंतर्गत नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ७ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ३.०० कोटी मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.१० आसावा नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५० लक्ष |
| २ | प्र. क्र.१० निसर्ग कॉलनी, आनंदवन कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४० लक्ष |
| ३ | प्र. क्र.१० गणपती नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५० लक्ष |
| ४ | प्र. क्र.१० पिंप्राळा येथे विविध ठिकाणी सोलर हायमास्ट लॅम्प बसविणे | रु.३० लक्ष |
| ५ | प्र. क्र.१० पिंप्राळा स्टॉप पासुन ते कुंभारवाडा पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.३० लक्ष |
| ६ | प्र. क्र.१० संत मिराबाई नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६० लक्ष |
| ७ | प्र. क्र.१० गौरव पार्क येथे आर.सी.सी.गटार व रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.४० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.३.०० कोटी |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५७)** प्रभाग क्र.४ अंतर्गत दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ४ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ७५ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.चेतन गणेश सनकत यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.४ अंतर्गत दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ४ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ७५ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.४ गुरुनानक नगर परिसरात ४ गल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक टाकणे. | रु.२० लक्ष |
| २ | प्र. क्र.४ काटया फाईल परिसरातील गल्यांमध्ये कॉक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| ३ | प्र. क्र.४ चौफुले प्लॉट परिसरात ३ गल्यांमध्ये पेव्हर टाकणे व खंडु पाटील यांच्या घरापासुन ते सार्व.शौचालय गवळी वाडा पर्यंत पेव्हर ब्लॉक किंवा कॉक्रीटींग रस्ता तयार करणे. | रु.२० लक्ष |
| ४ | प्र. क्र.४ चंदन वाडी परिसरातील २ गल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक टाकणे. | रु.१५ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.७५ लक्ष |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५८)** प्रभाग क्र.९ अंतर्गत दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ५ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १.६५ कोटी मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.९ अंतर्गत दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ५ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १.६५ कोटी मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र. क्र.९ मुक्ताई नगर येथे विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | रु.८० लक्ष |
| २ | प्र. क्र.९ निवृत्ती नगर येथे विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | रु.४० लक्ष |
| ३ | प्र. क्र.९ हायवे दर्शन कॉलनी येथे विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३० लक्ष |
| ४ | प्र. क्र.९ गट नं.३० मुक्ताई येथे ओपनस्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.१० लक्ष |
| ५ | प्र.क्र.९ बेंडाळे नगर ओपनस्पेसला पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.०५ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.१.६५ कोटी |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५९)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मनपाच्या दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत १ ते ८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. २,१२,००,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मनपाच्या दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. २,१२,००,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ममुराबाद रेल्वे पुल ते भिलपुरा पोलीस चौकी ते अंबुरावजी कासार यांचे दुकाना पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.५५ लक्ष |
| २ | शनि मंदीर ते दधिची चौक (कुंभार वाडा) पर्यंतचा रस्ताडांबरीकरण करणे | रु.१० लक्ष |
| ३ | श्रीराम मंदीर ते प्रकाश जगताप यांचे घरापर्यंत ते साई बाबा मंदीर (तेली चौक) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.१४ लक्ष |
| ४ | चौधरी वाडा ते भोईटे गढी ते रथ चौक ते बोहरी बाजार पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.२५ लक्ष |
| ५ | रथ चौक राजमल लखीचंद ज्वेलर्स ते अंबुरावजी कासार यांचे दुकाना पर्यंत (सराफ बाजार) चा रस्ता डांबरीकरण करणे | रु.१६ लक्ष |
| ६ | शनि पेठ मधील श्री.गफ्फार मलिक यांचे घराजवळील ३ पुर्व पश्चिम रस्ते डांबरीकरण करणे | रु.५१ लक्ष |
| ७ | चौधरी वाडा ते भाग्य लक्ष्मी टेंट हाऊस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.२० लक्ष |
| ८ | रथ चौक ते बोहरी बाजार पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.२१ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.२,१२,००,०००/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६०)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मनपाच्या नागरी दलित्ततेर वस्ती सुधार योजने अंतर्गत १ ते २८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ८.०२ कोटी मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मनपाच्या नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील नमूद १ ते २८ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ८.०२ कोटी मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इंडो अमेरीका हॉस्पिटल ते आर.आर. शाळे पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२७ लक्ष |
| २ | डॉ.किरण मुठे यांच्या दवाखान्या समोरील / पेपर किंग समोरील पुर्व पश्चिम रस्ता | रु.२४ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | डांबरीकरण करणे. | |
| ३ | डॉ.अशोक शहा यांचे दवाखान्या पासुन बि.जे.मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२२ लक्ष |
| ४ | कार्पोरेशन बँक ते व.वा.वाचनाल (गोरजाबाई जिमखाना)रस्ता डांबरीकरण करणे | रु.१८ लक्ष |
| ५ | जुनी सरस्वती डेअरी ते सुरेश कलेक्शन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | रु.१८ लक्ष |
| ६ | काबरा टायपींग ते नवी सरस्वती डेअरी पर्यंतचा रस्ता (दोन्ही बाजु) डांबरीकरण करणे | रु.३२ लक्ष |
| ७ | जैन मंदीर ते आदीती साडीया (शरद सायकल मार्ट) पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२२ लक्ष |
| ८ | जुने एल.आय.सी.ऑफीस ते जुने श्रीराम पेट्रोल पंपा पर्यंत (नवजीवन सुपरशॉप समोरील) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३२ लक्ष |
| ९ | ब्राम्हण सभे समोरील गाडगीळ यांचे घरापासून शेवटपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५ लक्ष |
| १० | प्रभुदेसाई चौक ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१६ लक्ष |
| ११ | जुनी नगरपालिका ते प्रभुदेसाई चौकापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२२ लक्ष |
| १२ | रेल्वे स्टेशन ते जिल्हा परीषद चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४८ लक्ष |
| १३ | बोहरा गल्ली ते मराठा मटन हॉटेल (तिजोरी गल्ली) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२१ लक्ष |
| १४ | सदानंद व्हि.डी.ओ. ते भाटीया मार्केट (अशोक टॉकीज समोरील) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२१ लक्ष |
| १५ | प्रकाश मेडीकल ते शिवाजी चौक रस्ता व जुनी न.पा. ते लेले संकुल रस्ता या दोन रस्त्यांना जोडणारे पाच पुर्व पश्चिम रस्ते डांबरीकरण करणे | रु.२९ लक्ष |
| १६ | खैरनार ऑप्टीकल ते सुभाष चौक ते भवानी माता मंदीरा जवळील अंबुरावजी कासार यांचे दुकाना पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४६ लक्ष |
| १७ | हॉटेल करीश्मा ते श्री.विष्णुभाऊ भंगाळे यांचे घरापर्यंत ते सिव्हील हॉस्पिटलचा पुर्व दक्षिण कोपरा पर्यंतचा रस्ता (रामा शु सेंटर रस्ता) डांबरीकरण करणे. | रु.२९ लक्ष |
| १८ | गटाणी चाळ रोड बि.जे.मार्केट ते विलास हरी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२३ लक्ष |
| १९ | हॉटेल मिनर्व्हा ते डॉ.सुभाष चौधरी यांचे हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता | रु.२० लक्ष |
| २० | जुने एप्लॉयमेंट ऑफीस ते महाराष्ट्र बँक ते गुरुव्दारा (सिव्हीलच्या पाठी मागील) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२७ लक्ष |
| २१ | हॉटेल रिच पॅलेस/राज रेसिडेन्सी ते अॅड श्री.झाल्टे यांचे घरापर्यंतचा उत्तर दक्षिण रस्ता | रु.१७ लक्ष |
| २२ | मॉडर्न गर्ल हायस्कुल ते आर.आर.शाळे मागील श्री.शामभाऊ कोगटा यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२७ लक्ष |
| २३ | डॉ.किरण मुठे ते गटाणी चाळ पर्यंत उत्तर दक्षिण रस्ता डांबरीकरण करणे | रु.२१ लक्ष |
| २४ | गायत्री मंदीर ते आप्पा महाराज समाधी पर्यंतचा पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३८ लक्ष |
| २५ | राधाकिसन वाडी मध्ये बालगंधर्व कोपरा ते मॉडर्न गर्ल हायस्कुल गेट नं.२ पर्यंतचा रस्ता | रु.१९ लक्ष |
| २६ | पारीख पार्क उदयान्याचे सभोवतालीचे रस्ते डांबरीकरण करणे | रु.२१ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २७ | शाहुनगर हौ.सोसायटी सि.टी.स.नं.२६८३/बी मधील सर्व रस्ते (५ रस्ते) डांबरीकरण करणे. | रु.१०० लक्ष |
| २८ | जयकिसन वाडी भागातील संपूर्ण रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४७ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.८.०२ कोटी |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६१)** वार्ड नं.१७ मधील श्री.कृष्णनगर(श्रीकृष्ण मंदिर) पासुन गोपाळपुरा नाल्याच्या पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. २० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.सुनिल वामनराव खडके यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, वार्ड नं.१७ मधील श्री.कृष्णनगर(श्रीकृष्ण मंदिर) पासुन गोपाळपुरा नाल्याच्या पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. २० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६२)** प्रभाग क्र.०७ मधील श्री.कृष्ण कॉलनी, एल.आय.सी.कॉलनी व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे कामी अंदाजित रक्कम रु.२,२५,००,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०७ मधील श्री.कृष्ण कॉलनी, एल.आय.सी.कॉलनी व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे कामी अंदाजित रक्कम रु.२,२५,००,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६३)** मनपा शाळा क्र.११ व १५ चे नामकरण करणे व दत्तक घेणेबाबत सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक तसेच ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात संस्था यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.
**श्री.ईब्राहीम पटेल :-** गोराणे साहेब थांबा ना दोन मिनिट ६३ नंबरचा जो ठराव आहे ना त्याच्यामध्ये बोलायचे आहे. गोराणेसाहेब
**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई हा विषय क्रं .६३ मध्ये मनपा शाळा क्रं. ११ व १५ चे नामकरण करणे व दत्तक घेणे बाबत सन्मा.सदस्य प्रशांत नाईक यांनी प्रस्ताव दिलेला आहे. तर त्यामधील ११ नंबर शाळा जी आहे ती दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मान्यता देण्यात यावी आणि शाळा क्रं. १५ जी आहे ती शाळा क्रं. १५ रद्द करण्यात यावी. त्याच्या संदर्भात तिथले स्थानिक नगरसेवक ज्यावेळेला त्याच्यावर प्रस्ताव देतील त्यावेळेला योग्य तो विचार करण्यात येईल.
**नगरसचिव :-** किती नंबर विषय आहे तो.
**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं .६३
**नगरसचिव :-** हो.
**श्री.ईब्राहीम पटेल :-** शाळा नंबर १५
**श्री.नितीन लढ्ढा :-** वो कर लेंगे अब
**नगरसचिव :-** याच्यामध्ये सन्मा.सदस्या सुन्नाबी राजु देशमुख यांचे एक पत्र आलेले आहे
**श्री.ईब्राहीम पटेल :-** कशामध्ये
**नगरसचिव :-** सन्मा.सदस्या सुन्नाबी देशमुख जो प्रस्ताव क्रं. ६३ आहे त्याला त्यांनी हरकत घेतलेली आहे की , अशासकीय प्रस्ताव क्रं. ६३ ला माझा पुर्ण विरोध आहे. महानगरपालिका शाळा क्रं. ११ व १५ चे नामकरण करण्यात येवु नये. कारण शाळेचे काय नामकरण करणार याचा उल्लेख केलेला नाही. छोटी मोठी देणगी देवुन
**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे महापौरताई त्यांचा विरोध नोंदवुन घेण्यात यावा.
**नगरसचिव :-** हो

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ११ नंबर ची जी शाळा आहे ती मंजुर करण्यात यावी. १५ नंबरचा विषय रद्द करण्यात यावा शाळेचा

**सन्मा. सदस्या. सुन्नाबी राजु देशमुख यांनी विषय क्रं. ६३ साठी दिलेले हरकती बाबतचे लेखी पत्र**

अशासकीय प्रस्ताव क्रं. ६३ ला माझा पुर्ण विरोध आहे. महानगरपालिका शाळा क्रं. ११ व १५ चे नामकरण करण्यात येवु नये कारण शाळेचे काय नामकरण करणार यांचे सुध्दा उल्लेख केलेला नाही. छोटी मोठी देणगी देवुन कोणीही अश्या प्रकारची मागणी करेल व चुकीचा पायांडा सुरु होईल . मुळात महानगरपालिकेच्या शाळांचे स्वतंत्र अस्तित्व असावे. एखाद्या व्यक्तीचे नांव देवुन नये व महानगरपालिकेचे अशा प्रकारच्या अस्तित्व टिकवुन ठेवावे

तसेच सदर शाळा दत्तक घ्यावी असे समस्त मेमन जमात जळगांव ट्रस्टची मागणी त्याबाबत ते शाळाचे इमारती करीता शैक्षणिक साहीत्याकरीता किंवा शाळेच्य इमारत दुरूस्ती करीता किती खर्च करणार आहे याबाबत त्यांच्या पत्रात उल्लेख नाही . याबाबत सविस्तर प्रस्ताव व शाळेबाबत काय योजना करणार याची पुर्ण माहिती घेतल्याशिवाय त्यांचा प्रस्ताव व शाळेबाबत काय योजना करणार याची पुर्ण माहिती घेतल्याशिवाय त्यांचा प्रस्ताव महासभेने स्विकारू नये तसेच त्यांचे पाल्य सदर शाळेत शिक्षण घेतात त्यांचे पण म्हणणे ऐकुन घ्यावे व परिसरातील नागरीकांची ना-हरकत घ्यावी त्यानंतर निर्णय घ्यावा सदर विषय तहकुब करण्यात यावा ही विनंती .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात संस्था, जळगांव यांनी सुप्रिम कॉलनी व गेंदालाल मिल परिसरातील जळगांव शहर महानगरपालिका ऊर्दु शाळा क्र.११ व १५ चे नामकरण कायमस्वरुपी ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात, जळगांव ऊर्दु शाळा असे करणेबाबत तसेच सदर शाळा संस्थेस दत्तक देणेबाबत मागणी केलेली असून ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात संस्था,जळगांव ही नोंदणीकृत संस्था असून उक्त शाळेत मुलांसाठी आवश्यक सुविधा पुरवणे, मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अतिरिक्त शिक्षकांची नेमणूक करणे, महानगरपालिकेतर्फे अल्पसंख्याकांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करणार असल्याचे मागणी अर्जात नमूद केलेले असून महासभेत झालेल्या चर्चेनूसार व सूचनेनूसार सुप्रिम कॉलनी व गेंदालाल मिल परिसरातील जळगांव शहर महानगरपालिका ऊर्दु शाळा क्र.११ व १५ पैकी जळगांव शहर महानगरपालिका ऊर्दु शाळा क्र.११ चे नामकरण कायमस्वरुपी " ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात, जळगांव ऊर्दु शाळा " असे करणेस तसेच सदर शाळा ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन व समस्त मेमन जमात, जळगांव संस्थेस दत्तक देणेस मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच जळगांव शहर महानगरपालिका ऊर्दु शाळा क्र.१५ चे नामकरण व दत्तक देणेबाबतची संस्थेने केलेली मागणी रद्द करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर मनपा शाळा क्र.११ चे यापुर्वी नामकरण झाले नसलेबाबत व कोणत्याही संस्थेस दत्तक दिले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ४०　　　　प्रतिकुल मते :- ०१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६४)** दलितेत्तर निधी अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधिल ०१ ते ०६ विविध कामे करणे व याकामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.४,६१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेलया प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना सेवा पुरविणे कामी खालील कामे करुन घेणे गरजेचे असल्याने तसेच याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामे त्वरीत करुन घेणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे दलितेत्तर निधी अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधिल खालील नमूद ०१ ते ०६ विविध कामे करणे व याकामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.४,६१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत मलिक नगर कय्युम देशमुख नगर इक्बाल कॉलनी स.नं.०१, स.नं.०९ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.०१.५० कोटी |
| २ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत मिल्लत मस्जिद ते इक्बाल कॉलनी पुलापर्यंत संरक्षण भिंत बांधणे. | रु.०१.२१ कोटी |
| ३ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत कय्युम देशमुख नगर पुलापासून ते नॅशनल हायवे पुलापर्यंत संरक्षण भिंत बांधणे. | रु.७० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत जोशीवाडा दत्त मंदीराजवळील नाल्यावर पुल बांधणे. | रु.३० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत पिरजादे कब्रस्थान पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.६० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत ग.नं.६/१ मनपा खुल्याजागेत पत्री शेड सभामंडप बांधणे. | रु.३० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.४,६१,००,०००/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६५)** दलितेत्तर निधी अंतर्गत प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत फुकटपूरा सार्व.शौचालय ते ईच्छादेवी मंदीर ते शिरसोली नाकापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे, स्लॅब कल्व्हेट व पाथवे तयार करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.४०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेलया प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना सेवा पुरविणे कामी खालील कामे करून घेणे गरजेचे असल्याने तसेच याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामे त्वरीत करुन घेणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे दलितेत्तर निधी अंतर्गत प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत फुकटपूरा सार्व.शौचालय ते ईच्छादेवी मंदीर ते शिरसोली नाकापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे, स्लॅब कल्व्हेट व पाथवे तयार करणे कामी येणारा एकूण अंदाजित रक्कम रु.४०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४१ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६६)** विशेष महासभा ठराव क्र.७२ दि.१९/०१/२०१९ २) महासभा ठराव क्र.१६४ दि.०६/०६/२०१९ सदर ठरावातील कामे हे शासकीय निधीतुन प्रस्तावीत करण्यात आलेली होती. परंतु निधी प्राप्त न झाल्याने सदरची कामे झालेली नाहीत. तसेच महासभा ठराव क्र.३९६ दि.२६/०२/२०२१ मधिल मंजूर विकास कामे मनपाच्या स्वनिधीतून करणे प्रस्तावीत होते. परंतु सदरचे कामे स्वनिधीतुन करणे शक्य होणार नाही. जळगांव शहर मनपा हद्दीतील अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना अंतर्गत सुरु असलेली कामे पुर्णत्वास येत असल्याने व या कामामुळे जळगांव शहरातील सर्व रस्त्यांची अवस्था बिकट झाल्याने संपुर्ण शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण त्वरीत करणे आवश्यक आहे. यापुर्वी निश्चित केलेली कामे रद्द करुन सदरचे तिन्ही ठराव रद्द करणेस व सोबत जोडलेला प्रस्ताव व यादी प्रमाणे शहरातील रस्ते डांबरीकरण करण्याच्या कामांसाठी शासनाच्या नगरविकास विभागाकडेस रक्कम रु.१०० कोटी मिळणेसाठी व या निधीतुन मनपामार्फत रस्त्यांचे यादीप्रमाणे कामे करणेस शासनाकडेस प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा व मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई आपण आता विषय क्रं. चे विकासाचे विषय क्रं. १६ ते पासुन विकास कामांचे प्रस्ताव जे मान्य करण्यात आलेले आहे. शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा नियोजन मंडळाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल. त्या निधिच्या अनुषंगाने त्या परिस्थिती मध्ये काम प्रस्तावित करण्याच्या संदर्भात मा.महापौर ताईंना आपण प्राधिकृत करण्यात येत आहे कि उपलब्ध निधिच्या अनुषंगाने त्याच योग्य पध्दतीने नियोजन व्हाव अशा पध्दतीच काळजी मा.महापौरताईंनी घ्यावी.

**मा.महापौर :-** मान्य आहे जसा निधी शासनाकडुन आपल्याला प्राप्त होईल त्या पध्दतीने प्रायोरिटीने कामे करण्यात येतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** धन्यवाद.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** १६ ते ६६ मंजुर झालेले आहेत ना

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो गोराणेसाहेब १६ ते ६७ पर्यंत झाले आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई ६६ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ६७ , ६८ , ६९ हे सारखेच आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई ६६ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला ताई बोला.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया

**श्री.कैलास सोनवणे :-** अश्विनभाऊ बोलणार आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** आप्पा अश्विनभाऊ बोलणार असतील तर अश्विनभाऊंनी बोलाव .भारतीय जनता पार्टी तर्फे विषय क्रं. ६६ मध्ये बोलावे.

**मा.महापौर :-** बोला अश्विनभाऊ

**ॲड . शुचिता हाडा :-** राजुदादा आपण बोलत असाल तर आपण बोलाव.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्ही बोला आमचे विषय वेगळे आहेत. आवाज येतोय का ?

**मा.महापौर :-** शुचिताताई

**ॲड . शुचिता हाडा :-** हो ताई

**मा.महापौर :-** आप्पा

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया विषय क्रं ६६ जो आहे. विषय क्रं. ६६ मध्ये

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्यांनी कृपया ठरवुन घ्या कोणाला बोलायच आहे.कुणीही एक जणाने ते मत मांडायच आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** कुलभुषणदादा मला अप्पांनी सांगीतले की अश्विनभाऊ बोलतील किंवा आपण बोलत असाल तर आपण बोला , बोला राजुदादा

**मा.उपमहापौर :-** कुणीही मत मांडा त्यांना कुणाला बोलायचे आहे बोला

**ॲड . शुचिता हाडा :-** राजुदादा बोला , राजुदादा आपण बोलत आहात का

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई आपण बोला ना , ताई आपण बोला.

**ॲड . शुचिता हाडा :-** ठिक आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** कुणीही बोला ना दादा लवकर बोला सभेला

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचे विषय घ्या .मंजुर

**श्री.प्रशांत नाईक :-** मंजुर , मंजुर

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विषय क्रं. ६६ मध्ये अस दिसुन येत आहे की मागचे आपण अनेक प्रस्ताव आज रद्द करत आहोत आणि शासन दरबारी पुन्हा एकदा निधीसाठी मागणी करत आहोत. मुळात हे अत्यंत चुकीच्या पध्दतीने चाललेल आहे असे निदर्शनास येते आहे. खर तर शासनाकडुन आपल्याला निधी मंजुर झालेला होता. त्यापैकी ४२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी सुध्दा मिळालेली आहे. प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर शासनाने एकदा आपल्याला एखाद्या कामाबद्दलची प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर ते काम कधीही रद्द करता येत नसत. महासभेला मुळात हा अधिकार नाही. त्यामुळे आपण हा असा चुकीचा निर्णय घेवु नये अशी माझी सभागृहाला नम्र विनंती आहे. किंबहुना उलटपक्षीय आपण शासनामध्ये आपल सरकार जेव्हा आहे. त्यावेळेला किरकोळ कारणांमुळे असलेली ही स्थगिती जैसे थे जी परिस्थिती आहे. जो स्टेटसको होता तो ताबडतोब उठवावा आणि शहराच्या विकासाला सुरूवात करावी. पुन्हा पहिल्या पायरीवर विषयाला आणुन ठेवु नये की ज्याची तांत्रिक मान्यता प्रशासनाने दिलेली आहे. शासनाने मंजुरी दिलेली आहे. त्याच्यासाठीचा निधीसुध्दा म्हणजे पहिल्या टप्प्यातला जो स्व हिस्सा आहे महापालिकेचा तो सुध्दा आपल्या खात्यात येवुन पडलेला आहे माझ्या माहिती प्रमाणे आणि याच्याबद्दल अनेकवेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. तर या स्टेज पर्यंत जे काम येवुन थांबलेल आहे. ते थांबवणे आणि त्याला पुन्हा पहिल्या पायरीवर नेणे हे योग्य वाटत नाही. हे नियमाला धरून नाही. त्यामुळे याची सभागृहाने नोंद घ्यायची आहे. आपण शिवसेनेतर्फे महापौर आहात. शिवसेनेची आता राज्यात सत्ता आहे. मुळात ज्यावेळेला हा १०० कोटींचा निधी मंजुर झाला होता. त्यावेळेला सुध्दा आपण शासन दरबारी भारतीय जनता पार्टी सोबत होतात म्हणजे आपल्याच शासनाने खरतर हा मंजुर केलेला तो निधी होता. ज्यातल्या ५८ कोटींच्या साठींच्या विषयाला मान्यता सुध्दा मिळालेली नाही . तांत्रिक मान्यतेसाठी ते पेंडीग आहे. तर माझी आपल्याला अशी विनंती आहे महापौरताई ४२ कोटींवरची स्थगिती ताबडतोब आपण उठवावी. त्यासंदर्भात पाठपुरावा

करून आणि ५८ कोटींसाठींच्या कामाला चालना द्यावी. तो विषय सुध्दा आपण पाठपुरावा करून मार्गी लावावा. त्यानंतरही वेगळया निधीसाठीही आपण शासनाकडे मागणी करु शकता.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया ,या मध्ये दुसरा अजुन एक विषय आहे. मागच्या महासभांमध्ये जे काही ठराव झालेले होते, मनपा फंडामधुन काम करण्याबाबतचे तर ते आपण रद्द करतोय.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ , शुचितातार्इ यावर सन्मा.कैलासआप्पांनी आपल मत नोंदवलेल आहे आणि आपल्या सर्व सुचनांच या ठिकाणी नोंद घेण्यात येत आहे आणि पुढील हा विषय मान्य करण्यात येत आहे आणि पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर मॅडम , महापौर मॅडम एक मिनिट मी जे मत मांडलेल आहे . जे विकास कामांचे ठराव आहे ते मंजुर करावे. हा विषय जो आहे शुचितातार्इ चर्चा करतात आहेत. त्यांच मत मांडतात आहे त्यांच्याशी आम्ही सहमत आहे या विषयावर

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे , शुचितातार्इंचे मा.महापौर तार्इ

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर तार्इ शुचितार्इंनी जे मांडले आहे त्यावर मी उत्तर देतो आणि त्यांच समाधान करून देतो.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई , मला बोलण्याची संधी द्यावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** तार्इ मला पुर्ण बोलुन घेवु द्या . आधी

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आपण बोलुन घ्या.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** आयुक्त महोदयांना मला एक प्रश्न ईथे विचारायचा आहे. की ज्यावेळेला ४२ कोटी

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** मिनाक्षी तार्इ मला परवानगी दिलेली आहे माझ बोलण होवुन जावु द्या. त्यानंतर आपण परवानगी मागवा .कृपया मध्ये डिस्टर्ब करू नका. महापौरतार्इ, माझ आयुक्त महोदयांना ईथे विचारण आहे. ज्यावेळेला मागे ४२ कोटींच्या कामांना जेव्हा स्थगिती आली होती. त्यावेळेला मी महासभेसमोर मी एक विषय आणलेला होता की आपल्या ह्या कामांना स्थगीती देत आहे शासन, त्यावेळेला त्याची दाद मागण्यासाठी कार्टात जाण्याचा विषय आला होता. त्यावेळेला प्रशासनातर्फे आपल्याला अस उत्तर देण्यात आल होत. जेव्हा आमच्या शासनाने म्हणजे इथल्या प्रशासनाच्या वरती शासन आहे आणि शासनाने जेव्हा एखाद्या विषयाला स्थगिती दिलेली आहे आणि शासनाच्या विरोधात आम्ही जावु शकत नाही. अस आयुक्त साहेबांच तेव्हा म्हंणण होत. माझा आयुक्त साहेबांना आता हाच प्रश्न आहे. ज्यावेळेला आपल्याच शासनाने एखाद्या विषयाला तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्या साठीच्या निधीचा पहिला टप्पा सुध्दा वितरीत झ ाालेला आहे. त्यावेळेला आजच्या महासभेने जर तो ठराव रद्द करण्याचा प्रस्ताव मंजुर जरी केला बहुमताने तरी आयुक्त साहेब आपण आपल्या शासना विरोधातल्या या प्रस्तावाला मान्यता देवुन पुढे कार्यवाही साठी पाठवाल का ? आयुक्त महोदय या विषयाबद्दलच आपल मत आपण ईथे व्यक्त कराव माझी आपल्याला विनंती आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तार्इ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर तार्इ

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला तुम्ही

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर तार्इ

**मा.महापौर :-** बोला भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरतार्इ आता मा.शुचितातार्इंनी ज्या काही सुचना उपस्थित केल्या. मी सुचनेंच्या विरोधात नाही आहे. परंतू ज्यावेळेला ४२ कोटींची काम मंजुर करण्यात आलेली होती. त्यावेळेचा कालावधी हा एक वेगळा कालावधी होता. त्यावेळेला अमृत योजनेचे दोघ योजनेंचे काम जळगांव शहरामध्ये सुरू होते आणि त्यामुळे त्याच्यामध्ये फक्त १६ कोटी रूपयांची जी काम होती ती फक्त रस्त्यांची प्रस्तावित करण्यात आली होती आणि उर्वरीत २६ कोटींची काम जी होती. ती संरक्षण भिंती, कंपाऊंड वॉल बांधणे, नाले संरक्षण भिंती बांधणे, खुल्या जागेंमध्ये जीम बांधणे , सामाजिक सभागृह बांधणे. अशा पध्दतीनचा २६ कोटीचा निधी त्याच्यावरती खर्च होत होता. आमचा विकास कामांना

विरोध नाहीये. परंतू शहराची प्राथमिकता जी आहे ती आज बघतोय की संपुर्ण शहराची पहिली प्राथमिकता जी आहे ती रस्त्यांची आहे. आज रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे. अमृतचे आणि भुयारी गटारी योजनेचे दोघेही काम पुढच्या तिन महिन्यामध्ये दृष्टीक्षेपात आहे की पुढच्या तिन महिन्यामध्ये या दोघही योजना पुर्ण झाल्यानंतर सामान्य नागरीकांच्या याच अपेक्षा असतील की आमची रस्त्यांची कामे प्राधान्याने मार्गी लावुन देण्यात यावी आणि याच दृष्टीकोनातुन

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण मुळात आपल्याकडे निधीची कमतरता आहे आणि निधीची कमतरता असल्याकारणाने आलेल्या निधीच योग्य पध्दतीने नियोजन करण हा संपुर्ण सभागृहाच्या अधिकाराचा विषय आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ , भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि सामान्य जनतेच्या भावनेशी आपण या विषयाच्या अनुषंगाने बघायला पाहीजे. आमच अस नाहीये की त्या सरकारने दिलेल होत म्हणुन आम्ही रद्द करतोय. अशातली बाब नाहीये. आपण या १०० कोटींच संपुर्णत: नियोजन एकही रूपया इतर कामांवरती खर्च न करता पुर्णपणे नियोजन हे संपुर्ण रस्त्यांच्या कामावरतीच करतोय आणि त्यामध्येही आपण कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता जी ७० कोटींची काम मा.आमदार महोदयांनी सुचविलेली होती . जी आपण रद्द करतोय . त्या कामांचा समावेश करून आणि उर्वरीत सर्व प्रभागातील सर्व सदस्यांचा म्हणजे आपण यादीवर नजर टाकाल तर निश्चितपणे आपल्याला लक्षात येईल की बहुतांशी काम जी आहेत. हे सन्मा .सदस्य हे भारतीय जनता पक्षाचे आहेत . त्यांच्या प्रभागात सुचविलेली काम आहेत. याच्यामध्ये असा कुठलाही भेदभाव केलेला नाही की हा विरोधकांचा वॉर्ड आहे किंवा हा सत्ताधाऱ्यांचा आहे असा कुठलाही भेदभाव न करता संपुर्ण रस्त्यांची सर्व समावेशक काम त्याच्यामध्ये सुचविण्यात आलेली आहे म्हणुन आणि या संगात मा.ना.गुलाबभाऊ पाटील यांनी , एकनाथरावजी शिंदेसाहेब, नगरविकास मंत्री यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगीतलय की आपण १०० कोटींचा एकत्रित प्रस्ताव पाठविण्यात यावा आणि आम्ही पुर्वीची सगळी निविदा प्रक्रीया रद्द करून एकत्रित तुमचा १०० कोटींचा निधीचा प्रस्ताव मान्य करून तो निधी महानगरपालिकेकडे वर्ग करू. यापुर्वी आपण काम प्रस्तावित करत असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडे काम प्रस्तावित केली होती आणि त्या कारणामुळेच या संपुर्ण कामांना इतक्या मोठया प्रमाणावरती विलंब झाला आणि त्या विलंबामुळे काय झालय की त्यावेळेला निधि उपलब्ध असुन सुध्दा आपण काम मार्गी लावु शकलो नाही. याची खंत ती आपल्या मनातही असेल आणि आमच्या मनातही आहे. तर या विषयाला

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ , नितीनभाऊ हा सगळा खटाटोप या साठी चाललाय का की ही सगळी काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिली आणि ती मनपाकडे यावीत म्हणुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न तो नाहीये , मुळ प्रश्न मी तुम्हाला आधीच क्लियर केला की त्याच्यामध्ये २६ कोटींची काम जी आहेत . त्याची आज प्राथमिकता नसुन आज जी प्राथमिकता आहे ती १००% कामे रस्त्यांची आहे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ, ४२ कोटींच रद्द करण्यापेक्षा आपण प्राथमिकता ठरवुन आपण नंतर त्याच्यामध्ये बदल करू शकतात.

**श्री.राजेंद पाटील :-** महापौरताई, नितीनभाऊ

**ॲड . शुचिता हाडा :-** ५८ कोटी जे प्रलंबित आहेत . त्यामध्ये योग्य पध्दतीने नियोजन करून ते सगळ करू शकता आहात आणि पुन्हा एकदा मी सभागृहाला आठवण करून देते की मी आयुक्त साहेबांना येथे प्रश्न विचारला आहे की आज जरी हा बहुमताच्या जोरावर हा ठराव झाला तरी सुध्दा आयुक्त जाणार का, शासनाच्याच विरोधात जो प्रस्ताव होतो आहे. त्या विरोधात, त्यापुढे हा प्रस्ताव आयुक्त पाठवणार का , पाठवु शकतात का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ताई माझ म्हणण फक्त ऐकुन घ्या. ठराव जरी मंजुर केला तर निधीसुध्दा देण शासनाचं काम आहे. त्याला प्रशासकीय मान्यता देण्यापासुन

**श्री.राजेंद्र पाटील :-** सन्मा.नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्व निधी हा शासनच देणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सन्मा.नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये आयुक्त म्हणा किंवा सभागृह म्हणा यांनी घेतलला निर्णय हा अंतिम: शासनच मान्य करणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया

**ॲड . शुचिता हाडा :-** आमच एवढच म्हणण आहे की आयुक्तांनी उत्तर द्यावे आमच्या प्रश्नाचे आणि शासनाचे

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई , ताई

**ॲड . शुचिता हाडा :-** बोला राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, हो, महापौर महोदया, सन्मा.नितीनभाऊ आता ४२ कोटी मंजुर झालेले आहे. त्यातही काम खुप महत्वाची आहेत. जरी

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई , मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण रोडाचे ठिक आहे त्यावेळी अडीच वर्षापुर्वी आपल्या शहरामध्ये अमृत योजनेच , अंडरग्राऊंड गटारच काम चालु होत. त्याच्यामुळे त्या ४२ कोटीच्या कामामध्ये त्याच्या त्या तुमचे १५ / १६ कोटी रस्त्यांसाठीच आहे. २० /२५ कोटी जी आहे ती इतरत्र काम टाकलेली आहेत. त्यामध्ये आज बघा तुम्ही स्मशानभुमिची अवस्था खुप खराब झालेली आहे. मेहरूणच्या स्मशानभुमिसाठी ३७ लाख रूपये मंजुर झालेले आहे. पिंप्राळयाच्या स्मशानभुमिसाठी ३७ लाख रूपये मंजुर झालेले आहे. ही आज गरजेची गोष्ट आहे. स्मशानभुमि आपल्याकडे अवस्था बघा , आमच्या मेहरूणच्या स्मशानभुमिमध्ये येवुन बघा. तरी ह्या ४२ कोटींत जे मंजुर झालेले आहेत ते तसेच्या तसे राहु द्यावे. तर तो निधी वापरला जावा. आपण आपल पालकमंत्र्यांकडे त्यांचेकडे पालकमंत्री महोदयांकडे जावुन आपण परत १०० कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मी आपल्यास सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** राजुभाऊ मला एक विषय विचारायचा आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** राजेंद्रभाऊ आपल्या मेहरूणची जी स्मशानभुमि आहे याच्यासाठी ती सुशोभिकरण करण्यासाठी बऱ्याच सामाजिक संस्था पुढे आलेल्या आहेत. तर तिथले सुशोभिकरण किंवा तिथली जी अवस्था आहे. ती पुर्णपणे स्मशानभुमिंची काम सद्यस्थितीमध्ये सुरू आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, ताई

**मा.महापौर :-** आपण अमृत योजनेमुळे जी आपल्या रस्त्यांची अवस्था झाली आहे. त्यासाठी १६ कोटी निधी फार तुटपुंजा आहे. १०० कोटी निधी जरी आपण मागवला तरी सुध्दा पुर्णपणे १०० टक्के जळगांव शहराचे कामे होणार नाही . त्यामुळे आपण प्राधान्याने जळगांव शहरासाठी रस्त्यांसाठी आपण तो निधी वापरणार आहोत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** इतरत्रही कामे आहेत ताई आणि महोदया

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई हा विषय मंजुर करा आणि पुढचे विषय घ्या.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** पुढचे घ्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया मी प्रश्न विचारले होते त्या प्रश्नांची उत्तर मात्र आयुक्त साहेबांनी सभागृहासमोर दिलेले नाहीत.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** महापौरताई मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**मा.महापौर :-** मिनाक्षीताई बोला आपण

**सौ.मिनाक्षी पाटील :-** ताई मला अस म्हणायच आहे हा जो ४२ कोटी निधी आहे ना त्यात आमच्या प्रभागातले काम टाकलेले नाहीये. तर मग माझ अस म्हणण आहे की प्रत्येक प्रभागामध्ये योग्य रितीने कामे घेतलेले नाहीयेत व सर्व प्रभागात कामे टाकण्यात यावी. असे माझे म्हणणे आहे समप्रमाणात करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चित ताई, निश्चित

**मा.महापौर :-** मिनाक्षीताई हा ठराव रद्द करण्यात येणार आहे आणि आपण नविन जो ठराव करणार आहे. त्यात आपण आपल्या प्रभागाची कामे टाकणार आहोत प्रस्तावित आहेत.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** ठिक आहे ताई.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई , ६७ आणि ६८ विषय विकासकामांचा असल्याकारणाने मान्य करण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितिनभाऊ एक मिनिट
**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझ अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब
**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला आप्पासाहेब
**मा.महापौर :-** सदरील विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई एक मिनिट
**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया , सदर विषयास भारतीय जनता पार्टीचा विरोध नोंदवावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई
**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला आप्पासाहेब
**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेबांना उत्तर द्यायला सांगा. हाडा ताईंनी जो प्रश्न विचारला आहे त्याच उत्तर द्यायला लावा पहिले
**मा.महापौर :-** आयुक्त साहेब यावर आपण क्लिरीफीकेशन द्या.
**मा.आयुक्त :-** विषय क्रं. ६६ जो आहे. हा अशासकीय प्रस्ताव आहे. अशासकीय प्रस्तावांच्या बाबतीमध्ये जे ठराव वेगवेगळया समित्यांमध्ये किंवा मग महासभेध्ये होतात. त्याची अंमलबजावणी करण्याची एक आपली महानगरपालिकांच्या अंतर्गतची एक प्रशासकीय कार्यपध्दती आहे. कोणत्याही अशासकीय प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची कायदेशीर छाननी संबंधित विभागाकडुन केली जाते. जर तो प्रस्ताव योग्य असेल तर त्याची अंमलबजावणी होते , जर तो प्रस्ताव काही कारणाने अंमलबजावणीला अयोग्य असेल तर अधिनियमातील तरतूदीप्रमाणे प्रशासन कार्यवाही करते. कोणताही अशासकीय प्रस्ताव असला तरी त्याच्या अंमलबजावणीची पध्दतीची कार्यपध्दती हीच आहे.
**ॲड . शुचिता हाडा :-** आयुक्त महोदय माझी आता आपल्याकडुन अपेक्षा असणार आहे की या बद्दलची जी कार्यपध्दती आपण आत्ताच नमुद केली. त्या कार्यपध्दतीच आपण पालन कराव आणि हा अशासकीय प्रस्ताव कायदेशीर रित्या योग्य वाटत नाही. याची खात्री झाल्यानंतर आपण तो पुढे कार्यवाहीसाठी निश्चितच पाठवणार नाही. याबद्दल मला आता आपल्याबद्दलची खात्री मी जे येथे व्यक्त करते आहे. ६६ नंबरच्या विषयाला भारतीय जनता पार्टीचा विरोध नोंदवुन घ्यावा ही विनंती आहे.
**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांच्या सुचना लक्षात घेवुन प्रशासनाने त्याबाबत कार्यवाही करावी.
**श्री.कैलास सोनवणे :-** डायरेक्ट ७७ घ्या.
**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. ६७ आणि ६८ दोघ विकासकामांचे असल्याकारणाने तेही मान्य करण्यात यावे.
**श्री.कैलास सोनवणे :-** डायरेक्ट ७७
**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, हो फक्त विषय क्र. ६९ जो आहे ना.जो मुलभुत सुखसुविधांसाठी २० कोटी जे आहे ना.ते वैशिष्टपुर्ण योजनेमध्ये अनुदान मागण्यात याव.
**श्रीकैलास सोनवणे :-** ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिकेस मा.कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.नगरो-२०१८/प्र.क्र.४३२/नवि-३३ नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि.१६/०८/२०१८ अन्वये महानगरपालिकेस शासना मार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत अंदाजे रक्कम रु.१०० कोटी किमतीच्या प्रस्तावास शासनाकडुन तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार कामे निवड व निश्चिती करीता महासभेकडेस मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. त्यानुसार महासभा ठराव क्रं.७२ दि.१९/०१/२०१९ अन्वये एकुण ०१ ते १५९ कामांना मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार उक्त कामांना शहर अभियंता यांनी तांत्रीक मान्यता प्रदान केलेली होती. त्याअनुषंगाने पत्र क्रं. जशमनपा/साबा/ जा.क्र./२५२२/२०१९ दि.०४/०२/२०१९ अन्वये रक्कम रु.१०० कोटी मात्रचा प्रस्ताव संचालक नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई यांचे कडेस सादर करण्यात आला.

तथापी सदर प्रस्तावास सार्व.बांधकाम विभाग व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील तांत्रीक मान्यता घेवून फेर सादर करण्या संदर्भात उप संचालक नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई यांचे कडील पत्र क्रं.नपप्रसं/नगरोत्थान/जळगांव मनपा/प्र.क्रं.३२६/२०१९/का-०७/५०६ दि.११/०२/२०१९ अन्वये सुचित केलेले होते.

त्यानुसार कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग यांचे कडेस ९५ कामांचे प्राकलनांना तांत्रिक मंजुरी मिळणे करीता प्रस्ताव पत्र क्रं.जशमनपा/साबा/मनपा/११२० दि.२१/०२/२०१९ रोजी सादर करण्यात आला. त्याकरीता मनपाने तांत्रिक मंजुरी फी म्हणुन रक्कम रु.१८८८४७०/- मात्र दि.२२/०७/२०१९ रोजी भरणा केलेला होता. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता साबा विभाग यांनी पत्र साबाविज/प्रशा-२/१६५२ दि.२६/०२/२०१९ अन्वये ८८ कामांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता प्रदान केली तसेच पत्र क्र.साबामंज/प्रशा-१/१४७९, १४८६, १४८७, १४८८, १४८९ दि.१८/०३/२०१९ अन्वये ५ कामांना असे एकुण ९३ कामांना तांत्रीक मंजुरी प्रदान केली.

तसेच महाराष्ट्र जिवन प्राधीकरण जळगांव यांनी पत्र क्र.चिशा/तामा/४८/१३७६ दि.०३/०५/२०१९, १३९२ दि.०८/०५/२०१९, १३९३ दि.०८/०५/२०१९, १४०२ दि.१०/०५/२०१९ असे एकुण ५७ कामांना तांत्रिक मान्यता प्रदान केली. अशा प्रकारे त्रृटींची पुर्तता करुन एकुण १५० कामांचा सुधारीत प्रस्ताव रक्कम रु.४९.५४ कोटी मात्रचा मा.संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचे कडेस पत्र क्र.जशमना/साबा/२०९ दि.१५/०५/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यते करीता सादर केला त्यापैकी शासन निर्णय नगरो-२०१९/प्र.क्र.२२२/नवि-३३ मंत्रालय मुंबई दि.०१/०८/२०१९ अन्वये रक्कम रु.४१.९५ मात्रच्या १२८ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली सदर शासन निर्णया नुसार कार्यकारी अभियंता साबा विभाग जळगांव यांचे कडेस दि.२९/०८/२०१९ पूर्वीच सदर कामांचे प्रांकलने पुढील कार्यवाही करणे करीता वर्ग करण्यात आले. त्यानुसार कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग जळगांव यांनी निविदा प्रक्रिया राबवून त्याअनुषंगाने रक्कम रु.४१.५० कोटीच्या विकास कामांकरीता दि.३१ डिसेंबर २०२० रोजी मक्तेदारास कार्यादेश निर्गमित केले परंतू शासन नगरविकास विभाग यांनी या कार्यादेशास दि.२७ जानेवारी २०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणा बाबत सर्व संबंधीतांची बैठक स्वतंत्रपणे आयोजीत करण्यात येणार आहे तो पर्यंत सदर कार्यादेशात पुढील आदेशा पर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. अशा स्वरुपाचे जळगांव मनपास पत्राव्दारे कळविलेले आहे.

उर्वरीत रक्कम रु.३९.०७ कोटी मात्रची कामे महासभा ठराव क्र.१६४ दि.०६/०६/२०१९ अन्वये रद्द करुन नव्याने रक्कम रु.३७.६७ कोटी मात्रचे ४४ कामांना मान्यता देण्यात आली. मा.अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम विभाग जळगांव यांचे कडेस १४ प्राकलनाना (रक्कम रु.२७.२० कोटी) तांत्रिक मंजुरी मिळणेकरीता पत्र क्र.जमनपा/३८२ दि.२५/०७/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. कार्यकारी अभियंता साबा विभाग जळगांव यांनी पत्र क्र.साबाविज/प्रशा-२/५४७० दि.०६/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.९.६६ कोटी मात्रच्या २१ कामांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता दिलेली होती. तदनंतर सदरचा दुसरा प्रस्ताव मा.संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचे कडेस पत्र क्र.जशमनपा/साबा/६२१ दि.१३/०९/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यते करीता सादर करणेत आलेला आहे. तथापी या उर्वरीत प्रस्तावांना अदयाप प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही.

या सर्व कार्यवाही नंतर सहा.संचालक नपा प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचे पत्र क्रं.नपप्रस/नगरोत्थान योजना/प्र.क्रं.५८९/कक्ष-०७/२०२०/१५१ दि.१२ जानेवारी २०२१ अन्वये नविन दर सुचिनुसार दाखल सर्व प्रस्ताव सुधारीत करुन त्यास सुधारीत तांत्रिक मान्यता घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदयस्थितीत जळगांव शहर मनपा हद्दीतील अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना व मल:निस्सारण योजना अंतर्गत सुरु असलेली कामे पुर्णत्वास येत असल्याने व या कामांमुळे जळगांव शहरातील सर्व रस्त्यांची अवस्था बिकट झाल्याने संपुर्ण शहरातील जनमानसात प्रचंड रोष निर्माण झाल्याने रस्त्यांचे डांबरीकरण त्वरीत करण्याचे कामास प्राधान्य देणे आवश्यक आहे. यास्तव यापुर्वीचे शासनाने तत्वत: मान्यता दिलेल्या १०० कोटी निधीतुन मा.महासभा ठराव क्र.७२ दि.१९/०१/२०१९, मा.महासभा ठराव क्रं.१६४ दि.०६/०६/२०१९ ठरावाव्दारे कामे

प्रस्तावीत केलेली होती. तसेच महासभा ठराव क्र.३९६ दि.२६/०२/२०२१ अन्वये मनपा स्वनिधीतुन रस्त्याची विकास कामे करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापी जळगांव मनपाची आजची आर्थीक परिस्थीती पहाता सदर विकास कामे स्वनिधीतुन प्रत्यक्षात करणे शक्य होणार नाही. यास्तव उक्त तिन्ही ठराव व तिन्ही ठरावाव्दारे मंजुर केलेली विकास कामे रद्द करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व खालील परिशिष्टानुसार शहरातील रस्ते डांबरीकरण करण्याची कामे प्रस्तावीत करण्यात येत असुन या कामांसाठी शासना कडे रु.१०० कोटी निधीतुन करण्याबाबत प्रशासनाने प्रस्ताव पाठवावा. तसेच यापुर्वीचा अनुभव लक्षात घेता सदरची सर्व विकास कामे पुर्ण करण्याची कार्यवाही मनपा स्तरावरच करणे योग्य होणार असल्याने या कामांसाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जळगांव महानगरपालिका अशी मान्यता देण्याची विनंती शासन नगरविकास विभागास करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

" परिशिष्ट "

| अ.क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.०१ कानळदा रोड लाकुड पेठ ते क्षेत्रीय मराठा कार्यालय ते काळे नगर श्री.राहुल तिवारी यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२८,४६,१३८/- |
| २. | प्रभाग क्र.०१ दुध फेडरेशन मुख्य रस्त्यापासुन ते सिटी कॉलनी रस्त्यापर्यंतचा डि.पी. रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,१९,२५,१८५/- |
| ३. | प्रभाग क्र.०१ मधील खडके चाळ ते दुध फेडरेशन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,८०,५७,१२३/- |
| ४. | प्रभाग क्र.०१ मधील मनपा शाळा क्रं.०१ ते खडके चाळ (दुध फेडरेशन रोड)पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,१३,०६,००५/- |
| ५. | प्रभाग क्र.०१ मधील बौध्दविहार ते कानळदारोड (२४ मी. रिंगरोड पर्यंत) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,४८,८२,६१०/- |
| ६. | प्रभाग क्र.०१ व ०२ मधील महाविर जिन ते रिंगरोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,१७,६५,८८२/- |
| ७. | प्रभाग क्र.०२ स्वामी समर्थ केंद्र ते असोदा रोड व सुळे बाईची चक्कीची गल्ली एल पट्टा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३१,८७,६७४/- |
| ८. | प्रभाग क्र.०२ असोदा रोड घरकुल ते प्रशांत चौक ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४५,०३,२२२/- |
| ९. | प्रभाग क्र.०२ डि.बी.जैन दवाखाना ते क्रांती चौक ते शिवाजी नगर हुडको कोपऱ्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४५,७०,०००/- |
| १०. | प्रभाग क्र.०२ अनिल प्रोव्हीजन ते सोपान कोळी यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२५,००,०००/- |
| ११. | प्रभाग क्र.०२ मधरी हरीओम नगर मधिल कृष्णा सपकाळे ते वॉशिंग सेंन्टर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५,००,०००/- |
| १२. | प्रभाग क्र.०२ शिवाजी नगर क्रांती चौक ते दाळफळ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२१,००,०००/- |
| १३. | प्रभाग क्र.०२ मनपा डि.बी.जैन दवाखाना ते ममुराबाद रोड रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८५,००,०००/- |
| १४. | प्रभाग क्र.०२ मधिल कान्हाकाई रोड वेअर हॉऊस ते खतकारखाना रस्ता पर्यंत | रु.१,८२,२४,९२४/- |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता डांबरीकरण करणे. | |
| १५. | प्रभाग क्र.०२ हुडको रोड व शिरीन अपार्टमेंन्ट समोरील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३४,९७,२८०/- |
| १६. | प्रभाग क्र.०२ हमालवाडा व भुरे मामलेदार बगीचा परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५१,१२,२७४/- |
| १७. | प्रभाग क्र.०२ शिवाजी नगर श्री.सांगोरे यांच्या घराजवळील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३१,३३,१८७/- |
| १८. | प्रभाग क्र.०१ व ०२ मधिल काळेनगर विहीर ते आव्हाणे रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६८,८३,०५८/- |
| १९. | प्रभाग क्र.०३ कालींका माता मंदिर ते जुना खेडी रस्त्यापर्यंत २४ मी.रुंद रस्ता डांबरीकरण करणे व दुभाजक बांधणे. | रु.५८,०७,५४३/- |
| २०. | प्रभाग क्र.०४ पुष्पलता बेंडाळे चौक पांझरापोळ चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५,१७,९४०/- |
| २१ | प्रभाग क्र.०४, ०५ घाणेकर चौक ते बेंडाळे चौक ते पांडे डेअरी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,२०,००,०००/- |
| २२. | प्रभाग क्र.०६, १६ पांडे डेअरी ते इच्छादेवी चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,००,००,०००/- |
| २३. | प्रभाग क्र.०४ व ०५ मधील शास्त्री टॉवर ते दधिची चौक (उत्तर बाजु) ते पांझरापोळ पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| २४. | प्रभाग क्र.०५ नवीपेठ पत्री हनुमान मंदीर ते ममुराबाद रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३१,६२,३७५/- |
| २५. | प्रभाग क्र.०५ गोविंदा रिक्षा स्टॉप ते पिंप्राळा रेल्वेगेट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६५,००,०००/- |
| २६. | प्रभाग क्र.०५ व ०६ स्वातंत्र चौक ते नेरी नाका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,८०,००,०००/- |
| २७. | प्रभाग क्र.०६ सुपारी कारखाना ते रुक्ष्मा टेंट हाऊस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५०,००,०००/- |
| २८. | प्रभाग क्र.०६ बाबा हरदासराम मंगल कार्यालय ते आंबेडकर मार्केट पर्यंतचा रस्ता व बी.एस.एन.एल क्वार्टर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९०,००,०००/- |
| २९. | प्रभाग क्र.०६ मंजुषा हौ.सोसायटी मधील श्री.डांबरी आप्पा यांचे घरापासुन रामदेव मंदिरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५,००,०००/- |
| ३०. | प्रभाग क्र.०७ शासकीय औदयागिक प्रशिक्षन संस्थेच्या पुर्वेकडील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३५,००,०००/- |
| ३१. | प्रभाग क्र.०७ आशाबाबा मंदीर ते पिंप्राळा गट नं.८७ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५०,००,०००/- |
| ३२. | प्रभाग क्र.०७ वर्धमान हाईट ते पिंप्राळा गट नं.८० पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५०,००,०००/- |
| ३३. | प्रभाग क्र.०७ युनिटी चेंबर ते प्रभुदेसाई कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३४. | प्रभाग क्र.०७ मारोती पार्क ते खंडेराव नगर ते पुला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,००,००,०००/- |
| ३५. | प्रभाग क्र.०७ हरिश स्विट मार्ट ते आय.एम.आर.कॉलेज रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४०,००,०००/- |
| ३६. | प्रभाग क्र.०७ पिंप्राळा रेल्वे गेट ते बजरंग बोगदयापर्यंतचे रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| ३७. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गणेश कॉलनी चौक ते कोर्ट चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.२,२०,००,०००/- |
| ३८. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत शिवकॉलनी गट नं.५३ पासुन सुरु होणारे प्रमुख रस्ते डांबरीकरण करणे. | रु.९१,६२,३३०/- |
| ३९. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत शिवकॉलनी गट नं.६० मधील प्रमुख रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७०,००,०००/- |
| ४०. | प्रभाग क्र.०८ गुड्डूराजा नगर ते स.नं.२९० पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८६,७२,०६०/- |
| ४१. | प्रभाग क्र.०८ निमखेडी रोड ते नॅशनल हायवे ०६ गट नं.११८/५,११८/६ मधून व्दारका नगर रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,१९,२४,९१५/- |
| ४२. | प्रभाग क्र.०८ पिंप्राळा रोड गणपती मंदीर (रेल्वे गेट) ते भोईटे नगर ते गोरी हाईटस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५६,९७,४१५/- |
| ४३. | प्रभाग क्र.०८ निमखेडी शिवार पोलिस स्टेशन समोरील आव्हाणे रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७७,०२,८२८/- |
| ४४. | प्रभाग क्र.०८ निमखेडी जुना पाईप फॅक्टरीपासुन ते नविन हायवे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४३,४५,८६४/- |
| ४५. | प्रभाग क्र.०८ सुरत रेल्वे गेट ते देवराम नगर (शेतकी शाळा) पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,४१,७६,०००/- |
| ४६. | प्रभाग क्र.०८ देवराम नगर ते चंदुअण्णा नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,३१,३०,०००/- |
| ४७. | प्रभाग क्र.०८ गट नं.२५/२ कोल्हे नगर, गिरणाई कॉलनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४१,६९,२४२/- |
| ४८. | प्रभाग क्र.०८ गट नं.२६ चंदुअण्णा नगर मधिल रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२५,१०,११४/- |
| ४९. | प्रभाग क्र.०८ गट नं.११५/१ साई नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६१,००,०००/- |
| ५०. | प्रभाग क्र.०८ श्रीकृष्ण कॉलनी, जुनी पोलीस लाईन मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२५,२७,०००/- |
| ५१. | प्रभाग क्र.०८ चंदुअण्णा नगर चौक ते पवार पार्क पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,५२,००,०००/- |
| ५२. | प्रभाग क्र.०८,०९ बजरंग बोगदा ते सुरत रेल्वे गेट परिसरातील रस्ते (एस.एम.आय.टी.रस्ता) पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६६,९०,३६७/- |
| ५३. | प्रभाग क्र.०८ व ०९ मधील स्विकृती ड्रीम होम लगतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४२,४७,९८०/- |
| ५४. | प्रभाग क्र.०९ बारी कॉम्प्लेक्स परमार्थ निकेतन आर.एल.कॉलनी ते आव्हाणे रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७०,६३,२७३/- |

| | | |
|---|---|---|
| ५५. | प्रभाग क्र.०९ पिंप्राळा सोमानी मार्केट ते नॅशनल हायवे पर्यंतचा (बाजार रोड) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५१,४७,८५१/- |
| ५६. | प्रभाग क्र.०९ गट नं.२९,३०,३५,२५ व २३/२२/१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६१,५०,०००/- |
| ५७. | प्रभाग क्र.०९ पिंप्राळा ग.नं.२८ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२०,१५,९४८/- |
| ५८. | प्रभाग क्र.१० सोमानी मार्केट ते पिंप्राळा दर्गा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३७,९४,८५०/- |
| ५९. | प्रभाग क्र.८ व ९ प्रेम नगर मधील रायसोनी शाळा ते सुबोध क्लासेस कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५६,४०,३६८/- |
| ६०. | प्रभाग क्र.११ कोल्हे नगर १०० फुट रोड ते गिरणा पंपींग रोड पर्यंत १०० फुटी रिंगरोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,३१,९५,५००/- |
| ६१. | प्रभाग क्र.११ वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७७,५२,०००/- |
| ६२. | प्रभाग क्र.११ दत्त डिगंबर हौ.सोसायटी ते गिरणा पंपिंग पर्यंतचा ३० मीटर रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३५,८५,३००/- |
| ६३. | प्रभाग क्र.११ हरीविठ्ठल नगर मध्ये मारोती मदीर ते सार्व.संडाशी पर्यंत WBM व डांबरी रस्ता करणे. | रु.३८,९६,५९५/- |
| ६४. | प्रभाग क्र.११ मुंदडा नगर ग.नं.१०१/३ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे. | रु.२८,६४,८३१/- |
| ६५. | प्रभाग क्र.११ पिंप्राळा ग.नं.७६,७८,७९ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे (कोल्हे नगर परिसरात) | रु.४५,०१,०२८/- |
| ६६. | प्रभाग क्र.११ पिंप्राळा ग.नं.१०२,१०४,१०७ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे. | रु.३९,०३,२३२/- |
| ६७. | प्रभाग क्र.११ पिंप्राळा ग.नं.१४९ मध्ये रस्ते तयार करणे. | रु.७४,८४,३५१/- |
| ६८. | प्रभाग क्र.११ पिंप्राळा ग.नं.१५१/१/१,१५२/२+३ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे. | रु.५१,४१,०५०/- |
| ६९. | प्रभाग क्र.११, १२ एकलव्य जिम (एम.जे.कॉलेज) ते शिव कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७७,५२,०००/- |
| ७०. | प्रभाग क्र.१२ अल्पबचत निवासी क्वार्टर ते जी.एस.टी.भवन ते हायवे सर्व्हीस रोड डांबरीकरण करणे. | रु.२९,७२,६३३/- |
| ७१. | प्रभाग क्र.१२ आकाशवाणी चौक ते काव्यरतनावली चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८७,४१,८१७/- |
| ७२. | प्रभाग क्र.१२ अग्रवाल हॉस्पिटल ते ऑफिसर क्लब पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५६,८६,८१६/- |
| ७३. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत गिरणाटाकी ते गर्व्हमेंट पॉलिटेक्नीक कॉलेज कंपाऊंड वॉल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४३,९१,५१६/- |
| ७४. | प्रभाग क्र.१२ शानबाग हॉल ते रामदास कॉलनी ओपनस्पेस पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | रु.७७,००,८२६/- |
| ७५. | प्रभाग क्र.१२ चर्च ते श्रध्दा कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४५,९५,०१२/- |
| ७६. | प्रभाग क्र.१२ मेहरुण स.नं.४८३ प्लॉट नं.१ ते स्नेहल सोसायटी पिंप्राळा गट नं.१४९/३ प्लॉट नं.१ पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.२७,८६,७२३/- |
| ७७. | प्रभाग क्र.१२ व १३ मधील काव्यरत्नावली चौक ते महाबळ चौक रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९३,६२,८३९/- |

| | | |
|---|---|---|
| ७८. | प्रभाग क्र.१३ महाबळ चौक ते जिजाऊ चौक झाकीर हुसेन कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९६,१३,६२०/- |
| ७९. | प्रभाग क्र.१३ रायसोनी नगर मधील मोहाडी रोड ते मेहरुण स.नं.४६४ पर्यंतचा मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३९,७४,२९६/- |
| ८०. | प्रभाग क्र.१३ संभाजीनगर चौक ते मोहाडी रोड १२ मी.डी.पी.रोड डांबरीकरण करणे. | रु.४५,२५,८११/- |
| ८१. | प्रभाग क्र.१३ देवेंद्रनगर दर्गा ते मोहाडी रोड १२ मी.डी.पी.रोड डांबरीकरण करणे. | रु.८२,४३,०६९/- |
| ८२. | प्रभाग क्र.१३ मधील रायसोनीनगर जकात नाका ते मनपा हद्दी पर्यंतचा १८ मी.डि.पी.रोड डांबरीकरण करणे. | रु.३८,४८,५०४/- |
| ८३. | प्रभाग क्र.१३ मोहननगर भाग मेहरुण स.नं.४४८ मधील मेन रोड डांबरीकरण करणे. | रु.६२,११,६१८/- |
| ८४. | प्रभाग क्र.१३ नित्यानंदनगर संभाजीनगर परिसर मेहरुण मधील मेन रोड डांबरीकरण करणे. | रु.४३,१८,२१९/- |
| ८५. | प्रभाग क्र.१३ नवजिवन सुपर शॉप पासुन आनंद नगर, रविंद्र नगर मधुन मोहाडी रोड पर्यंतचा मुख्य रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३१,५९,३४०/- |
| ८६. | प्रभाग क्र.१३ व १४ डि.मार्ट ते रायसोनी नगर ते मोहाडी रोड रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,४९,३१,५४६/- |
| ८७. | प्रभाग क्र.१४ गणपती मंदीर ते हायवे पर्यंतचा गणपती नगर मधील मुख्य रस्ता रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३०,३५,८८०/- |
| ८८. | प्रभाग क्र.१४ अशोक किराणा ते जकात सोसायटी पर्यंतचा रोड डांबरीकरण करणे. | रु.५८,३२,२६३/- |
| ८९. | प्रभाग क्र.१४ मेहरुण पाणी पुरवठा कार्यालय ते स्वामी समर्थ चौक ते तुळजामाता नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४९,३४,९९२/- |
| ९० | प्रभाग क्र.१४ मेहरुण अशोक किराना चौक ते स.नं.२५० (दिनेश किराना) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५३,८४,२६७/- |
| ९१. | प्रभाग क्र.१४ काव्यरत्नावली चौक ते डी मार्ट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९१,२९,०९७/- |
| ९२. | प्रभाग क्र.१४ गणपती नगर रोटरी हॉल परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.९३,३८,५७९/- |
| ९३. | प्रभाग क्र.१६ नानीबाई हॉस्पिटल ते हेमु कलानी टाकी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४६,१७,०६८/- |
| ९४. | प्रभाग क्र.१६ देविदास कॉलनी ते टी.एम.नगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४७,४३,५६३/- |
| ९५. | प्रभाग क्र.१६ पंचमुखी हनुमान मंदीर ते डॉ.चिंचोले यांचे घरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३२,४६,७०५/- |
| ९६. | प्रभाग क्र.१६ कासम वाडी ते हायवे (जुना मेहरुण रोड) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९०,००,०००/- |
| ९७. | प्रभाग क्र.१६ सालार नगर सर्व्हे नं.१४ मधील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६२,००,०००/- |
| ९८. | प्रभाग क्र.१७ एस.टी. वर्कशॉप ते काशीबाई उखाजी कोल्हे विदयालय पर्यंत | रु.७५,८९,७००/- |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता डांबरीकरण करणे. | |
| ९९. | प्रभाग क्र.१७ नेरी नाका ते कब्रस्तान पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२२,७६,९१०/- |
| १००. | प्रभाग क्र.१७ पांझरापोळ चौक ते राजाराम मंगल कार्यालय पर्यंत डांबरी रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३५,००,०००/- |
| १०१. | प्रभाग क्र.१७ आयोध्या नगर स.क्र.१४१ बगिचा ते जुनी जीन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३७,००,०००/- |
| १०२. | प्रभाग क्र.१७ काशीनाथ हॉटेल गृहकुल कॉलनी ते पंढरपुर नगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे (म्हाडा कॉलनी ते पंढरपुर नगर) | रु.१,०२,५०,०००/- |
| १०३. | प्रभाग क्र.१७ मध्ये हॉटेल संजय ते लिलापार्क पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१९,५४,८००/- |
| १०४. | प्रभाग क्र.१८ मेहरुण हॉटेल काशिनाथ ते अशोक किराणा चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.६७,३२,६०२/- |
| १०५. | प्रभाग क्र.१८ सारा हॉस्पिटल (घुगे पाटील कोरोसिन) चौक ते संतोषी माता गणेशपुरी ते हायवे रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,०५,००,०००/- |
| १०६. | प्रभाग क्र.१८ व १९ औरंगाबाद रोड हॉटेल कस्तुरी ते मेहरुण बुरुजा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,०६,२९,१०८/- |
| १०७. | प्रभाग क्र.१४ व १५ मधील इच्छादेवी चौक ते शिरसोली रोड कब्रस्थान पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,४९,११,३४७/- |
| १०८. | काव्यरत्नावली चौक ते वाघनगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,४२,०२,२०२/- |
| १०९. | जिल्हा परिषद चौक ते चित्रा चौक ते पुष्पलता बेंडाळे चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,३०,००,०००/- |
| ११०. | पुष्पलता बेंडाळे चौक ते स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,६३,००,०००/- |
| १११. | शास्त्री टावर ते कोर्ट चौक ते स्टेडियम चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,८३,००,०००/- |
| ११२. | स्टेडियम चौक ते आकाशवाणी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,१७,००,०००/- |
| ११३. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा रेल्वे गेट ते गोकुळ स्वीट मार्ट पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रु.२,५०,००,०००/- |
| ११४. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गोकुळ स्वीट मार्ट ते हरिष स्वीट मार्ट पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रु.२,५०,००,०००/- |
| ११५. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा हरीष स्वीट मार्ट ते खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उदयान पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रु.२,८०,००,०००/- |
| ११६. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत पिंप्राळा खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उदयान ते दंगलग्रस्त कॉलनी पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रु.२,२०,००,०००/- |
| ११७. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत पिंप्राळा दंगलग्रस्त कॉलनी ते अमर शहीद संत कंवरराम मंडळा पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रु.१,५०,००,०००/- |
| ११८. | पिंप्राळा रेल्वे गेट ते सोमाणी मार्केट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,९३,००,०००/- |
| | एकुण रस्त्यांचे अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.:- | रु.१००,००,००,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- २७ प्रतिकुल मते :- १५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६७)** दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.९ मधिल १ ते ३ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ४० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.९ मधिल खालील नमूद १ ते ३ विविध कामे करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ४० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.९ मध्ये गट नं.२७ निवृत्ती नगर येथे चेनलींग फेंन्सींग व खेळणी बसविणे. | रु.१० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.९ मध्ये दत्त मंदीर, मुक्ताई नगर चेनलींग फेंन्सींग व खेळणी बसविणे. | रु.१० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.९ मध्ये दत्त मंदीर जवळील रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| | एकूण रक्कम :- | रु.४० लक्ष |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६८)** जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून १) प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.४१८ उस्मानिया पार्क परिसरातील रस्ते डांबरी करण करणे रक्कम रु.१,४७,०६,२५६/- व (२) प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.५०९/५१० अमन पार्क व बारसे कॉलनी मधील रस्ते डांबरी करण करणे कामी रक्कम रु.३३,१५,५९३/- असे एकूण रक्कम रु.१,८०,२१,८४९/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून १) प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.४१८ उस्मानिया पार्क परिसरातील रस्ते डांबरी करण करणे रक्कम रु.१,४७,०६,२५६/- व (२) प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.५०९/५१० अमन पार्क व बारसे कॉलनी मधील रस्ते डांबरी करण करणे कामी रक्कम रु.३३,१५,५९३/- असे एकूण रक्कम रु.१,८०,२१,८४९/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६९)** जळगांव मनपास राज्य शासनाकडून मुलभूत सुखसुविधांसाठी रुपये २० कोटी मात्र अनुदान उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो फक्त विषय क्रं. ६९ जो आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ तो मान्य आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मुलभुत सुखसोई सुविधांसाठीजो आहे ना ते वैशिष्टय पुर्ण योजनेमध्ये अनुदान मागण्यात याव.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे ना ते करेक्शन करून डायरेक्ट ७७ घ्या आता

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ ७० घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढतच असून शहराच्या वाढीव परिसरात चहूबाजुस नागरीक नव्याने घरांचे बांधकाम करुन रहिवास करीत आहेत. मात्र बऱ्याच कालावधीपासून जळगांव शहरात तसेच वाढीव भागात विकास कामे उदा. रस्ते, गटारी, पथदिवे यासम मुलभूत सोईसुविधांची कामे प्रलंबित आहेत. तसेच शासनाने मंजुर केलेल्या अमृत पाणी पुरवठा योजनेत पाणी पुरवठा जलवाहिन्या व भुयारी गटारींसाठी शहरात खेदकाम झाल्याने शहरातील रस्ते देखिल अत्यंत खराब झालेले असून वाढीव भागात किमान खडीचे रस्ते देखिल महानगरपालिकेच्या कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाहीत. परिणामी उपरोक्त मुलभूत सोईसुविधां विषयी नागरीकांकडून वारंवार मोठया प्रमाणात बाबत मागणी होत आहे.

राज्य शासनाकडून दरवर्षी मुलभूत सोईसुविधा पुरविणे कामी राज्यातील महानगरपालिका यांना विशेष अनुदान देण्यात येत असते, करीता जळगांव शहराचा झपाटयाने वाढता विस्तार लक्षात घेता जळगांव शहर महानगरपालिकेस सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता मुलभूत सोईसुविधा पुरविणे कामी वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत

रक्कम रुपये २० कोटी मात्र अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडेस सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७०)** जळगांव मनपा हद्दीतील मेहरुण व पिंप्राळा स्मशान भुमी मध्ये जिल्हा वार्षिक नियोजन मंडळाच्या निधी अंतर्गत विदयुत दाहीनी बसविणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि विषय क्रं. ७० जो आहे. त्याच्यामध्ये आपण विद्युत दाहीनी बसविणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे. तर विद्युत दाहीनीच्या ऐवजी गॅस दाहीनी करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण व पिंप्राळा हे दोन बहुलोकसंख्येचे उपनगरे असून सदर दोन्ही परिसरांचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असून रहिवासी क्षेत्र विकसित होत आहेत. परिणामी मेहरुण व पिंप्राळा येथिल स्मशान भुमीमध्ये गरजेनुसार गॅस दाहिन्यांची आवश्यकता भासत आहे.

शहरवासियांच्या सोईसाठी जिल्हा वार्षिक नियोजन मंडळा अंतर्गत मेहरुण व पिंप्राळा स्मशान भुमीमध्ये महासभेत झालेल्या सूचनेनूसार प्रत्येकी १-१ विदयुत दाहिनी ऐवजी प्रत्येकी १-१ गॅस दाहिनी बसविणे कामी निधी उपलब्ध करुन मिळणेसाठी मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांना विनंती करणेचा प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७१)** शहरातील व उपनगरातील एकमेव पर्यटन स्थळ मेहरुण तलाव विकसित करणे कामी रक्कम रुपये ०५ कोटी मात्र जिल्हा नियोजन समिती अंतर्गत निधी उपलब्ध करुन घेणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील मेहरुण तलाव व लगतचे शिवाजी उदयान हा ब्रिटीशकालिन असून तेव्हा शहरास पाणी पुरवठा मेहरुण तलावा व्दारे होत होता, हा शहरातील एक नैसर्गिक तलाव असून शहर तथा उपनगरातील नागरीकांसाठीचे एकमेव पर्यटन स्थळ दैनंदिन पर्यटक नागरीक येथे भेट देत असतात. यापुर्वी मेहरुण तलावास स्टोन पिंचींग करुन गणेशघाट विकसित करणे अशी विकास कामे झालेली आहेत, मात्र सदर ठिकाणाचे सुशोभिकरण करुन सर्वोत्तम पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणे संदर्भात नागरीकांकडून बऱ्याचश्या अपेक्षा आहेत.

शहरवासियांच्या अपेक्षांचा तसेच ऐतिहासिक स्थळास सुशोभिकरण करुन भावीपिढीस एक उत्तम असे पर्यटन स्थळ विकसित करणेसाठी मेहरुण तलाव विकासास जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रुपये ०५ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन मिळणेसाठी मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांना विनंती करणेचा प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७२)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत दलितेत्तर / नगरोत्थान योजना / उपलब्ध निधी अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,३९,३३,६७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.चंद्रशेखर शिवाजी पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत दलितेत्तर / नगरोत्थान योजना / उपलब्ध निधी अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,३९,३३,६७०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ साई मंदिर ते विठ्ठल मंदिर टिळक नगर अशोक पाटील यांच्या घराकडून ते टिळक नगर प्रवेश पर्यंत मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५६,०६,११२/- |
| २ | दादावाडी जैन मंदिर वरद बंगला श्रीराम मंदिर ते खोटे नगर पाण्याची टाकी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४७,३५,३३९/- |
| ३ | सायली मेडिकल दादु अपार्टमेंट आनंद कॉलनी ओपन स्पेस ते श्रीराम मंदिरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३५,९२,२१९/- |
| | एकूण रक्कम :- | रु.१,३९,३३,६७०/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७३)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत दलितेत्तर / नगरोत्थान योजना अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४७,८१,१६९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, श्रीमती लताबाई रणजीत भोईट यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत दलितेत्तर / नगरोत्थान योजना अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४७,८१,१६९/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ सर्वे नं.२९१ वाघुळदे नगर, बी.जे.नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२०,८२,७२८/- |
| २ | प्रभाग क्र.८ सर्वे नं.२९४, २९५ भोईटे नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२६,९८,४४१/- |
| | एकूण रक्कम :- | रु.४७,८१,१६९/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७४)** नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र.११ मधिल विविध १ ते ४ कामे करणे कामी अंदाजित रक्कम रुपये ६३.७५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.११ मधिल नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी खालील कामे करणे गरजेचे आहे तसेच याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्याने नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र.११ मधिल विविध १ ते ४ कामे करणे कामी अंदाजित रक्कम रुपये ६३.५५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ हरिविठ्ठल नगरमध्ये मारुती मंदीर ते सार्वजनिक शौचालय पर्यंत आ.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.०८.५० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा, हरिविठ्ठल नगर साईबाबा मंदीर ते रेल्वे पुला पर्यंत आ.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.२६.२९ लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.११ हरिविठ्ठल नगर मधील बिस्मील्ला चौक परिसरात आ.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.१४.१८ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१३४ मध्ये आ.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.१४.५८ लक्ष |
| | एकूण रक्कम :- | रु.६३.५५ लक्ष |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४०** **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७५)** दलितेत्तर निधी अंतर्गत प्र.क्र.१५ ड मधील मेहरुण गावठाण मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.०२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य.
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई , महापौरताई मला बोलायच आहे.
**मा.महापौर :-** बोला प्रशांतभाऊ
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई , ७५ नंबरच्या विषयामध्ये हॅलो ७५ नंबरच्या विषयामध्ये २ लक्ष च्या ठिकाणी २ कोटी रूपये अशी दुरूस्ती करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चुकीने २ लक्ष लिहीली गेलेली आहे ती २ लक्ष च्या ऐवजी २ कोटी आहे.
**मा.महापौर :-** ठिक आहे सुचनांच पालन कराव. सुचना मान्य पुढील विषय घेण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** ७७.
**श्री.प्रशांत नाईक :-** ७६ च काय करायच अप्पा

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.१५ मधिल नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने दलितेत्तर निधी अंतर्गत प्र.क्र.१५ ड मधील मेहरुण गावठाण मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे आवश्यक आहे त्याकामी येणारा अंदाजित रक्कम रु.०२ लक्ष मात्र प्रस्तावात नमूद केलेले आहे परंतू महासभेत झालेल्या सूचनेनूसार व मा.महापौर यांचे निर्देशानूसार तसेच सन्मा.सदस्य यांचे मागणी प्रमाणे चूकीने नमूद केलेली रक्कम रु.०२ लक्ष ऐवजी उपरोक्त कामास रक्कम रु.०२ कोटी मात्रचा खर्च येणार असल्याने सदर खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४०** **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७६)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत उर्वरीत निधीतून पिंप्राळा गावठाण येथिल रथ मार्गाचे रस्त्याचे काम करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.२१.३२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** ७७ घ्या.
**नगरसचिव :-** विषय क्र.७१ ते ७६ मंजुर आहेत ना.
**श्री.कैलास सोनवणे :-** हो मंजुर मंजुर.
**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ, विषय क्र.७१ ते ७६ मंजुर आहे ना.
**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मंजुर.
**मा.उपमहापौर :-** विषय क्र.७१ ते ७६ मंजुर आहे माझे अनुमोदन आहे. त्याच्यापैकी सन्मा.सदस्य प्रशांतभाऊंनी जी सुचना मांडली की, ते चुकुन २ लक्ष झालेले आहे. त्याच्या ठिकाणी २ कोटी करून सदरचा प्रशासनास अशासकीय जो प्रस्ताव आहे त्यास संबंधित प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य, विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा. विषय क्रं. ७७
**श्री.कैलास सोनवणे :-** हो

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा गावठाण येथील रथ मार्गाच्या रस्त्याचे काम बऱ्याच वर्षापासून रखडलेले असल्याने नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत उर्वरीत निधीतून पिंप्राळा गावठाण येथिल रथ

मार्गाचे रस्त्याचे काम करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.२१.३२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७७)** घरकुल घोटाळयातील शिक्षा लागलेल्या ५ नगरसेवकांना अपात्र करणेबाबत सन्मा.सदस्य.श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** याच्या संदर्भात सन्मा.सदस्य श्री. कोळी दत्तात्रय देवराम यांनी विरोध नोंदविलेला आहे पत्राद्वारे विरोध नोंदविलेला आहे.

**सन्मा. सदस्य . श्री.कोळी दत्तात्रय देवराम यांनी विषय क्रं. ७७ साठी दिलेले लेखी पत्र**

जळगांव शहर महानगरपालिकेची महासभा दिनांक. १२/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली असुन सदर महासभे अंतर्गत विषयपत्रिकेवरील विषय क्रं. ७७ ला माझा विरोध आहे तसेच सदर विषय क्रं. ७७ ला माझा विरोध असल्याबाबत बाबतची दप्तरी नोंद घेणेसाठी संबंधितांना आदेश व्हावेत ही विनंती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मा.महापौर महोदया, सदरचा विषय हा न्यायप्रविष्ट आहे आणि त्याच्यावर आपण निर्णय घेऊ शकत नाही. न्यायप्रविष्ट विषयावरती आपल्याला त्याच्यावरती निर्णय घेण्याचा अधिकार नाही.
**श्री.प्रशांत नाईक :-** राजु भाऊ न्यायप्रविष्ट कुठे आहे सांगा मला.
**श्री.राजेंद्र पाटील :-** हा कोर्टामध्ये याचिका दाखल केली आहे ना तुम्ही.
**श्री.अश्विन सोनवणे :-** प्रशांत तुच दाखल केलेली आहे ना याचिका
**श्री.प्रशांत नाईक :-** अश्विन भाऊ, मी त्यांना अपात्र करण्याच्या संदर्भात याचिका दाखल केलेली आहे ना भाऊ. त्यांना सजा लागलेली आहे. अश्विनभाऊ
**श्री.अश्विन सोनवणे :-** महापालिकेला त्यांना अपात्र करण्याचा अधिकार नाही. तुम्ही न्यायालयात दाद मागु शकता ना, न्यायालयात दाद मागा ना.
**श्री.प्रशांत नाईक :-** अश्विनभाऊ
**श्री.अश्विन सोनवणे :-** ऐकुन घे आयुक्त साहेब आताच बोलले की, अशासकीय प्रस्ताव जर असले तर ते कायदेशीर रित्या तपासले जातात आणि जर ते योग्य असतील तरच त्याला मान्यता राहते.
**श्री.प्रशांत नाईक :-** अश्विनभाऊ आमचे पण म्हणणे तेच आहे.
**श्री.अश्विन सोनवणे :-** मग महानगरपालिकेला अपात्र करण्याचा अधिकार नाहीये. प्रोसेसने जाव लागते, तुम्ही न्यायालयात दाद मागा, आणि न्यायालय जो निर्णय देईन .

**श्री.प्रशांत नाईक :-** अश्विनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा:-** अश्विनभाऊ

**श्री.अश्विन सोनवणे :-** ते आम्हाला मान्य आहे. माझी मागणी आहे की, आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. अशी माझ ाी मागणी आहे या विषयावर आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. अशी आमची मागणी आहे. महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी खुलासा करावा या विषयावर.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब, यावर आपण क्लिरीफिकेशन द्या.

**मा.आयुक्त :-** या अगोदरच्या ६६ नंबरच्या विषयामध्ये प्रशासनाची भुमिका मी स्पष्ट केलेली आहे. कोणतेही अशासकीय प्रस्ताव प्रशासनाच्या भुमिकेशिवाय परस्पर महासभेसमोर येत असतील. तर प्रस्तावाची छाननी न करता त्याच्यावर कुठलेही मत प्रदर्शन करणे हे कदापीही योग्य नाही. ठराव झाल्यानंतर मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे जो ठराव आपल्याकडे अशासकीय आधारे झालेला ठराव अशासकीय ठराव प्राप्त होईल. त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यापुर्वी याची पुर्ण सांगोपांग चर्चा करून संपुर्ण विभागामार्फत गरजेप्रमाणे महानगरपालिकेच्या विधी विभागामार्फत त्याची छाननी करून त्याची वैधता तपासण्यात येईल आणि त्याची वैधता तपासणीनंतर जर तो ठराव योग्य वाटत असेल तरच त्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे माझी महासभेला अशी विनंती राहील कायमस्वरुपी कोणतेही अशासकीय प्रस्ताव घेत असतांना अश्या वेळीच्या अगदी तातडीचे अशासकीय प्रस्ताव असतील, तर ते घेणे योग्य राहील,परंतु साधारणपणे कोणतेही प्रस्ताव हे प्रशासनाला देऊन प्रशासनामार्फत जर महासभेसमोर आले, तर अश्या प्रकारचा वाद उत्पन्न होणार नाही. प्रशासनालाही कोणत्याही प्रस्तावावरती आपल मत बनविणे याच्यासाठी काही अवधी देणे हे अत्यंत आवश्यक आहे. कारण काय खुप काही कायदेशीर मुद्दे त्याच्यामध्ये असतात. वेगवेगळया विभागांमार्फत त्याची छाननी करणे गरजेचे असते. गरजेबाबत महानगरपालिकेच्या विधी विभागाकडुन मुख्य विधी सल्लागारकडुन त्याच्यावर मत उपलब्ध करून घ्याव लागते. त्यांना ही असे प्रकारचे कायदेशीर मत देणेसाठी काही अवधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे असे अशासकीय प्रस्ताव घ्यायचे आणि ऑन दि स्पॉट त्याच्यावर मत प्रदर्शन करा म्हणणे हे कदापी योग्य वाटत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे आयुक्त साहेब आपले म्हणणे अत्यंत योग्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** जे काही प्रस्ताव येथे मंजुर होत असतील नियमानुसार त्यांची खात्री करुनच आपण त्या प्रस्तावांची अंमलबजावणी कराल. याच्याबाबतीत आमच्या कोणाच्याच मनामध्ये काही शंका नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब नितीन भाऊ, तुम्हाला जो ठराव करायचा आहे तो करा. जो अपात्र असतील त्यांचाच ठराव करा फक्त.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमचा विरोध आहे या विषयाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे मान्य करण्यात यावा बहुमताने.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि जोडपत्रावरील कॅन्सल करा. पुढच्या मिटींगचे जोडपत्र

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमचा विरोध आहे या विषयाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे मान्य करण्यात यावा बहुमताने पुढचा जादा विषय घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जादा विषयांची सुचना घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिकेतील सन २०१८ ते २३ या कालावधीतील नगरसेवक (१) श्री.भगत रावलमल बालाणी, (२) श्री.दत्तात्रय देवराम कोळी, (३) श्रीमती लताताई रणजित भोईटे, (४) श्री.सदाशिवराव गणपतराव ढेकळे तसेच स्विकृत नगरसेवक श्री.कैलास नारायण सोनवणे यांना सन २०१९-२० या कालावधीत घरकुल घोटाळयामध्ये सजा लावण्यांत आलेली असल्याकारणामुळे यांना मनपा अधिनियमातील कलम १०, १२ आणि कलम १४ या नियमाने वर नमुद नगरसेवकांना दोन वर्षापेक्षा जास्त शिक्षा झालेली

असल्याने व त्या शिक्षेला कोणत्याही प्रकारे स्थगिती अदयाप मिळालेली नाही त्यामुळे हे पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह असल्याने त्यांना पालिका सदस्य म्हणून राहण्याचा कोणताही अधिकार नसल्याने घरकुल घोटाळयातील शिक्षा लागलेल्या उक्त ५ नगरसेवकांना अपात्र करणेबाबत प्रशासनाला योग्य ती कारवाई करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- २४ प्रतिकुल मते :- १४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०१ :-** कोवीड -१९ चा प्रादुर्भाव सुरू असल्यामुळे मेहरूण परिसरातील बंद अवस्थेतील टि.बी.हॉस्पीटल येथे एन.यु.एच.एम. निधीतुन किमान ३० बेडचे रुग्णालयाची उभारणी करणेबाबत मा. विरोधी पक्ष नेता श्री. सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका उपनगर मेहरुण गावातील नागरीक तसेच तांबापुरा भागात सर्ववर्गीय नागरीकांची सुमारे ५० ते ६० हजार लोकसंख्या असलेला दाटवस्तीचा परिसर आहे. सदर परिसरातील नागरीकांसाठी या परिसरात मनपाचे रुग्णालय नसल्यामुळे रुग्णाचे अतोनात हाल होत असून सदयस्थितीत कोविड-१९ चा प्रादुर्भाव सुरु असुन रुग्णालयाअभावी या परिसरातील रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने मेहरूण परिसरातील बंद अवस्थेतील टि.बी.हॉस्पीटल येथे एन.यु.एच.एम. निधीतुन किमान ३० बेडचे रुग्णालयाची उभारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०२ :-** प्रभाग क्र. ४ व ५ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत तसेच नागरी दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत १ ते ९ विविध कामे करणेकामी येणारा एकूण रक्कम रु. ३,९८,७७,७४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा. सदस्य श्री.विष्णु रामदास भंगाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात मा.महापौरताई, तेथे दलितेत्तर मध्ये म्हटले गेले आहे. तर काही कामे त्याच्यातली जी आहे. ते दलितोत्तर निधी मधे आहे आणि काही कामे दलित वस्तीमध्ये आहे. प्रभाग क्र.४ व ५ ची जी कामे आहे ती दलितवस्ती मध्ये आहे आणि बाकीची जी आहे ते दलितोत्तर मध्ये आहे. अश्या पध्दतीची लेखी सुचना जी आहे की, कोणत्या दलितवस्ती मध्ये येतील आणि कोणत्या दलितोत्तर मध्ये येतील. त्या संदर्भातल्या लेखी सुचना आपल्याकडे लेखी स्वरूपात देण्यात येईल.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र. ४ व ५ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत तसेच नागरी दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत खालील नमूद १ ते ९ विविध कामे करणेबाबत प्रस्तावात नमूद आहे परंतू सभागृहात झालेल्या सूचनेनूसार व मा.महापौर यांचे निर्देशानूसार तसेच सन्मा.सदस्य यांचे मागणी प्रमाणे खालील नमूद अ.नं. १ ते ८ कामे नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत तसेच अ.नं.९ चे काम नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करणेस व त्यासाठी येणारा एकूण रक्कम रु.३,९८,७७,७४०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५ रेल्वे स्टेशन ते जिल्हा परिषद पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.४०,४७,८४०/- |
| २ | प्रभाग क्र.५ नविपेठ एल.आय.सी.ऑफिस ते रथ चौक रस्ता डांबरीकरण करणे. | रु.७६,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.५ मधील बॉम्बे मेडीकल ते टेलिफोन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३६,००,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.५ मधील स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२५,००,०००/- |
| ५ | प्रभाग क्र.५ रेल्वे स्टेशन ते नेहरु चौक रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५५,००,०००/- |
| ६ | प्रभाग क्र.५ कोर्ट चौक ते चित्रा चौक ते शिवाजी रोड रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९०,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्र.५ ऑर्किड हॉस्पिटल ते गुजरात स्विट मार्ट रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३४,००,०००/- |
| ८ | प्रभाग क्र.५ विजय टाईम्स ते हनुमान मंदिर (व.वा.मार्केट) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१७,००,०००/- |
| ९ | प्रभाग क्र.४,५ भिलपुरा पोलीस चौकी ते ममुराबाद रेल्वे पुल (ममुराबाद रस्ता) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२५,२९,९००/- |
| | एकूण रक्कम :- | रु.३,९८,७७,७४०/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०३ :-** प्रभाग क्र. ११ अंतर्गत व्यंकटेश नगर, पिंप्राळा गट नं. ११९ तसेच विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणेकामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु. २.५० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा. सदस्या सौ. उषा संतोष पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.११ मधिल नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी खालील कामे करणे गरजेचे आहे तसेच याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्याने प्रभाग क्र. ११ अंतर्गत व्यंकटेश नगर, पिंप्राळा गट नं. ११९ तसेच विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणेकामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु. २.५० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०४ :-** प्रभाग क्र. ४ अंतर्गत नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणेकामी १ ते २ कामे करणेकामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु. २.४४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा. सदस्या, सौ. चेतना किशोर चौधरी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ हा विषय जो आहे ना दलित वस्ती मध्ये घेण्यात यावा विषय कारण तो वार्ड दलितवस्तीचा आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** बरं, बर दलितवस्तीत घेऊ या.
**श्री.कैलास सोनवणे :-** हो
**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.४ मधिल नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी खालील कामे करणे गरजेचे आहे तसेच याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्याने प्रभाग क्र. ४ अंतर्गत नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणेकामी खालील नमूद १ ते २ कामे करणे कामी प्रस्तावात नमूद आहे परंतू सभागृहात झालेल्या सूचनेनूसार तसेच मा.महापौर यांचे निर्देशानूसार व सन्मा.सदस्य यांचे मागणी प्रमाणे खालील नमूद कामे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करणेस व त्यासाठी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु. २.४४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.४ अंतर्गत जोशी पेठ, रामपेठ, दलाल वाडा, मारोती पेठ, भवानी पेठ, भावसार मढी व भोईटे गढीभाग या परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे (एकूण ०९ रस्ते) | रु.०१.०० कोटी |
| २ | प्रभाग क्र.४ अंतर्गत बागवान मोहल्ला भोई गल्ली, पतंग गल्ली, रथ चौक या परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे (एकूण १३ रस्ते) | रु.०१.४४ कोटी |
| | एकूण रक्कम :- | रु. २.४४ कोटी |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०५ :-** १०० कोटीच्या निधीमधुन प्रभाग क्र. २ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु.३,८७,७७,१६८/- तसेच रस्ते नियोजन मंडळाच्या निधीतुन प्रभाग क्र. २ मध्ये विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु.१,८०,२१,८४९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १ कोटी ८० लाख रूपयाचेच कामे मान्य करण्यात यावे कारण त्यांनी प्रस्ताव जो दिलेला आहे त्यात अर्धा विषय जो आहे तो माहितीसाठी दिलेला आहे की, १०० कोटी मध्ये जी कामे करण्यात आलेली आहे. तो फक्त नियोजन मंडळाच्या निधीतुन करण्यात येणाऱ्या कामांना फक्त मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण त्यांनी १०० कोटी मध्ये सुध्दा ती कामे दर्शविलेली आहे. परंतु या प्रस्तावामध्ये दोन ठिकाणी ती कामे दर्शविण्यात आल्याचे दिसुन येत आहे. म्हणुन नियोजन मंडळाकडुन जी कामे प्रस्तावीत केलेली आहे. त्यांना मान्यता देण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मान्य पुढील विषय घेण्यात यावा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, विषयपत्रिकेवरील विषय संपल्यानंतर मला फक्त दोन मिनीट मत मांडायचे आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे ताई, विषय क्र.६ बाकी आहे. त्यानंतर आपण बोलु या. विषय क्र.६ घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ५३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १०० कोटीच्या निधीमधुन प्रभाग क्र. २ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे रक्कम रु.३,८७,७७,१६८/- ची कामे प्रस्तावीत करण्यात आलेली असल्याने सदर कामे रद्द करणेत येत आहेत परंतू रस्ते नियोजन मंडळाच्या निधीतुन प्रभाग क्र. २ मध्ये खालील विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा अंदाजित एकूण रक्कम रु.१,८०,२१,८४९/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

नियोजन मंडळाच्या निधीतुन करावयाची कामे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.४१८ उस्मानिया पार्क परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,४७,०६,२५६/- |
| २ | प्रभाग क्र.२ जळगांव स.नं.५०९/५१० अमन पार्क व बारसे कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३३,१५,५९३/- |
| | एकूण रक्कम :- | रु.१,८०,२१,८४९/- |

उक्त कामे करणेसाठी शासनाकडुन जो काही निधी उपलब्ध होईल किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडून जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या अनुषंगाने कामे करणे संदर्भात मा.महापौर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने प्राथमिकतेप्रमाणे तसेच योग्य पध्दतीने नियोजन व्हावे अशा प्रकारची कामे मा.महापौर यांनी पत्राव्दारे सूचवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**जादा विषय क्र.०६ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे असुसूचि ड प्रकरण २ महानगरपालिका, स्थायी समिती खालील कामकाज या नियमाव्यतिरिक्त जादा नियम तयार करणे कामी प्रवास खर्च, मानधन इत्यादी अदा करणे कामी येणारा अपेक्षित खर्च रक्कम रु. ०१ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत व सदर नियम तयार करणे कामी एक उपसमिती गठीत करणेबाबत ॲड.एम.ए.पठाण मानद संचालक, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था औरंगाबाद यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**श्री.प्रशांत नाईक:-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**श्री.प्रशांत नाईक:-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा महापौरताई

**मा.महापौर :-** बोला राजु भाऊ,

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आपल्याकडे वकील पॅनल आहे, वकील पॅनल सुध्दा आपली नियमावली तयार करु शकतात. मग आपण १ लक्ष कशासाठी खर्च करायचे. आपल्याकडे ऐवढे तज्ञ वकील आहेत पॅनलवरती त्यांचा उपयोग आपण घ्यायला पाहिजे की नको, महापौर महोदया

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** शुचितताई बोला,

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** शुचितताई आवाज येत नाही आपला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, या विषयासंदर्भात मला प्रशासनाचा खुलासा हवा आहे. येथे याच्यामध्ये असे नमुद आहे की, उपसमिती गठीत केली जाणार आहे या विषयासाठी तर ही उपसमिती नेमकी कोणाची असणार. या उपसमितीचे सदस्य नेमके कोण कोण असणार आहे. या संदर्भात आधी या सभागृहाला माहिती द्यावी. त्यानंतर याच्याबद्दलचा निर्णय घेणे सोईचे होईल. दुसरा प्रश्न असा आहे की, येथे खर्च नमुद केलेला आहे. ८० हजार आणि २० हजार तर हे खर्चा संदर्भात हा खर्च मासिक असणार आहे की, वार्षिक असणार आहे. महासभेला किती कालावधी

लागणार आहे. त्याचा प्रस्ताव हा येथे आलेला आहे. याच्यातुन फारसा काही सिध्द होत नाही. तरी याच्यावर माहिती पाहीजे आहे.

**मा.महापौर :-** नगरसचिव साहेब, आपण यावर उत्तर द्यावे.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया आणि सन्मा.सभागृह, महाराष्ट्रातल्या ज्या महापालिका आहे त्याच्यापैकी बहुतांश महापालिकांचे सभा कामकाज नियम मंजुर आहेत. शासनाने मंजुर केलेले आहेत. त्यापैकी ज्यांचे मंजुर झालेले नाही. त्यापैकी जळगांव महानगरपालिका आहे. यापुर्वी साधारणता १५ वर्षापुर्वी सभा कामकाज नियम तयार करून मंजुरीसाठी पाठविलेले होते. परंतु त्याला शासनाने मंजुरी दिलेली नाही किंवा ते त्याला काही कारणे असतील. आता आपल्याला सभा कामकाज नियम करणे आवश्यक आहे. कारण महानगरपालिका अधिनियमामध्ये बऱ्याच काही गोष्टी अश्या आहेत, संदिग्ध आहेत. त्याच्यामध्ये आपल्याला सभा कामकाज करतांना अडचणी निर्माण होतात. आणि त्या संदिग्ध गोष्टींसाठी क्लेयारीटी असणे आवश्यक आहे म्हणुन आपण हे सभा कामकाज नियम जे आहे. ते आपण आखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, जी आहे ऑल इंडिया इंस्टीट्युट, शासनाची संस्था आहे.याच्यात जे श्री.एम.ए.पठाण यांनी बऱ्याच महानगरपालिकांचे सभा कामकाज नियम तयार केलेले आहे. त्यांनी याच्यात १ लाख रूपये जो दर्शविलेला आहे. याच्यात तो खर्च जो आहे त्याच्यात त्यांचे मानधन, त्यानंतर वेळोवेळी समितीच्या ज्या ४ ते ५ वेळेस ज्या बैठका होतील. त्याच्या येण्या जाण्याचा खर्च वगैरे याच्यामध्ये आहे. तद्नंतर मराठी आणि इंग्रजी मध्ये सभा कामकाज नियम तयार होतील. सर्व सन्मा.सदस्यांना ८० प्रती म्हणजे ज्या प्रती लागतील त्यासुध्दा त्यामध्ये ते प्रिंट करून देणार आहे. हा एकत्रीत खर्च आहे. आणि उपसमिती याच्यासाठी आहे की, हे जे सभा कामकाज नियम तयार होतील. याच्यात आपल्या वेगवेगळया ज्या सुचना असतील त्यात कोणत्याबाबी समाविष्ट कराव्यात. कायद्याच्या चौकटीत राहुन जे आता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुदी आहेत. त्या विचारात घेऊन ज्या काही कराव्या लागतील आपल्याला दुरूस्त्या त्या सुचविण्यासाठी सभा कामकाज नियम करण्यासाठी आपली मदत व्हावी म्हणुन एक समिती गठीत करावी लागेल. त्याच्यात मा.आयुक्त असतील म्हणजे इतर ठिकाणी ज्या समित्या गठीत झालेल्या आहे. त्याच मी सांगतो त्यात मा.आयुक्त असतात, तदनंतर नगरसचिव असतात, मा.महापौर असतात, मानद म्हणजे जे श्री.एम.ए.पठाण आहे ते स्वत: असतात. त्यानंतर आपण २-३ सन्मा.सदस्य, जे ज्येष्ठ सदस्य असतील, मग ते अभ्यासु सदस्य जे असतील त्यांचे आपण नाव घेऊन उपसमिती आपण गठीत करु शकतो. वेळोवेळी जसे जसे हे नियम तयार होतील. ते तयार झाल्यानंतर ते मानद पठाण साहेब येतील, आपल्यासोबत चर्चा करतील, आपल्या काही सुचना असतील, त्या सुचना ते घेतील आणि ते नियमामध्ये समाविष्ट करून त्या आधारे हे सभा कामकाज नियम तयार होतील, मग ते आपल्याला महासभेची मंजुरी घेऊन ते शासनाला पाठविले जातील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता किती वेळ लागेल नगरसचिव साहेब ही सगळी प्रोसेस व्हायला.

**नगरसचिव :-** काय

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** अपेक्षित कालावधी काय असणार आहे या सगळया कामकाजाला

**नगरसचिव :-** नाही तसे नाही, आता ज्या बैठका घेतल्या जातील व बैठका ज्या होतील, त्या आपल्या वेळेनुसार आपण अव्हेलेबल असु त्या प्रमाणे ते बैठका घेतील. त्याला कालमर्यादा काय ? त्यांना जर आपण तसे पत्र दिले तर ते काम सुरु करून देतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हा जो १ लक्ष रुपये खर्च आपण येथे नमुद केलेला आहे. हा काम सुरु झाल्यापासुन संपेपर्यंत कितीही त्याला कालावधी लागला तरी ही हा खर्च ऐवढाच असणार की, जसा जसा कालावाधी वाढणार की, हे खर्च वाढत जाणार.

**नगरसचिव :-** नाही नाही, १ लाख रूपये पुर्ण त्यांचा खर्च असेल. जोपर्यंत ते आपल्याला पुर्ण फायनल प्रिंट देणार नाही तयार करून आणि शासनाला जोपर्यंत आपण पाठवत नाही तोपर्यंतचा हा खर्च असेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** असे जर असेल तर माझी येथे एक सुचना आहे. सर्व पक्षीय सदस्य या उपसमितीत नमुद केलेली आहे. त्यात सर्व पक्षीय सदस्यांना घेण्यात यावे म्हणजे सगळयांना समान संधी दिली जाईल.

**नगरसचिव :-** सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे तो. सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई आपल्याला विनंती आहे की, सर्व पक्षीय सदस्यांना या उपसमितीमध्ये घेण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही हरकत नाही ताई आपले म्हणणे जे आहे ते वाजवी आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता घाई करुनये नावे मागविण्याची, गटनेत्यांकडुन नावे मागविण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही अडचण नाही. फक्त मला एक प्रश्न मा.आयुक्तांना विचारायचे आहे की, आपण सभेचे कामकाज नियम तयार करत आहोत. माझे एक म्हणणे याच्यापुढे आहे की, आपण उपविधी सुध्दा तयार करण्याच्या संदर्भात प्रशासनाने काही धोरण आखलेले आहे का ? कारण बऱ्याचश्या महानगरपालिकांनी आपले स्वतंत्र उपविधी तयार केलेली आहेत आणि आपल्या जर कधी उपविधी तयार असल्या तर राज्य शासनाची मान्यता घेऊन आपल्या कामांमध्ये अधिक जास्त पारदर्शकता किंवा गतीशिलता येऊ शकते. तर त्याबाबतीतले कामे सुध्दा याच्या माध्यमातुन होऊ शकतो का ? याची आयुक्त महोदयांनी माहिती द्यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** चांगली सुचना आहे नितीन भाऊ तुमची ही.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर हा जो प्रस्ताव सन्मा.सदस्यांनी महासभेसमोर अशासकीय म्हणुन मांडलेला आहे, पण मला वाटते याच्या बद्दलचा खुलासा नगरसचिवांनी केला आहे हा पुर्ण अशासकीय दिसत नाही. हा अर्ध अशासकीय प्रस्ताव दिसतो म्हणजे नगरसचिवांचा हा प्रस्ताव असावा असे त्यांच्या माहितीवरून दिसत आहे. मला वाटते की, अश्या प्रकारे आपले जे सभेचे नियम करायचे आहे. काही महानगरपालिकांनी स्वतंत्र नियम केलेले आहेत. आपल्याला ही अश्या प्रकारचे नियम करणे गरजेचे आहे. याच्याबाबतही दुमत नाही. परंतु असे प्रस्ताव हे प्रशासनामार्फतच महासभेसमोर आलेले ठिक राहतील. कारण याच्यामध्ये कोण कोणते आपल्याला सभा नियमामधील दुरुस्त्या करायच्या आहे. त्याच्यानंतर इतर महानगरपालिकांच्या सभा नियमांचा आपल्याला संदर्भ घेता येईल का ? किंवा काही सदस्यांनी विशेष करून आणि मा.सभापती स्थायी समिती यांनी असा एक मुद्दा मांडला होता की, आपल्याकडे तज्ञ वकिलांचे पॅनल आहे. तर अश्या वेळेला त्यांची काही मदत घेता येईल का ? या सगळया बाबींची जर प्रशासनामार्फत तपासणी होऊन जर तो सर्वसमावेशक प्रस्ताव महासभेसमोर आला. तर मला वाटते आपल्याला महासभेला अधिक निर्णय घेणे योग्य होईल, हे घेत असतांना जसे सन्मा.माजी स्थायी समिती सभापतींनी काही सुचना मांडल्या किंवा त्यांचे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तर हा एक झाला आहे फक्त आपला सभेच्या कामकाजासाठी एक सप्लीमेंटरी नियम करणे कारण आपल्या महानगरपालिका कायद्यामध्ये अनुसुची-२ मध्ये ऑलरेडी या बद्दलचे सभा नियम आहेत. फक्त जस नगरसचिव म्हणत आहे त्याप्रमाणे हे नियम पुरेसे नाही. तर त्याला पुरक असे प्रकारचे तपशीलवार सभा नियम करणे गरजेचे आहे. सन्मा.जेष्ठ सदस्य श्री.नितीन भाऊ लढ्ढा यांनी जो मुद्दा मांडला की, याच्या बद्दलचे काही अनेक इतर विषय असे आहे की, ज्याची आपल्याला उपविधी बनविणे गरजेची आहे. उदा. मागच्या बैठकीमध्ये त्यावेळेचे आरोग्य समितीचे सभापती, श्री.चेतनभाऊ सनकत यांनी एक मुद्दा मांडला होता की, आपल्या कर्मचाऱ्यांना विशेषत: साफसफाई कर्मचाऱ्यांना जे आपण इतर सुट्टया देत नाही. त्या दिवशी त्यांना काम द्याव लागते. तर अश्या वेळेला त्यांना बदली सुट्टी देणे किंवा त्या सुट्टीचा पगार देण याच्याबद्दलचा जो प्रस्ताव होता तो आपण शासनाकडे पाठविला तर शासनाने त्याच्यामध्ये सांगितले की, तुम्ही त्याची उपविधी बनवा आणि आमच्याकडे पाठवा. अश्या प्रकारची उपविधी आपल्याकडुन काही बनविली गेली नाही. तर अश्या प्रकारे इतर ही काही विषय असे असु शकतात की, ज्याच्यासाठी आपल्याला काही पुरक नियम किंवा उपविधी बनविली पाहिजेत. दुसरा मुद्दा याच्यामध्ये असा आहे की, महानगरपालिका कायद्यामध्ये अशी तरतुद आहे की, कोणकोणत्या विषयांसाठी नियम बनविता येतील. म्हणजे याला सुध्दा मर्यादा आहे. म्हणजे काही विषय हे नियमामध्ये येतील काही नियम हे उपविधी मध्ये येतील. हे सगळे जे प्रशासकीय आणि तांत्रिक विषय आहे. हे जर आपण महासभेने या विषयाच्या अनुषंगाने जर हा प्रस्ताव प्रशासनापुढे पाठविला तर मला वाटते आम्ही नगरसचिवांच्या मार्फत या सगळयांचा एकत्रित प्रस्ताव महासभेला सादर करू आणि मग हे करत असतांना खर्चामध्ये बचत करता येईल का ? किंवा उपसमिती नेमण्याचा जो एक मुद्दा आहे, जो मा.हाडा मॅडमांनी मांडलेला होता. मग त्या मध्ये आपल्या सभागृहामधील जे तज्ञ सदस्य असतील. ईच्छुक असतील. त्यांची मदत घेता येईल. आपले विधी सल्लागार या पॅनलची मदत घेता येईल. इवन आपले रिटायर झालेले इतर महानगरपालिकेचे जे नगरसचिव आहेत. त्यांची मदत घेता येईल आणि मग गरजे प्रमाणे हा प्रस्ताव प्रशासनामार्फत आपल्याला त्यांचे नियम तयार करता येतील किंवा जर गरज लागली तर एखाद्या अश्या प्रकारच्या तज्ञ ऑल इंडिया

इन्स्टीट्युटची आपल्याला मदत घेता येईल का ? हे ही पाहता येईल. मला या निमित्ताने सभागृहाला अशी विनंती करावी असे वाटते की, अश्या प्रकारचे तांत्रिक प्रशासकीय प्रस्ताव हे जर आमच्याकडे पाठविले तर आम्ही ते अधिक चांगल्या पध्दतीने योग्य निर्णयासाठी आपल्यासमोर सादर करु शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, आपण जे उत्तर दिलेल आहे सभागृहाला समाधान आहे. आपण पुढील महासभेच्या पुर्वी आपल्याला ज्या आवश्यक असलेल्या उपविधी, नियम आणि सभेचे कामकाज नियम या संदर्भातला एक परिपुर्ण प्रस्ताव तयार करून पुढच्या महासभेसमोर प्रशासनाने ठेवावा ही मी आपणास विनंती करत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊंच्या मताशी आम्ही सुध्दा सहमत आहे. नितीनभाऊंच्या मी सुध्दा सहमत आहे भारतीय जनता पार्टी याला अनुमोदन देत आहे.

**नगरसचिव :-** हा प्रस्ताव काय करायच ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा

**श्री.इब्राहीम पटेल :-** तहकुब

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि परिपुर्ण प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा.

**मा.महापौर :-** प्रस्ताव तहकुब करण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, हा प्रस्ताव तहकुब ठेवण्याचा आता काही प्रयोजन नाहीये.

**श्री.नितीन लढढा :-** मग रद्द करण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** हा तर हा प्रस्ताव जर शासनाकडे पाठविला आणि आपण जी सुचना केलेली आहे. अश्या प्रकारचा या विषयाशी संबंधीत आणि अन्य विषयाशी संबंधीत एकत्रीत सर्व समावेशक प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा. असा जर आपण निर्णय घेतला, तर हा विषय पुढे आपल्याला मार्गी लावता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही हरकत नाही आपल्या सुचनेच्या प्रमाणे हा परिपुर्ण प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा. असा निर्णय ही सभा घेत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मान्य, मान्य.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** चला राष्ट्रगीत.

**मा.महापौर :-** बोला बोला ज्योतीताई बोला,

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला थोडा मागील विषयाबद्दल बोलायचे आहे, विषय मान्य आहे पण डॉकेटवर समोर काहीच माहिती आली नाही. त्यासंदर्भात मला फक्त दोन मिनीट बोलु द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** रियाज बहोत लेट आया क्या बात है.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**श्री.रियाज बागवान :-** कबसे है हो मै.

**मा.महापौर :-** बोला ज्योतीताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आपले जे वॉटरग्रेसचे काम चालु आहे. त्या कामांमध्ये थोडी सुधारणा करण्याची सगळयांना विनंती करायची आहे. परत आपल्याला मजुर वाढुन मिळाले पाहिजे. आणि पुर्ण जळगांव शहरामध्ये जी स्वच्छता ज्या पध्दतीने झाली पाहिजे होती त्या पध्दतीने होत नाहीये. याकडे आपण लक्ष द्यायचे आहे आणि तसेच मला पवन पाटील साहेबांना विचारायचे आहे की, आपण हा जो मध्यस्थ लवादक नेमला आहे. हा दंड २ कोटी १० लाख आणखीन दुसरा कोणता वाद आहे. हे आपण फक्त मला येथे क्लियर करायचे आहे की, मागील ५ महिने आपण जे काम थांबविले होते वॉटरग्रेसच त्याच्यात याची कोणतीही रक्कम येणार नाही हे त्यांनी मला येथे सांगायचे आहे. आणखीन याच्यामध्ये वॉटरग्रेसचा दुसरा काही वाद आहे का ? तो पण त्यांनी मला येथे दोन मिनीटात सांगायचे आहे आणि मध्यस्थ म्हणुन आपण ज्याची निवड केलेली आहे. त्यांनी ते वाद किती रक्कमेत निवडला / मिटविला हे महासभेपुढे सादर करायचे आहे. त्यानंतर त्याची रक्कम ही अदा केली जाईल. याची नोंद फक्त डॉकेटवर घ्या. आणि पवन पाटील साहेबांना फक्त दोन मिनीटात ही माहिती द्यायला सांगा.

**मा.महापौर :-** लवादाच्या संबंधीत आपला निर्णय झालेला आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो , नाही विषयाला मान्यता आहे. फक्त डॉकेटवर येण्यासाठी पवन पाटील साहेबांना दोन मिनीट बोलु द्या.

**मा.महापौर :-** पवन पाटील साहेब आपण याच्यावर क्लियरीफीकेशन द्या आणि कर्मचारी वाढविण्याबाबत सुध्दा आपण या ठिकाणी सांगावे.

**श्री.पवन पाटील, सहाय्यक आयुक्त :-** आपण लवादासमोर जे काही विषय सोपविणार आहोत त्यापैकी एक विषय असा आहे. डिसेंबर-२०१९ ते फेब्रुवारी-२०२० मधील एस.आय. , सी.एस.आय. यांच्या अहवालानुसार तो दंड करण्यात आलेला आहे आणि त्यामुळे त्यांचे जे वॉटरग्रेसचे प्रलंबीत देयके आहेत हा एक विषय सोपविणार आहे आणि दुसरा विषय असा आहे या करण्यात आलेल्या दंडाव्यतिरिक्त जे काही उर्वरित देयक आहे. ते देयक अदायगी बाबतचा असे हे दोन विषय असणार आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** उर्वरित देयकची रक्कम अंदाजे सांगुन द्या फक्त.

**श्री.पवन पाटील, सहाय्यक आयुक्त :-** उर्वरित अंदाजित देयकाची रक्कम कटींग वगैरे धरता ३५ ते ४० लाख आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हा आणि लवादक जे मध्यस्त रक्कम करेल ती परत महासभेपुढे मांडा आणि परत त्याची रक्कम महासभेत तसा विषय येऊन आपल्याला मंजुर असेल तेव्हा सर्व सदस्य सांगतील आपल्याला.

**श्री.पवन पाटील, सहाय्यक आयुक्त :-** हो लवादाचा जो काही निर्णय होईल तो महासभेपुढे मांडण्यात येईल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि हा खर्च दोन्ही लवादक आणि मक्तेदारमध्ये यांच्या विभागला जाणार आहे ना.

**श्री.पवन पाटील, सहाय्यक आयुक्त :-** हो आपण त्या अटीशर्ती पुढे ठेवलेल्याच आहे त्यापैकी पहिले

**सौ.ज्योती चव्हाण :-** कारण या विषयाबद्दल सगळया सदस्यांना जो संभ्रम झालेला आहे. त्यासाठी मी सर्व ही माहिती तुमच्याकडुन परत घेते. काल मला सगळी माहिती मिळालेली आहे. पण या संभ्रमाच कारण पुढे नगरसेवक कशामध्ये अडकु नये याच्यासाठी मी येथे घेत आहे. हा प्रशासनाचा विषय आहे. प्रशासनाने काळजीपुर्वक करावा. प्रशासनाच्या काही चुका मक्ता देतांना झाल्या आहेत. याच्यापुढे कोणतीही चुक होऊ नये. अशी मी त्यांना विनंती करते. आणि अभ्यासपुर्वक निर्णय त्यांनी घ्यावा.

**श्री.पवन पाटील, सहाय्यक आयुक्त :-** प्रशासन काळजीपुर्वक याबाबत कार्यवाही करेल असे मी आश्वस्त करतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** धन्यवाद महापौर महोदया.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, मला फक्त शेवटची एक अशी सुचना करावी वाटते की, आता जे लसीकरण केंद्र सुरु आहे. या लसीकरण केंद्रांवरती व्यवस्था खुप पुरेशी नसल्याकारणाने सामान्य नागरीकांना तासंतास तेथे उन्हामध्ये उभे राहवे लागते. या संदर्भात तिथे पिण्याच्या पाणीची व्यवस्था आणि साऊलीसाठी टेन्ट टाकण्याची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे आणि तेथे होणारी गर्दी जी आहे. त्या गर्दीवर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन कोणीही कर्मचारी तेथे उपलब्ध नसल्याकारणाने तेथे असलेले आपले डॉक्टर्स किंवा नर्सेस असतील. यांच्यावरती खुप अतिरिक्त ताण पडतो. तर या दृष्टीकोणातुन तेथेच पोलिस बंदोबस्ताची सुध्दा मागणी मा.पोलिस अधिक्षकांकडुन करुन घेण्यात यावी. आणि टेन्ट आणि पाण्या सारख्या ज्या प्राथमिक मुलभुत सोई आहे. त्या उपलब्ध करून देण्यात याव्या.

**मा.महापौर :-** निश्चितच भाऊ. या ठिकाणी आपले जे लसीकरण केंद्र आहे. त्यातील आपले व्यवस्थापन पाहुन त्याठिकाणी लसीकरणासाठी मंजुरी द्यावी. मुलतानी हॉस्पीटलमध्ये टेन्ट सुध्दा नव्हता, बसण्याची व्यवस्था नव्हती. आणि १ हजार लसीकरणासाठी त्यांना मान्यता देण्यात आलेली होती.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आता ही नाहीये पाण्याची व्यवस्था नाही.

**मा.महापौर :-** ॲकच्युली जर हॉस्पीटल पाहिले, त्या हॉस्पीटलमध्ये व्यवस्था पाहिजे. त्या पध्दतीने केलेली नव्हती. तरी ही त्यानुसार त्यांना लसीकरणाची मान्यता देण्यात यावी.

**श्री.रियाज अहमद बागवान :-** महापौरताई, अभी जब कल आप मुलतानी हॉस्पीटल मे व्हिजीट कर के गए, उसके बादमे भी जसीच्या तसी स्थिती है वहाँपर, टेन्ट अभी भी नही है. पाणी के लिए प्रॉब्लम है लोगो को अभी भी व्यवस्था नही है.

**मा.महापौर :-** टेन्टची व्यवस्था आणि पाण्याची व्यवस्था लवकरात लवकर करावी. सर्व आपले जे सेंटर आहे तेथे करण्यात यावी.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आजच करा आज.

**श्री.रियाज अहमद बागवान :-** मॅडम महापौरताई, मुझे एक और पुछना है कमिशनर साहेब से.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्य यांनी आजची जी महासभा आहे. ती अतिशय शांततेत पार पाडली. आणि जळगांव शहरासाठी जी जी विकास कामे होती. सर्वांनी मिळुन त्यावर एक मताने निर्णय दिला. त्या बद्दल मी सर्व सन्मा.सदस्यांची आभारी आहे आणि या ठिकाणी प्रशांतभाऊ आपण आपले मत मांडा.

**श्री.रियाज अहमद बागवान :-** महापौरताई,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरांचेही अभिनंदन.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्य यांनी शांतता घ्यायची आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई आपले सुध्दा अभिनंदन.

**मा.महापौर :-** धन्यवाद.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, महापौरताई श्री.छोटु लक्ष्मण न्हावी हे चोपदार म्हणुन ज्यांनी आपल्याकडे १८ वर्ष सेवा केलेली आहे. त्यांचा महापौर आणि उपमहापौर यांनी सत्कार करावा. कारण की ते दि.३१/०५/२०२१ ला रिटायर्ड होणार आहे. आणि ही त्यांची शेवटची महासभा आहे. त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात यावा. अशी मी विनंती करतो.

(श्री.छोटु लक्ष्मण न्हावी, चोपदार यांचा मा.महापौर व मा.उपमहापौर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.५३९ पारित करण्यात आला.)

असा ठराव करण्यात येतो की, सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे परंतू प्रशासनाने जळगांव महानगरपालिकेचे विभागनिहाय उपविधी तसेच सभा कामकाज नियम तयार करणेबाबतचा प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ३३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**
**(जयश्री सुनिल महाजन)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**